
नोव्हेंबर
१९७२

# अर्थ

दिवाळी
अंक

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र






# दीपावली शुभचिंतन !

आयुर्विम्याचा दीप
आपले जीवन उजळून टाको.

आयुर्विम्याला पर्याय नाही !

PRATIBHA.2015 3 MAR

वर्ष २८ ☆ अर्थ ☆ अंक २१
दिवाळी अंक
बुधवार, १ नोव्हेंबर १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

---

अनुक्रमणिका

१. संपादकीय ... ७
२. उत्पादनवाढीची गती वाढणे सर्वांत महत्त्वाचे ... ७
३. केळकर व महाराष्ट्राचा आर्थिक अभ्युदय ... ९
४. वार्षिक अहवालांचे स्वरूप बदलणार काय ? ... ११
५. गीतेचा आपल्या राष्ट्राला चैतन्यकारक संदेश ... १३
६. नंगा बाजार ... १९
७. भारताच्या मंत्रिमंडळाची सामाजिक पार्श्वभूमी ... २१
८. सार्वजनिक क्षेत्राचे वाढते महत्त्व ... ३१
९. मान्यवर धनंजयराव गाडगीळ ... ३९
१०. सहकारी पतपुरवठा यंत्रणेवरील वाढता ताण ... ४३
११. कामगार व त्यांचे काही प्रश्न ... ४९
१२. 'द लाँगेस्ट डे' ... ५३
१३. सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांचे प्रश्न ... ५७
१४. ग्रंथपाल गुरुशिष्यांची असामान्य जोडी ... ५९

---

ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !

卐 दीपावली अभिष्टचिंतन 卐

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.

साखरेप्रमाणेच रासायनिक धंद्यातही अग्रेसर

प्रत्येक कुटुंबाची आवड :शुभ्र, दाणेदार, मोहक व गोडच गोड साखर

*अनेक धंद्यांत आवश्यक असणारी आमची रसायने—*

ॲसेटिक ॲसिड, एन् ब्युटेनॉल, ब्युटाईल ॲसिटेट, ॲब्सोल्युट अल्कोहोल, रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिट.

आमची उत्पादने उत्कृष्ट व नाणावलेल्या दर्जाची असतात.

—भारतातील एक प्रमुख अग्रयावत कारखाना—

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि. कसबा बावडा, कोल्हापूर नं. ३.

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





...भटकणाऱ्यासाठी ठाकरसीचं मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वोयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिन्ट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड, साड्या, ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

## संपादकीय

"अर्थ"चा १८ व्या वर्षाचा दिवाळी अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे.

महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक अभ्युदयाचा पाया मजबूत व्हावा ह्यासाठी उपयुक्त वाङ्मय पुरवून वाचकांना क्रियाशील होण्यास साहाय्य करण्याच्या उद्देशाने संस्थापक प्रो. वा. गो. काळे ह्यांनी "अर्थ" १९१५ मध्ये सुरू केला. संस्थापकांच्या निधनासही आता २६ वर्षे होऊन गेली. केवळ वैयक्तिक जबाबदारीवर केलेल्या ह्या उपक्रमास महाराष्ट्रीय जनतेचा जो सातत्याने पाठिंबा मिळाला त्याबद्दल आम्हांस अत्यंत कृतज्ञता वाटते. एकाच ध्येयाने प्रेरित होऊन "अर्थ" अविरत प्रयत्न करीत आला आहे आणि त्याचे हितचिंतक प्रत्यक्ष साहाय्य देऊन आपली जाणीव अर्थपूर्ण करीत आहेत, त्यामुळे हाती घेतलेले काम नेटाने चालविण्यात उत्साह वाटतो. आर्थिक पत्र चालविणे किती अवघड आणि नेटाच्या कार्यक्षमतेचे काम आहे ह्याची कल्पना सहज येण्याजोगी नाही. त्यामुळे जाणत्या लोकांचे आशीर्वाद, प्रोत्साहन आणि साहाय्य ह्यांचे आम्हांस विशेष महत्त्व वाटते.

भारत सरकारचे भूतपूर्व अर्थमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुख ह्यांनी म्हटले आहे, "अर्थ" चे कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. "अर्थ" आपली कामगिरी उत्कृष्ट रीतीने बजावीत आहे, हे मी स्वानुभवावरून, दृढ विश्वासाने सांगू शकतो." डॉ. देशमुखांच्या प्रमाणेच आमच्या सर्व वाचकांची भावना आहे याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. आम्हांस त्यांचेकडून मिळणारा उत्कृष्ट प्रतिसाद, हाच आमच्या आनंदाचा ठेवा आहे.

**"अर्थ" चे वाचक, लेखक, हितकर्ते साहाय्यक ह्या सर्वांस ही दिवाळी व नवे वर्ष सुखसमृद्धीचे जावो ! त्यांच्या हातून अर्थयोगाची अधिकाधिक उपासना घडो !**

# उत्पादन वाढीची गती वाढणे सर्वांत महत्त्वाचे

### उद्योगात मोठा, मध्यम, लघु, हे जातिभेद नकोत : ते सर्व एकमेकांचे भागीदार आहेत

(लेखक :–शंतनुराव किर्लोस्कर)

माझ्या वडिलांनी किर्लोस्करवाडी येथे लहान प्रमाणावर सुरू केलेल्या उद्योगातूनच किर्लोस्कर कारखाने निर्माण झालेले आहेत. त्या काळी 'पॅकेज इनसेंटिव्हज' अस्तित्वात नव्हती आणि मदत करणाऱ्या संस्थांची कल्पनाही नव्हती. गेल्या कित्येक वर्षांच्या अवधीत किर्लोस्कर कारखान्यांचा आकार वाढत गेला, परंतु त्यांचा सुमारे १,००० लघुउद्योगांच्या युनिटसूशी घनिष्ट संबंध आहे. ही युनिटस् किती तरी प्रकारचे सुटे भाग पुरवितात आणि सूचनेप्रमाणे माल तयार करून देतात. ही सर्व लघुउद्योगांची युनिटस् आमच्या प्रगतीमधील भागीदार आहेत आणि त्यांची भागीदारी अशीच चालू राहील.

किर्लोस्कर फौंडेशन हा किर्लोस्कर कारखान्यांनी स्थापन केलेला ट्रस्ट १० वर्षांपेक्षा जास्त काळ उपयुक्त कार्य करीत आहे. लघुउद्योग युनिटसना आर्थिक आणि तांत्रिक साहाय्य देणे, हे त्या ट्रस्टचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे पुण्यातील आणि पुण्याच्या परिसरातील लघुउद्योगांच्या अडचणींशी आमचा सतत संपर्क राहिला आहे.

कोणतेही युनिट वाढत गेल्याखेरीज त्याला टिकाव धरता येत नाही. त्यासाठी त्याच्या दरवर्षीच्या उलाढालीत किमान १०% वाढ होणे आवश्यक असते.

ह्या आर्थिक गरजेचा सरळ अर्थ असा की, काही वर्षांच्या अवधीत लहान युनिटची वाढ मध्यम आकाराच्या युनिटमध्ये आणि मध्यम आकाराच्या युनिटची वाढ मोठ्या आकाराच्या युनिटमध्ये व्हावयास हवी.

युनिटचा आकार हा त्याच्या वाढीचा एक फक्त टप्पा असतो. लघु, मध्यम आणि मोठ्या आकाराची, असे त्याचे वेगवेगळे कप्पे असू नयेत. समाजात जातिभेदाची पद्धत आहे, तिचे दुष्परिणाम आपण भोगतच आहोत. तेवढे पुरे आहेत. औद्योगिक क्षेत्रात ती आणली तर दुष्परिणाम अधिकच नुकसानकारक होतील.

दाट वस्तीच्या शहरांतून औद्योगिक वाढीचे केंद्रीकरण होऊ देण्याऐवजी त्याचे विस्तारावर विकेंद्रीकरण व्हायला हवे, असे मत आज भारतात सर्वमान्य झालेले आहे. आर्थिक प्रगतीमध्ये प्रादेशिक समतोल राखण्यासाठी, उपलब्ध साधनांचा अधिक चांगला उपयोग करता येण्यासाठी आणि लोकसंख्येच्या अधिकाधिक घटकात आर्थिक प्रेरणा निर्माण करण्यासाठी असे विकेंद्रीकरण आवश्यकच आहे.

मध्यवर्ती सरकारच्या आणि राज्य सरकारांच्या कचेऱ्या, संरक्षण खात्याचे विभाग आणि इतर पब्लिक सेक्टरची मुख्य केंद्रे मागास प्रदेशात स्थापन करण्याचा सरकारने विशेष प्रयत्न करायला हवा. त्यामुळे नवे कारखानदार तेथे आकृष्ट होण्यास सुयोग्य वातावरण निर्माण होईल. प्रादेशिक विकासास आपण कटिबद्ध आहो, हे सरकारने प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले पाहिजे.

लघुउद्योग युनिटस्च्या कामाविषयी कित्येक पाहणी-अभ्यास झालेले आहेत. त्यातून मोठी आकडेवारी दिलेली आढळते, पण लघुउद्योगांच्या विहंगम दर्शनापेक्षा आर्थिक तपशीलवार आकडेवारीची जास्त आवश्यकता आहे.

### लघुउद्योगांच्या अपयशांची कारणे

लघुउद्योगांची अपयशे आणि त्या अपयशांची कारणे वक्तशीरपणे प्रसिद्ध करणाऱ्या देशांत जपानचा समावेश आहे. त्यांचे व्यापार आणि उद्योग यंत्रालय अशी माहिती उपलब्ध करून देते. युनिटस् बंद पडण्याचे प्रमाण, मार्केटिंगच्या अडचणी, कच्च्या मालाचा तुटवडा, कर्जाचा अपुरा पुरवठा, तांत्रिक मनुष्यबळाची दुर्मिळता, इत्यादींविषयी माहिती तक्त्यांच्या द्वारा सादर केली जाते. लघुउद्योगांच्या सेक्टरसंबंधी धोरण ठरविताना ही माहिती विचारात घेतली जाते. अशा प्रकारची काही योजना भारतातही आवश्यक आहे. लघुउद्योग युनिटस्च्या अपयशाच्या कारणांची वर्गवारी माझ्या मते खालीलप्रमाणे असेल :—

| | |
|---|---|
| विक्रीबाबत अडचणी | ४०% |
| कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या अडचणी | २०% |
| अपुरा कर्जपुरवठा | २०% |

अपयशाच्या इतर कारणांबरोबर पुढाकार घेणाऱ्यांचा तुटवडा हेही एक महत्त्वाचे कारण आहे. त्यात प्रादेशिक फेरफार आढळतात. महाराष्ट्रीय नोकरीत खूष असतो, तर मारवाडी नव्या ठिकाणी नुसता लोटा घेऊन येईल आणि नवा कारखाना यशस्वी रीतीने उभारील. युरोपियन्सपैकी प्रारंभी प्रॉटेस्टन्ट उत्तर अमेरिकेत गेले आणि कॅथॉलिक लॅटिन अमेरिकेत गेले; त्यांच्या फलश्रुतीत प्रचंड फरक आहे. त्याच प्रकारची ही परिस्थिती आहे.

भारतातील कारखानदारीच्या वाढीस कोणत्या सामाजिक कारणांचा काय प्रभाव पडतो ह्याचा अभ्यास करणे उद्बोधक ठरेल. कारखानदारीत पुढाकारास चालना मिळण्यास अनुकूल असे सामाजिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला पाहिजे.

### उत्पादनवाढीवर भर पाहिजे

अधिक रोजगार निर्मिती, अधिक विकेंद्रीकरण, अधिक आर्थिक साहाय्य, ह्यांसाठी कसून प्रयत्न करण्याचे आपण सर्वांनीच मान्य केलेले आहे; पण त्या सर्वांचा मुख्य भर उत्पादनवाढीवर असावयास हवा.

आर्थिक साहाय्य करणाऱ्या संस्थांसंबधी मी एवढेच म्हणू इच्छितो की, गेल्या २५ वर्षांत स्वावलंबनाची उपेक्षा करून 'साहाय्य' ह्या शब्दाला भलतेच महत्त्व आपण देत आलो आहो. सर्व प्रकारच्या साहाय्याची आपण अपेक्षा बाळगतो आणि आता आपण अशा अवस्थेस पोचलो आहोत की एकादी औद्योगिक कंपनी सरकारी किंवा आर्थिक संस्थांचे साहाय्य न घेता स्वतःच्या पायावर उभी राहू शकली, तर तो अपवादच समजला जाईल.

ह्याला दुसरीही बाजू आहे. किर्लोस्कर युनिटची स्थापना लहान प्रमाणावर किर्लोस्करवाडी येथे करण्यात आली तेव्हा साहाय्यक उद्योगांची सोय उपलब्ध नव्हती आणि बाजारपेठाही फार दूर होत्या. तरी सुद्धा युनिट वाढीस लागले. ह्या वाढीमध्ये निर्माण झालेल्या साधनांच्या आधारावरच ती वाढ होत गेली. सध्याच्या कराच्या बोजामुळे आणि व्याजाच्या जबर दरामुळे स्वतःचे आर्थिक बळ निर्माण करणे अशक्य होत आहे. त्यामुळे बाहेरील आर्थिक साहाय्यावरील अवलंबन वाढत आहे. म्हणजे एखाद्या पेशंटच्या शरीरातून आधी रक्त काढून घेऊन मग त्याला रक्त टोचण्यासारखेच आहे! प्रत्येक औद्योगिक उपक्रमाला स्वतःची वाढ करता येऊन, स्वतःची आर्थिक साधनसंपत्ती निर्माण करता येऊन, त्यातून पुनः वाढ करता येईल, असे आपले दीर्घकालीन धोरण हवे.

### अमाप वाव

भारतात साधनसामग्रीची वाण नाही. वाढीला अमाप वाव आहे. पुढाकार घेणारी लायक माणसे, साहाय्यक उद्योगांचा प्रादेशिक विकास आणि पोषक औद्योगिक वातावरण ह्यांची मात्र गरज भासते. ही गरज भागविण्यात आली तर औद्योगिक उपक्रम वाढीची गती कायम राखण्यास आवश्यक ती आर्थिक शक्ती स्वतःच निर्माण करू शकतील. प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी साहाय्यक संस्थांना विविध प्रकारे मदत करता येईल.

हजारो लघुउद्योग युनिटस्चा मजबूत पाया, विशेषतः विकसनशील आणि अविकसित प्रदेशात, तयार करण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्याने झटले पाहिजे. हे घडून येण्यासाठी मोठ्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांच्या युनिटस्चे अस्तित्व आणि वाढ ही अत्यावश्यक आहेत. मोठ्या उद्योगांच्या वाढीस आळा घालण्याचे सध्याचे धोरण लघुउद्योगांच्या वाढीस आडकाठी आणीत आहे.

वार्षिक वाढीची गती सतत राखणे, हे आपले ध्येय असावयास हवे; त्याच्या पूर्तीसाठी लघुउद्योगांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे. त्यासाठी त्यांचा मध्यम किंवा मोठ्या उद्योगांशी संघर्ष येण्याचे कारण नाही.

---

# केळकर व महाराष्ट्राचा आर्थिक अभ्युदय

( लेखक :–आत्माराम रावजी भट, पुणें )

कै. श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांचा



जन्मशताब्दिदिन दोन महिन्यापूर्वी थाटाने साजरा झाला. त्या निमित्ताने त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रात केलेल्या सार्वजनिक सेवेचा परिचय करून देऊन त्याबद्दल कृतज्ञताही व्यक्त करण्यात आली, हे योग्यच होय. तात्यासाहेबांचे जीवन अष्टपैलू होते. त्या बहुतेक पैलूंचे दर्शन लोकांना जन्मशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने घडविण्यात आलेले आहे. तात्यासाहेबांनी साहित्य, राजकारण व समाजकारण या क्षेत्रांत जसे कार्य केले तसेच ते महाराष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयाकरताही झटले. स्वदेशी व स्वावलंबन हा स्वराज्याच्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग असल्याने त्यांनी केसरी द्वारा त्यांचा प्रचार जसा केला त्या प्रमाणेच महाराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीकरता जे प्रयत्न झाले त्यांचा पुरस्कार त्यांनी केला. जेथे त्यांना अशा उपक्रमात सहभागी होता आले तेथे ते झालेही. त्यांच्या या कार्याचे ओझरते दर्शन घडविण्याचा येथे प्रयत्न करीत आहे.

## पैसाफंड जोपासला

महाराष्ट्रात पैसाफंड अथवा औद्योगिक निधी उभारण्याची कल्पना त्यागमूर्ती कै. श्री. अंताजी दामोदर काळे यांनी काढली. पहिली काही वर्षे श्री. काळे यांना त्यांची कल्पना लोकांच्या गळी उतरविण्याकरिता खर्ची घालावी लागली. लोकमान्य टिळकांना ते भेटल्यावर पैसाफंडाची कल्पना कितपत मूळ धरू शकेल हे पाहण्याकरिता जी कामचलाऊ समिति नेमण्यात आली त्यात तात्यासाहेब एक प्रमुख सभासद होते. तात्यासाहेबांनी १९०३ मध्ये पैसाफंडासंबंधी सुजाण मत अजमावण्याकरिता एक प्रश्नावली तयार करून प्रसृत केली व तिच्या उत्तरांच्या संदर्भात टिपण बनवून ते कामचलाऊ समितीला सादर केले. त्याचा यथोचित विचार झाला व १९०५ मध्ये पैसाफंड ही संस्था रीतसर नोंदली गेली. पैसाफंडाचे पहिले अध्यक्ष मुंबईचे लोकमान्य टिळकांचे स्नेही कै. नानासाहेब देशमुख हे होते. स्थापनेपासून तात्यासाहेबांचे लक्ष संस्थेकडे होतेच. १९१३ मध्ये ते पैसाफंडाच्या कार्यकारी समितीचे सदस्य व पुढल्याच वर्षी चिटणीस झाले. श्री. नानासाहेब देशमुखांच्या मृत्यूनंतर तात्यासाहेब १९२९ मध्ये पैसाफंडाचे अध्यक्ष झाले व १९३५ मध्ये निवृत्त झाले. तात्यांनी पैसाफंडाबरोबरील त्यांच्या तीस–बत्तीस वर्षांच्या संबंधात पैसाफंडाची लोकप्रियता जशी वाढविली त्याप्रमाणेच पैसाफंड कारखान्यात विविध प्रयोग करण्यास प्रोत्साहन दिले. वस्तुतः पैसाफंडाचे कार्य विधायक होते, परंतु इन्दूरसारख्या मराठी अधिपती असलेल्या संस्थानात सदर निधी गोळा करण्यास बंदी होती. ती तात्यासाहेबांच्या खटपटीनेच उठली. पैसाफंड काच शाळेने—कारखान्याने—भारतातील काचधंद्याचा खऱ्या अर्थाने पाया घातला. सर थॉमस हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या पहिल्या औद्योगिक आयोगाने हिंदुस्थानातील काच-कारखान्यांना काच फुंकणारे कसबी कामगार पैसाफंड काचकारखाना पुरवीत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता. मराठी मन स्वदेशी कारखानदारीकडे वळविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पैसाफंडाने केले. तो पैसाफंड तात्यासाहेबांनी जोपासला, वाढीस लावला.

## कॉसमॉस व सेंट्रल कोऑपरेटिव्हबाबत कार्य

विधायक कार्य तात्यासाहेबांना नेहमीच प्रिय असल्याने त्यांनी असे कार्य करणाऱ्या संस्थांचे प्रवर्तन करण्यास जसा हातभार लावला, तसा त्यांना अडीअडचणीतून बाहेर काढण्यासही लावला. सहकारी चळवळीकडे ते स्वावलंबनाचे प्रभावी साधन या दृष्टीने पाहत. ‘ पतपेढ्या व स्वावलंबन ’ या विषयावर त्यांनी एक समर्थ लेख लिहिला. १९०६ साली पुण्यास कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी (आताची बँक) स्थापन झाली. पहिली पाच सहा वर्षे ती रुकुटुकु चालू होती. तिची पुनर्घटना करून जोम आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. तिचे कार्यवाहद्वय तात्यासाहेबांकडे सल्ल्याकरिता गेले व त्यांनी संस्थेच्या कार्यात लक्ष घालण्याची विनंती केली. तात्या सभासद झाले. त्यामुळे संस्थेकडे नवनवीन पतवान मंडळी आकृष्ट झाली. १९१५ च्या सुमारास ते सल्लागार मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे संस्थेच्या सभांना सदस्य मोठ्या संख्येने हजर राहू लागले व सरकारी अधिकाऱ्यांची उपस्थिती होऊ लागली. रजिस्ट्रारपासून सर्व अधिकारी संस्थेकडे अदबीने पाहू लागले. १९१८ साली कॉसमॉस सोसायटीने व्याजाचा दर वाढवावा असा प्रयत्न खुद्द रजिस्ट्रार साहेबांनी सोसायटीच्या सभेत येऊन करून पाहिला, परंतु त्या सभेचे अध्यक्ष तात्यासाहेब होते. त्यामुळे साहेबांचे काही चालले नाही व कमी दर चालू राहिला. कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील

तंटा सोडविण्याकरिता तात्यासाहेब त्वाद असताना ज्या चर्चा झाल्या त्यातूनच पुणे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचा जन्म झाला. सदर बँक १९१७ मध्ये नोंदली गेली. तात्यासाहेबांना तिचे पहिले भागधारक होण्याची व तिचे अध्यक्ष होऊन काम मार्गाला लावून देण्याची विनंती करण्यात आली. ती त्यांनी मान्य केली. १९१७ ते १९२३ पर्यंत सहा वर्षे ते बँकेचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दीत बँकेची, शेअर भांडवल व खेळते भांडवल या दृष्टीनी भराभर वाढ झाली. तिला स्वतःची इमारत लाभली. त्याची पायाभरणी तात्यासाहेबांच्या शुभहस्ते झाली. १९२६ साली सोलापूरला भरलेल्या प्रान्तिक सहकारी परिषदेचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. सहकारी पेढ्यांची व्याप्ती पतपेढ्यांपर्यंतच न राहता, अर्थकारणात उत्पादनाबरोबरच संपत्तीची वाटणी, संपत्तीची देवघेव, संपत्तीचा व्यय व संपत्तीक्षणाची व्यवस्था या बाबी येतात हे सांगून त्या प्रत्येक बाबतीत हवी तितकी सहकारिता करण्यास वाव आहे, असे त्यांनी प्रतिपादले. पतपेढ्यांच्या व्यवहारातील व कारभारातील खाचखळग्यांचा निर्देश त्यांनी केला व पतपेढीची पत म्हणजे पेढीतील सगळ्या सभासदांची मिळून बनलेली पत, या गोष्टींवर भर दिला.

### कॉमनवेल्थचे संस्थापक अध्यक्ष

साताऱ्याला वेस्टर्न इंडिया विमा कंपनी उर्जितावस्थेला आल्यावर श्री. द. वा. देशपांडे व श्री. रा. न. अभ्यंकर यांनी पुण्यास कॉमनवेल्थ विमा कंपनी काढण्याचे ठरवले. या कंपनीचे संचालक मंडळ विविध क्षेत्रांतील प्रमुख मंडळींचे बनविण्याची कोशिश त्यांनी केली. साहजिकच ते तात्यासाहेब केळकरांकडे गेले व त्यांना या नव्या कंपनीचे अध्यक्ष होण्याची विनंती त्यांनी केली. सहकारी चळवळ ही जशी समाजोद्धाराची चळवळ म्हणून तात्यासाहेबांनी त्यात रस घेतला त्याचप्रमाणेच विमा हा व्यापार-व्यवसाय असला तरी त्यात समाजसेवेचाही भाग असल्यामुळे या नवीन उपक्रमाकडे त्यांनी आपुलकीने पाहिले. कंपनीच्या संचालक मंडळाचे ते पहिले अध्यक्ष झाले व अनेक वर्षे राहिले. विमा कंपनीच्या प्रवर्तकांना काही आवश्यक गोष्टी कराव्या लागत. त्यात किमान पंचवीस हजार रुपयांचे सरकारी कर्जरोखे, काम सुरू करण्यापूर्वी सरकारकडे ठेवण्याची अट असे. त्यांची भरपाई करणाऱ्यात तात्यासाहेब होते. कॉमनवेल्थ कंपनीच्या घटनेत विवक्षित डिव्हिडंड दिल्यावर त्यावरील नफ्याचा काही अंश सार्वजनिक संस्थांना साहाय्य करण्यात खर्च करावा अशी तरतूद श्री. तात्यासाहेबांच्या सूचनेवरून करण्यात आली. मॅनेजिंग एजन्सीचा करार लहान मुदतीचा असावा यावरही त्यांचा कटाक्ष होता.

### महाराष्ट्रीय व्यापार-उदिमाचे प्रोत्साहक

तात्यासाहेब किर्लोस्कर-ओगल्यांना महाराष्ट्रीय कारखानदारांचे अग्रदूत मानीत. लोकमान्य टिळकांनी श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या बेळगावातील कारखान्याला भेट देऊन आशीर्वाद दिला होता. पुढे औंध संस्थानात कारखाना सुरू झाल्यावर त्यासंबंधी केसरीत पुरस्कार यावा अशी साहजिकच अपेक्षा होती. तेव्हा तात्यासाहेब स्वतः किर्लोस्करवाडीला जाऊन आले व त्यांनी केसरीत त्याबद्दल इष्ट असा अभिप्राय लिहिला. हे लो. टिळकांच्या हयातीत घडले. पुढे मुंबईस किर्लोस्कर पंपांचे दर्शनालय उघडले गेले ते तात्यासाहेबांच्या हस्ते. त्या वेळी त्यांनी श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर हे महाराष्ट्राचे हेन्री फोर्ड आहेत असा त्यांचा गौरव केला. कै. श्री. श्रीपादराव ऊर्फ आत्मारामपंत ओगले हे पैसाफंड काचशाळेत तयार झालेले. त्यांनी काढलेला काचकारखाना ही तात्यांना पैसाफंड काचकारखान्याची फलश्रुती वाटे. त्यांच्या कारखान्याबद्दल प्रोत्साहनपर लिहिण्याचा व त्याच्या अडीअडचणींना वाचा फोडण्याचा प्रसंग केसरी गमावीत नसे. जे किर्लोस्कर-ओगल्यासंबंधी तेच महाराष्ट्रातील लहान-मोठ्या इतर कारखानदारांबाबत त्यांचे धोरण असे. औद्योगिक महाराष्ट्र तात्यांना आपला भरवशाचा स्नेही मानी असे म्हणले तर त्यात अतिशयोक्ती नाही.

### केसरीचा व्यापारी-औद्योगिक महाराष्ट्र अंक

महाराष्ट्राचा व्यापार-उदिम म्हणजे आहे तरी काय, याचा आढावा घेण्याकरता १९३४ च्या लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त केसरीचा औद्योगिक व व्यापारी महाराष्ट्र अंक काढावा अशी योजना मी तात्यासाहेबांपुढे मांडली. तो अंक केसरीच्या आकाराच्या शंभर पृष्ठांचा तरी होईल व तो केसरीच्या नियमित वाचकांना नेहमीच्या किमतीत द्यावा असे मी सुचविले व भीत भीत आठ हजार रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक त्यांच्या पुढे मांडले असे मला स्मरते. इतर सहकाऱ्यांनी हा उपक्रम तोंडमिळवणी करणार नाही, तोट्यात जाईल, असे म्हटले तरी श्री. तात्यासाहेबांनी ती योजना मान्य केली. गोमांतकाचा व आजच्या महाराष्ट्राच्या व्यापार — उदिमाचा त्यांत आढावा घेण्यात आला होता. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुढील कामाकरता तो मोलाचा होता. त्यातच श्री वा. पुं. वर्दे यांनी महाराष्ट्राकरता व्यापारी बँकेची कल्पना मांडली व कै प्रा. वामनराव काळे यांच्या पुढाकाराने मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजने ती साकार केली. आर्थिक दृष्ट्या केसरीचा अंक फायदेशीर ठरला व तात्यासाहेबांना समाधान झाले.

### मराठा चेंबरचे सल्लागार

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची स्थापना करण्याचे जेव्हा मी १९३४ मध्ये योजले, तेव्हा त्या कल्पनेला तात्यासाहेबांचा आशीर्वाद तर मिळालाच पण ते चेंबरच्या सल्लागार मंडळाचे सभासद झाले. मराठा चेंबर स्थापन झाले, तेव्हापासून पंधरा वर्षे त्याचे कार्य केसरी कचेरीतून चालत असे. मराठी व्यापार-उदिमाचे प्रवर्तन करणारी संस्था म्हणून तात्यासाहेब केळकरांनी व त्यांच्याच बरोबर श्री. तात्यासाहेब करंदीकरांनी मराठा चेंबरकडे पाहिले व त्याला काहीही उणे पडू दिले नाही म्हणून ती संस्था आज वैभवात उभी आहे.

व्यापार-उद्यमी महाराष्ट्र तात्यासाहेब केळकरांचा नेहमी ऋणी राहील.

# वार्षिक अहवाल – उपयुक्ततेच्या दृष्टीने त्याचे स्वरूप बदलणार काय ?

( लेखक :—सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए. )

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. भारतात बऱ्याच ठिकाणी दुष्काळ पडला आहे, लोक अन्नटंचाईने हैराण झाले आहेत, त्यांचे हाल चालले आहेत, अशी वर्णने वाचून व टेलिव्हिजनवर अशा प्रकारची दृश्ये पाहून पाश्चात्य देशातील एका धर्मादाय संस्थेने आपला प्रतिनिधी परिस्थितीची पाहणी करण्यास भारतात पाठवला. हे प्रतिनिधी मुंबईत उतरले ताजमहाल हॉटेलात. त्या वेळी दिवाळीचा सण चालू होता. या प्रतिनिधींना पर्यटन कचेरीच्या अधिकाऱ्यांनी गाठले. त्यांच्याकडून यांना भारताच्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचे तसेच देशात अमलात येत असलेल्या नव्या विकास-योजनांचे ज्ञान झाले. खाजगी प्रवासी कंपन्यांकडूनही भारतातील प्रेक्षणीय स्थळे, नवी होणारी उंची हॉटेले, यांची माहिती मिळाली. हे परदेशी प्रतिनिधी थोडेसे गोंधळून गेले. त्यांना दुष्काळ, जनतेचे हाल, यासंबंधी कोणीच काही सांगेना. वर्तमानपत्रातही नेहमीच्याच बातम्या – मंत्र्यांचे सत्कार, त्यांची आश्वासने, छोटे मोठे अपघात, आंतरराष्ट्रीय राजकारणावर उलटसुलट विधाने आणि नजरेत भरतील एवढ्या चैनीच्या जिनसांच्या जाहिराती आढळल्या. शेवटी त्यांनी खाजगी रीत्या शहरात फेरफटका मारण्यास सुरुवात केली. श्रीमंत वस्त्यांपेक्षा गरीब वस्तींतच त्यांना जास्त आनंद, उत्साह, दिवाळीची आरास, वगैरे दिसली. त्यांना कळून चुकले की येथे दुष्काळाची छाया नसून आबादीआबाद आहे. लोक चैन करताहेत व सुखात आहेत. त्यांनी त्याप्रमाणे रिपोर्ट दिल्यावर त्यांच्या संस्थेने भारतातील जनतेसाठी द्यावयाची मदत दुसऱ्या देशांसाठी मंजूर केली. वास्तविक पाहता भारतातील शेतकरी वर्ग दुष्काळाने हैराण झाला होता. पण शहरात पी. एल. ४८० च्या धान्य पुरवठ्याने दुष्काळ जाणवत नव्हता आणि या प्रतिनिधींनी पाहणी करताना जो काळ निवडला तो दिवाळीचा सणासुदीचा असल्याने गरीब-वस्तीतही त्यांना आनंद, उत्साह दिसत होता. ऋण काढून सण साजरा करण्याची आमची प्रवृत्ती त्यांच्या लक्षात आली नाही. त्यांची सहजासहजी दिशाभूल झाली.

वर वर्णन केल्याप्रमाणेच अनेक वेळा एखाद्या उद्योगात घडत असलेल्या घटनांविषयी खरा अंदाज न लागल्याने संबंधितांची दिशाभूल त्या कंपन्यांचे वार्षिक अहवाल वाचून होत असते. उद्योगांच्या भवितव्याशी हल्ली फक्त उद्योगांचे संचालक व कामगार यांचेच हितसंबंध निगडित नसून सर्वत्र विखुरलेले भागधारक, ठेवीदार, ग्राहक, बँका, सप्लायर्स व सरकार आणि अखेर सर्व नागरीक यांचाही संबंध पोहोचतो. त्यामुळे या कंपन्यांचे वार्षिक अहवाल आणि नफातोटा-पत्रक वाचण्यास ही मंडळी उत्सुक असतात. वर्षाचे हिशेब ऑडिट होऊन पुढील सहा महिन्यांत प्रसिद्ध करण्याची जबाबदारी कंपनी कायद्याने घातली आहे. ही सहा महिन्यांची मुदत विविध विभागांचे, शाखांचे हिशेब तपासून एकत्र करून त्यानुसार लाभांश जाहीर करणे, वगैरे कामांसाठी ठेवली आहे. पण या अगोदर शक्य तितका अद्ययावत अहवाल प्रसिद्ध करण्याकडे कल मात्र फारच थोड्या कंपन्यांचा दिसतो. उशीरात उशीरा हा अहवाल प्रसिद्ध होत असल्याने कंपनीसंबंधी जे ताजे ज्ञान संबंधितांना व्हावयास हवे ते न होता त्यांना ऐतिहासिक माहिती वाचावी लागते व यातही त्यांची दिशाभूल होण्याची बरीच शक्यता असते.

नदीच्या वाहत्या पाण्याची खोली मोजण्यासाठी जर कोणी बांध घालून पाणी अडवून मग पाण्यात मोजमापक बुडवू लागला तर जशी चूक होईल तशीच चूक चालू व्यवहाराचे मोजमाप वर्षअखेरीचा बांध घालून मग त्या दिवसाची स्थिती जाहीर करण्यात होत असेल. वर्ष-अखेरीस कामे उरकण्याचा सपाटा, विक्री वाढविण्यासाठी किंवा दाख-विण्यासाठी केलेले प्रयत्न, अनावश्यक खर्च पुढील वर्षासाठी पुढे ढकलण्याचे निर्णय, या सर्वांचा परिणाम वार्षिक अहवालात प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारीवर उमटतो.

सर्वसाधारणपणे ठीक चालणाऱ्या कंपन्यांची वार्षिक उलाढाल १०-१५ % वाढणारच. त्यातही जर सार्वत्रिक भाववाढीमुळे विक्रीच्या किंमतीत वाढ झाली असेल अथवा सरकारी करांत लक्षणीय वाढ असेल तर हे विक्रीचे आकडे अधिक उत्पादन न होताही वाढतात. पण त्याच वेळी खर्चाच्या रकमाही वाढलेल्या दिसतात व निव्वळ नफा कमी होतो अगर गतवर्षीइतकाच राहू शकतो. तेव्हा या अशा बाह्य कारणांचा अहवालात प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीवर होणारा परिणाम सामान्य वाचकांच्या लक्षात न आला तर त्यांचे या कंपन्यांविषयीचे अंदाज निराळे होतात. वस्तुस्थिती न समजल्याने त्यांची फसगत होते. यासाठी भागधारकांनी त्या कंपन्यांच्या अध्यक्षांचे निवेदन काळजीपूर्वक वाचावे. अहवाल प्रसिद्ध होतात त्या वेळचे भाष्यही त्यात असते. कंपनीच्या भावी विस्ताराच्या योजनांची कल्पना त्यात मिळते व त्याप्रमाणे अंदाज बांधता येतात.

दिवसेंदिवस हे अध्यक्षांचे निवेदन अधिकाधिक माहितीपूर्ण व वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणारे होत आहे. धंद्यात येणाऱ्या अडचणी, सरकारी धोरणांचा उलटसुलट परिणाम, मालांना मिळणारी स्वदेशी व परदेशी बाजारपेठ यांची जशी माहिती मिळते तसे कंपनी खास लक्ष घालून अमलात आणीत असलेल्या काही अंतर्गत योजनांचे ज्ञानही होते. त्यावरून कंपनीचे

पुरोगामी धोरण व त्या दृष्टीने पडणारी पावले वाचकांना खात्री करून देतात की ही कंपनी स्थिर पायावर उभी करण्याचा प्रयत्न येथे चढत आहे. कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण योजना, त्यांच्यासाठी कल्याणकारी उपक्रम, कामगार – व्यवस्थापक संबंध, अनुभवी अधिकाऱ्यांना संचालक मंडळात प्रवेश, वगैरे माहिती वाचून त्या कंपनीच्या स्थिरतेविषयी एक विश्वास निर्माण होतो.

या दृष्टीने या वर्षी प्रसिद्ध झालेले श्री. राजाध्यक्ष यांचे हिंदुस्थान लिव्हर लि. चे निवेदन व इंडिया टोबॅको कं. लि. च्या अध्यक्षांचे निवेदन अभ्यासनीय आहे.

कंपनी कायद्यातील सुधारणांमुळे अनेक उद्योगांना यापूर्वी कधीही न द्यावी लागणारी किंवा कधीही न छापावीशी वाटणारी माहिती प्रसिद्ध करावी लागत आहे. धंद्यातील विविध उत्पादन वस्तूंची वार्षिक उत्पादनक्षमता, प्रत्यक्ष उत्पादन, तसेच उत्पादन खर्च, प्रसिद्ध करावे लागत आहेत. ही माहिती मिळवण्यासाठी कंपन्यांच्या अकाऊंट विभागांना प्रत्यक्ष उत्पादन विभागाशी संपर्क ठेवावा लागत आहे. या द्वारे त्यांनाही बरेच नवे ज्ञान प्राप्त होत आहे. ही माहिती सरकारला स्वतःसाठी हवी असती तर त्यांनी खाजगी रीत्या मागवली असती. पण ही माहिती सर्व संबंधितांनी लक्षात घ्यावी व त्यानुसार व्यवहार करावेत या अपेक्षेने जाहीर छापण्यास सांगितले जाते. आपल्याकडे शिक्षित पुष्कळ असले तरी सुशिक्षित अजूनही थोडेच आहेत. त्यामुळे ही माहिती बऱ्याच वेळा अहवालाची पाने वाढवण्यासच उपयोगी येते.

वार्षिक अहवालासंबंधी लोकांचे अज्ञान व एकंदर अनास्था यांचा योग्य तो फायदा बहुतेक संचालक मंडळी घेतात. हे वार्षिक अहवाल त्यामुळे बऱ्याच वेळा फक्त कायद्याने आवश्यक माहिती देतात; त्यातून योग्य तो बोध सामान्य वाचकांना होत नाही. पण त्यांच्या नजरेत भरेल अशी छपाई खास कागदावर जाहिरात कंपन्यांच्या मदतीने करून घेण्यात येते. जेथे योग्य वाटेल तेथे चढते मान दर्शवणारे रंगीबेरंगी आलेख, आकर्षक छायाचित्रे, यांची रेलचेल असते व या सर्व देखाव्यात अहवालाच्या आकडेवारीवर भाष्य मोजकेच सापडते. सामान्य वाचक ही कल्पक सजावट व डिव्हिडंडचा दर ( चांगला असेल तर ) पाहून सुखावतो व हा अहवाल रद्दीत टाकला जातो.

अकाऊंटट व्यवसायाला हे काळाचे आव्हान आहे की धंद्याचे वर्तमान स्वरूप दाखवणारी अहवाल-पद्धती त्यांनी शोधून काढायला हवी. हे अहवाल साप्ताहिक, मासिक स्वरूपात चालू घटनांवर भाष्य करणारे हवेत व त्यामुळे कंपनी करीत असलेली प्रगती, येणाऱ्या अडचणी व भावी काळात धंद्याला दिसत असणाऱ्या योग्य अशा संधी यांचे ज्ञान भागधारक, ठेवीदार, बँका यांना होईल व आज वर्षाचे प्रसिद्ध होणारे अहवाल त्याहून लहान काळाचे असतील. या अहवालांतून केवळ आर्थिक व्यवहारांचेच वर्णन न ठेवता कंपनीच्या उत्पादन यंत्रणेविषयी, महत्त्वाच्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांविषयी, कंपनीत चालणाऱ्या संशोधनाविषयीही माहिती असेल. कारण, याच सर्व घटकांचा परिणाम कंपनीच्या आर्थिक उलाढालीवर होत असतो. अशा तऱ्हेने सर्वांगपूर्ण अहवाल सरकारी कायद्याची वाट न पाहता आमचे उद्योगसंचालक प्रसिद्ध करण्यात प्रारंभ करतील काय ?


TEL : 88

Teleg : Address 'DICENTBANK'.

WITH BEST WISHES FOR A HAPPY DIVALI.

## The Belgaum District Central Co-operative Bank Ltd.,

BELGAUM

* * * *

HEAD OFFICE : 150 Bhandur Galli, Belgaum.
BRANCHES : 35 BRANCHES throughout the District.

* * * *

FINANCIAL POSITION AT A GLANCE AS ON 30-6-72.

| | | | |
|---|---|---|---|
| Authorised Share Capital | : Rs. 1,75,00,000. | Working Capital | Rs. 9,31,89,344. |
| Paid-up Share Capital | : Rs. 1,12,01,300. | Loans out-standing. | Rs. 7,25,81,504. |
| Reserve & Other Funds | : Rs. 46,48,182. | Net Profit for 71-72 | Rs. 14,57,894. |
| Deposits | : Rs. 5,45,44,544. | | |

* * * *

All types of Deposits are accepted in every office of the Bank. Safe Vault System is available at : Bailhongal, Saundatti and Belgaum Bazar Branches.

* * * *

For full particulars contact the Bank's office.

G. V. Ghodgeri
Vice President

R. V. Mulimani
Manager

M. S. Hosmani
President

# गीतेचा आपल्या राष्ट्राला चैतन्यकारक संदेश

**योगः कर्मसु कौशलम्ः योग म्हणजे कार्यक्षमता**

**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्।**

[ तस्मात् तू ऊठ, यश मिळव, आणि शत्रूंना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे.—श्रीमद्भगवद्गीता ]

"यदेव विद्यया करोति श्रद्धया उपनिषदात् तदेव वीर्यवत्तरं भवति" (कार्यक्षमतेचा पहिला घटक तांत्रिक ज्ञान, त्याला श्रद्धेची जोड पाहिजे आणि त्याबरोबर विषयाचे खोल आकलनही हवे—कोणत्याही क्षेत्रात कार्यक्षमता वाढविण्यास विद्या, श्रद्धा आणि उपनिषद् ह्यांची आवश्यकता आहे.)—छांदोग्य उपनिषद्

[ स्वामी रंगनाथानंद ह्यांच्या 'दि चॅलेंज ऑफ फ्रीडम्' ह्या मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद. ]

कठोर परिश्रम करण्याची असमर्थता मला भारतात सर्वत्र दिसून येते. एक प्रकारच्या आळशीपणाने आपणास जडत्व आलेले दिसते. त्याची मगरमिठी आपणास सोडविता आलेली नाही, आणि कोठलाही देश कठोर परिश्रम केल्याशिवाय मोठा होऊ शकत नाही. देशातील सार्वजनिक आणि खाजगी मालकीच्या बऱ्याच उद्योगधंद्यांच्या कचेऱ्यांवर ह्या आळसाची, ह्या सुस्तपणाची आणि सार्वजनिक जबाबदारी विषयींच्या अनास्थेची दाट छाया पडलेली दिसून येते. त्यांच्या कामाची ही पद्धत अतिशय दुःखदायक आहे. कारण, आपले राष्ट्र आर्थिक व सामाजिक दृष्ट्या खूपच मागासलेले आहे. आपल्यापैकी पुष्कळांना असे वाटते की ते पुढे यावे; पण नुसत्या वाटण्याने काय होणार? ही इच्छा कार्यान्वित केली पाहिजे; म्हणजे आपण कठोर श्रम करण्यास तयार झाले पाहिजे. आपल्या सचिवालयातून अधिक कामसूपणा, अधिक श्रम आणि अधिक समर्पित भावना दिसून आली पाहिजे. आपले पंतप्रधान निष्ठा हा शब्द पुन्हा-पुन्हा वापरतात. पण त्याचा अर्थ एखाद्या विशिष्ट राजकीय तत्त्वप्रणालीविषयी निष्ठा असा नाही. देशाविषयी निष्ठा, राज्यकारभारात अंगावर पडणाऱ्या मोठ्या जबाबदारीविषयी निष्ठा, असा त्याचा अर्थ आहे. ही निष्ठा आणि ही जबाबदारीची जाणीव एकदा झाली की लोकांत, अधिकाऱ्यांत आणि कामगारांत उत्साहाचे वारे संचारेल. आपणास आज कोणत्या प्रकारच्या उत्साहशक्तीची जरूरी आहे? माणसासमोर असणाऱ्या प्रश्नांशी मुकाबला करण्याची शक्ती आज पाहिजे आहे. ह्या प्रश्नांना जिंकून राष्ट्राला प्रगतीच्या व भरभराटीच्या रस्त्यावर नेऊन ठेवण्याच्या शक्तीची आपणास गरज आहे. अनेक शतके देशावर जी अवकळा पसरली आहे तीतून बाहेर काढण्यास दुसरी कोणतीही जादू आपणाजवळ नाही. म्हणून आज 'काम' 'कठोर श्रम' हाच एक मंत्र आहे. पण अशा श्रमाला बुद्धीचीही जोड असली पाहिजे; त्याच बरोबर काम करण्यात सांघिक सहकार्यही हवे.

### सर्वत्र सुस्तपणा

सर्व मोठी कामे सांघिक कामातूनच साकार होत असतात. सांघिक कामात आवश्यक असणारी दानत आणि सुबुद्ध कठोर श्रम हे जेव्हा आपण शिकू तेव्हाच स्वातंत्र्याने दिलेले आव्हान आपण स्वीकारू शकू. हे तत्त्वज्ञान आपणास शिकले पाहिजे आणि तेही जाणीवपूर्वक; कसे तरी नकळत नव्हे. जपान, जर्मनी आणि अमेरिका येथील लोक खूप श्रम करताना मी पाहिले आहेत. ते उत्साही असतात. काम करताना ते बोलत नाहीत. त्यांच्या वागण्यात एक प्रकारचा स्वाभिमान असतो. एक प्रकारचा भारदस्तपणा असतो. "कामाच्या वेळात काम करण्यासाठी मला वेतन दिले जाते; म्हणून मला माझी जबाबदारी पार पाडली पाहिजे, वेळ वाया घालवून चालणार नाही" अशी त्याची वृत्ति असते. हिंदमध्ये अनेक ठिकाणी मला ह्या वृत्तीचा अभाव दिसून आला. आपण आपला व लोकांचा वेळ फुकट घालवितो. त्यासाठी आपणास पैसे मिळत असतात. दिल्ली येथील बड्या सचिवालयातील नोकरांचा बराच वेळ गप्पागोष्टी आणि चहापाणी ह्यात जात असतो हे मी पाहिले आहे. राज्यकारभाराच्या यंत्रणेत हा जो सुस्तपणा आढळतो तो भारतात येणाऱ्या कोणत्याही परदेशाच्या नागरिकाच्या सहज लक्षात येतो. सुस्तपणाचा हा प्रश्न भारताच्या निरनिराळ्या भागांत मोठ्या प्रमाणावर आहे. काही राज्ये मात्र ह्या बाबतीत इतरापेक्षा बरी आहेत. महाराष्ट्र हे एक असे राज्य आहे. तामीळनाडू आणि केरळही इतरांच्या मानाने पुढे आहे. ह्या राज्यांतून चांगले काम करण्यात येत आहे. तेथील कार्यक्षमता आणि कामाविषयीची तत्परताही अधिक वरची आहे. पण जगाशी तुलना करता आपण सर्वच खूपच खालच्या पातळीवर आहो.

### समर्पित भावनेची जरूरी

इथेच नव्या समर्पित भावनेची गरज आहे; आणि ही भावना फक्त पगार आणि भत्ते ह्यांच्यामुळे निर्माण होत नाही. त्यापलीकडील कोणत्या तरी ठिकाणी तिचा उगम होतो. भारतात हे ठिकाण दिसत नाही. पगार वाढू शकतात; परंतु एखाद्या राष्ट्रीय कार्याविषयी वाटणारी व्यक्तीगत निष्ठा मात्र स्वतःच्या प्रयत्नाखेरीज वाढू शकत नाही. अशी निष्ठा असेल तर प्रत्येकजण स्वतःला असे म्हणेल "मी ह्या देशाचा नागरिक आहे. कित्येक शतके मी स्वतंत्र नव्हतो. आज मी स्वतंत्र आहे. म्हणूनच माझ्या देशाबद्दल माझी काही जबाबदारी आहे. त्याची वाढ व विकास व्हावा

अशी माझी इच्छा आहे.'' आपण आपल्या राष्ट्राचा एक घटक आहो, आपण त्यात केवळ राहातो आहोत असे नाही; त्याच्या करताच आपण आहो; अशी भावना निर्माण झाली की एकदम एका नव्या शक्तीची जाणीव होऊ लागेल. आज अशा शक्तीचा आढळ होत नाही. आपण सर्व प्रथम भारताचे नागरिक आहो; सचिवालयातील एखादा नोकर अगर इंजिनिअर अथवा डॉक्टर मागाहून आहो, अशी भावना असली पाहिजे. एखाद्याने जर तुम्हांस विचारले, "तुम्ही कोण आहात ?" तर मी भारताचा नागरिक आहे, असे उत्तर तुम्ही दिले पाहिजे. पुन्हा जर विचारले की "तुम्ही काय काम करता ?" तर तुम्हाला "मी सरकारी नोकर आहे, अमुक आहे, तमुक आहे" असे सांगता येईल. भारताचा नागरिक ह्या नात्याने तुमच्यावर असणारी प्राथमिक जबाबदारी तुमच्या इतर सर्व व्यक्तित्वाच्या पैलूंना स्फूर्ती देत राहील. स्वतंत्र भारताचे नागरिकत्व ह्यापूर्वी आपणास कधीही लाभलेले नव्हते. भारतातील पूर्वीची सर्व राज्ये राजांची अगर सम्राटांची, अगर लष्कराच्या सेनापतींची होती. आज घटनेत स्वाभिमानपूर्वक नमूद करण्यात आल्याप्रमाणे आपण लोकाधिष्ठित राज्य स्थापन केले आहे. भारताच्या दीर्घ इतिहासात प्रथमच भारतीय शासन लोकाधिष्ठित झाले आहे. ते आपली शक्ति लोकांपासून मिळविते आणि ही शक्ती शतगुणित करून पुन्हा लोकांच्याच स्वाधीन व्हावी अशी अपेक्षा आहे. आता राजे नाहीत व सम्राटही नाहीत. भारतात जेव्हा प्रजासत्ताकाची घोषणा करण्यात आली, त्यावेळी पूर्वी राजमुकुटात केंद्रित झालेले सार्वभौमत्व कोट्यावधी नागरिकांत वाटले गेले. ह्याच प्रजासत्ताकाचे आपण आज नागरिक आहोत ही जाणीव ठेवली तर आपण स्वतःपासूनच खूप सामर्थ्य मिळवू व साठवू शकू. प्रत्येकाला ते मिळविता येईल; पण तशी इच्छा व हेतू दिसत नाही सचिवालयात आणि जीवनाच्या अनेक अंगात कोणत्या एका विषयाचा ऊहापोह व्हावयास पाहिजे असेल तर तो प्रेरणेचा आहे.

### प्रेरणेची आवश्यकता

कोणत्या प्रकारच्या प्रेरणा आपणास अधिक चांगले काम करावयास लावतील ? भारतात आपणा सर्वांची अशी मूर्ख समजूत झाली आहे की फक्त पैसाच अशी इष्ट प्रेरणा देऊ शकेल. पण काही मर्यादेपलीकडे पैसा आपण जे व जितके पेरले असेल त्याच्यापेक्षा अधिक देऊ शकत नाही. आपणासाठी एकच इष्ट प्रेरणा असू शकते ती म्हणजे आपण ह्या देशाचे नागरिक आहोत आणि त्याचा नाश आपणास ओढवून घ्यावयाचा नाही ही जाणीव. आपण पूर्वी फार भोगले आहे. आता देश कालांतापर्यंत स्वतंत्र राहील ह्याची हमी घेतली पाहिजे, आणि हे स्वातंत्र्य वाढवून आपल्या लक्षावधी लोकांपर्यंत पोचविले पाहिजे. आज लक्षावधी लोकांपुरता स्वातंत्र्य हा केवळ एक शब्दच राहिला आहे. नागरिकत्वाचा अर्थ म्हणजे ही निष्ठा व जबाबदारीची जाणीव होय. आतापर्यंत भारतात तिची वाढ कधीही विस्तृत अशी झालेली नाही. म्हणूनच आपण सर्व गोष्टी सहज प्राप्त होतात असे समजतो आणि देशापुढील प्रश्न स्वतःचे न समजता दुसऱ्या कोणाचे तरी आहेत असे मानतो. आज आपल्या देशात लोकशाही आहे. पण आपल्या लक्षावधी लोकांना ती अर्थपूर्ण वाटावी अशी जर इच्छा असेल तर तिची फळे व आनंद त्यांच्यापर्यंत पोचविली पाहिजेत. मध्यवर्ती व राज्य सरकारांची कारभार यंत्रणा कार्यक्षम आणि लोकांना प्रतिसाद देणारी असेल तरच ही गोष्ट होऊ शकेल. कारभारातील प्रत्येक माणसाने प्रथम खराखुरा नागरिक बनले पाहिजे आणि देशाच्या बांधणीच्या थोर कामात स्वतःला वाहून घेतले पाहिजे. आपणापुढे हे सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे. राज्यकारभारात निष्ठा व राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव कशी आणावी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. सचिवालयातील रूक्ष चौकटीत काम करताना बाह्य जीवनापासून अलिप्त राहिल्यामुळे आपण स्थितीप्रिय होण्याचा संभव असतो. कारण आपल्या भोवतालच्या जीवन प्रवाहाची आपणास कल्पना नसते. आपल्या वृत्तीत बदल कसा घडून येईल आणि अंतःकरणात गतिमानता कशी उत्पन्न होईल ? राष्ट्राच्या बांधणीत आपण पूर्णपणे समरस कसे होऊ ?

### 'कल्पक सहानुभूति'

आपण स्वतःमध्ये एक नवी कर्तृत्वशक्ती निर्माण केली पाहिजे हे ह्या प्रश्नाचे उत्तर आहे. ह्या शक्तीला मी 'कल्पक सहानुभूती' असे नाव दिले आहे. भारताच्या ५५ कोटी लोकांपैकी मी एक आहे. त्यांच्या मनाची व हृदयाची स्पंदने मला अनुभवता आली पाहिजेत. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या कारभारावर आपण कल्पनाशून्य असल्याची टीका करीत होतो. ती राजवट काही वेळा अतिशय कार्यक्षम असे; पण कल्पकतेच्या दृष्टीने ती अगदी दरिद्री होती. आज आपणास एक प्रकारची 'कल्पक सहानुभूति' विकसित करावयाची आहे. अशा सहानुभूतीच्या साह्याने आपण खऱ्याखुऱ्या अर्थाने नागरिक होऊ आणि कारभार पाहण्याचे महत्त्वाचे सामाजिक कार्य करू शकू. शासकीय कारभार करणाऱ्या माणसाचे पहिले काम नागरिक ह्या नात्याने आपले विशिष्ट काम करण्याचे आहे. इतर लोक उदा. डॉक्टर्स, नर्सेस, जशी आपआपली कामे करतात तसेच त्यानेही केले पाहिजे. माझ्या नागरिकत्वाची आणि त्यामुळे अंगावर पडणाऱ्या जबाबदारीची जाणीव झाली की मी सांगितलेली 'कल्पक सहानुभूति' उद्भूत होते. आता ती प्रत्यक्ष काम कसे करते ? मी सचिवालयात सुखद हवामान राखणाऱ्या खोलीत बसलो आहे. तेथे कामाच्या फाइल्स येत असतात. ह्या फाइल्समधून दूरवर पसरलेल्या लक्षावधी लोकांच्या जीवनातील प्रश्न असतात; तसेच त्यांचे भवितव्यही असते. प्रत्येक फाइल मला लोकांची अपरंपार दुःखे सांगत असते. त्यांच्या सुख-दुःखाला साद-प्रतिसाद देण्याची जबाबदारी माझ्या स्थानामुळे माझ्यावर पडलेली असते. दूर असणाऱ्या

लोकांच्या दुःखांची जाणीव जेव्हा मी माझ्या कल्पनाशक्तीने घेतो तेव्हा त्यांच्याशी मी परिचयच करून घेत असतो. त्यामुळे मला नव्या शक्तीचा लाभ होतो. मी एखाद्या खांबासारखा अचल राहात नाही. मी मनुष्य म्हणून खडबडून जागा होतो व कार्यरत होतो. माझ्या भोवतालच्या सळसळणाऱ्या जीवनाचा मी अनुभव घेऊ लागतो आणि मग चक्रे जोराने फिरू लागतात. जबाबदारीची खरी जाणीव झाली आणि तिला 'कल्पक सहानुभूती' ची जोड मिळाली की कोणताही अधिकारी त्याच्यापुढे येणाऱ्या प्रश्नांचा विचार रोज केवळ मामुली काम म्हणून न करता लक्षावधी लोकांच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या व इच्छांच्या दृष्टीने करू लागतो. शासनाच्या कार्यकक्षेत अनेक लोक असतात. त्यांच्यापैकी काही महत्त्वाच्या जागी असतात. लोकांची वाटचाल प्रगतीच्या व भरभराटीच्या दिशेने होणार की पराभव, दुःख आणि कुचंबणा प्राप्त होण्याच्या दिशेने होणार, हे त्यांच्यावर अवलंबून असते. ह्या जबाबदारीच्या जाणीवेमुळे त्यांना अधिक खडतर श्रम करावे असे वाटले पाहिजे. त्याचबरोबर त्यांनी अधिक कल्पक सहानुभूतीने काम केले पाहिजे. कामाचे हे नवे तत्त्वज्ञान आपण भारतीयांनी स्वीकारले पाहिजे व कृतीत आणले पाहिजे.

### सार्वजनिक हितबुद्धी

भारतात सार्वजनिक हितबुद्धी फारच अल्प प्रमाणात दृग्गोचर होते. शतकानुशतके आपण मूलतः स्वतः पुरतेच पाहात आलो आहोत. प्रत्येकजण आपल्या पुरते पाहात असे; दुसऱ्याचे काय झाले ह्याची त्याला पर्वा नसे. धर्मात सुद्धा आपण वैयक्तिक मोक्षाचेच ध्येय ठेवले. खरे म्हणजे आपली धर्मासंबंधीची ही समजूत चुकीची आहे. आपले तत्त्वज्ञान, विशेषतः गीतेतील महनीय तत्त्वज्ञान, सेवेची व समर्पणाची भावना शिकविते. पण कसे कोणास ठाऊक, ह्या तत्त्वज्ञानाने आपणाला स्फूर्ती दिली नाही. आपल्याला प्रेरणा दिली ती आपल्या क्षुद्र अहंभावाने, आपल्या स्वार्थी हितसंबंधांनी आणि आपल्या फायद्याने. परिणाम असा झाला की, आयुष्याच्या शर्यतीत आपण स्वतःपुरतेच पाहण्यास शिकलो; मागे राहाणाऱ्याबद्दल विचार केला नाही. हेच आपले धोरण झाले. म्हणूनच आपल्या स्वातंत्र्याचा नाश झाला आणि कित्येक शतके आपण गुलामगिरीत काढली. त्या अंधःकारमय आणि निराशेच्या गर्तेतून थोर विचारवंतांनी आणि पुढाऱ्यांनी आपणांस बाहेर काढले. गेल्या १५० वर्षांत असे अनेक थोर पुरुष आपणास लाभले. गेल्या शतकात राजा राममोहन रॉय व स्वामी विवेकानंद होऊन गेले तर आधुनिक काळात लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधीजी, असे किती तरी थोर स्त्री-पुरुष होऊन गेले आणि त्यांनी आपणांस नवी दृष्टी दिली. आज आपणांपैकी प्रत्येकाने त्यांचे तत्त्वज्ञान आत्मसात केले पाहिजे. तरच भारतामधील बदलत्या समाजात आपण जागच्या जागी खिळून राहणार नाही. आपल्या भोवतालच्या राष्ट्रीय जीवनाच्या ओघात जेव्हा आपण मिसळून जातो तेव्हा आपले व्यक्तित्व लोपते. आपण समाजातील एक माणूस होतो; माणूस ह्या शब्दाला अर्थ प्राप्त होतो. आसपासच्या इतर माणसांच्या संदर्भात केवळ स्वतःभोवती फिरणाऱ्या आत्मकेंद्रित निष्ठेच्या कोषातून बाहेर पाडून अधिक विशाल जाणीव करून देणाऱ्या तत्त्वज्ञानाची आज आपणास गरज आहे.

### 'योगा'चा खरा अर्थ

गीतेत भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'योगी' हो असा उपदेश केला आहे; पण ह्या शब्दाचे स्पष्टीकरण केले पाहिजे. भारतामधील राज्यकारभाराला आणि सार्वजनिक जीवनाला जर कोणत्या एका अर्थपूर्ण शब्दापासून स्फूर्ती मिळण्यासारखी असेल तर तो शब्द 'योगी' हा आहे. जोपर्यंत आपण आपल्या क्षुद्र स्वार्थाची आणि सुखाची चिंता वाहतो तोपर्यंत तुम्हाला योग साधणार नाही. प्राणी योगाचे आचरण करीत नाहीत. त्यांना फक्त त्यांचे सुखच दिसत असते. माणूस मात्र योगाचे आचरण करतो. कारण, त्याचे जीवन त्याला स्वतःच्या छोट्या व्यक्तिजीवनाच्या पलीकडे नेते आणि इतर लोकांच्या सुखाशी व हिताशी त्याचा संबंध घडवून आणते. जे तत्त्वज्ञान माणसाला वैयक्तिक जीवनाच्या मर्यादा ओलांडून सार्वत्रिक जीवनात कार्यरत करते व ठेवते त्या तत्त्वज्ञानाला भगवद्गीतेत 'योग' असे म्हटले आहे. "काम करण्यासाठी मी येथे येतो. कारण काम केल्याशिवाय मी जगू शकत नाही. परंतु मला फक्त माझ्या जगण्याचा विचार करून चालणार नाही. माझ्या येथील स्थानाच्या कक्षेत इतर अनेक लोकांच्या सुखाचा विचार येतो. म्हणून माझ्या जीवनाचा व कार्याचा मी अधिक उदार दृष्टीने विचार केला पाहिजे" ह्या मनोवृत्तीला भगवद्गीतेत 'योग' असे नाव आहे. कृष्ण अर्जुनाला म्हणतात, "हा योग फार प्राचीन आहे. त्याला मोठमोठ्या क्षत्रियांनी प्रारंभ केला; पण कालौघात तो नष्ट झाला. मी तो तुला पुन्हा शिकवीत आहे. कारण तू माझा भक्त आहेस आणि पुरुषोत्तम आहेस. म्हणून मी तुला योगाचे गहन तत्त्वज्ञान सांगत आहे. ह्या तत्त्वज्ञानामुळे तू लक्षावधी लोकांच्या सुखाची व हिताची निश्चिती प्राप्त करून घेशील." शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात हा योग नष्ट कसा झाला अशी पृच्छा केली आहे. तिला उत्तर देताना ते म्हणतात की हे तत्त्वज्ञान जेव्हा दुर्बलांच्या आणि मनाची शीस्त नसलेल्या लोकांच्या हाती पडले तेव्हा ते कमजोर झाले व त्याचा क्षय झाला. भारतात हेच झाले. आपण हे तत्त्वज्ञान निसत्त्व व स्वस्त केले. धर्म हा आपण एक सस्ता माल केला आहे. त्यात काही सार राहिलेले नाही. मोठ्या भव्य कल्पना समजावून घेण्याची पात्रताही आपण गमावून बसलो आहोत. आपण शारीरिक व मानसिक दृष्ट्या अशक्त आहोत. आपल्याजवळ इच्छाशक्तीच राहिलेली नाही. त्यामुळे आपण थोर तत्त्वज्ञाने दुबळी करतो आणि अखेर त्यांचा

*With Best Compliments From*

# M/S OGALE GLASS WORKS LTD.

**Pimpri, Poona 18 ( Maharashtra State )**

**Manufacturers of Tumblers and Jars**
**Durable and most convenient for every use.**

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे - | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी
मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. ९.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

नाश करतो. गीतेचे तत्त्वज्ञान समजण्यासाठी आपणांस मनाच्या सामर्थ्याची आणि शिस्तीची फार मोठी आवश्यकता आहे. ते असेल तरच ह्या तत्त्वज्ञानाच्या गहन व खोल मिती आपणांस दिसू शकतील. लो. टिळक आणि महात्मा गांधीसारख्यांना गीतेचे बळ जाणवले. कारण ते स्वतः सामर्थ्यवान होते. स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे की, एखाद्या मशकाला सिंहाचे बळ काय समजणार ? ते कळेल गजराजाला. आपण जर मशकासारखे असलो तर आपणांस ह्या महनीय तत्त्वज्ञानाची शक्ती कशी कळणार ? आपण जेव्हा अंतःसामर्थ्याचा विकास करू, आपली क्षुद्र मने व हीन वृत्ती जेव्हा भिरकावून देऊ, तेव्हाच आपणांस विशाल मनोवृत्ती प्रतीत होतील आणि भगवद्गीतेचा थोर संदेश आपणांस नव्या सामर्थ्याने आकलन होईल.

### कारभाराची कार्यक्षमता

योगाचे स्वरूप काय आहे ? भगवद्गीतेत म्हटले आहे "योग म्हणजे कर्म करण्याची कुशलता." योगाची व्याप्ती सांगणारी ही उक्ती लक्षात घेण्यासारखी आहे. योग म्हणजे प्राणायाम अगर कुंडलिनीची जागृती अशासारख्या कल्पना आपल्या मनात रुजल्या आहेत. त्या प्रथम काढून टाकल्या पाहिजेत. श्रीकृष्णासारख्या विभूतींची विशाल दृष्टी समजून न घेता लोक बारिक सारिक तपशिलात स्वतःला हरवून बसले आहेत. योग म्हणजे कर्मकुशलता अथवा कृतीत दिसून येणारी विशारदता. ह्याचा अर्थ काय ? कारभारातील कुशलता, कामातील कुशलता अगर तांत्रिक कुशलता असा त्याचा अर्थ आहे. ह्या तऱ्हेची कुशलता आज आपण भारतात आणीत आहोत. व्यावहारिक अगर शास्त्रीय कुशलता. ज्या ज्या ठिकाणी ही कुशलता आहे तेथे तेथे १० रुपयांत १०० रुपयांचे काम होते असे दिसून येते. ही कार्य-कुशलता वाढविण्यासाठी भारतात सर्वत्र नवीन प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम चालू करण्यात येत आहेत. शिक्षकाला तो अधिक कुशल शिक्षक व्हावा म्हणून प्रशिक्षण देण्यात येत आहे. नर्स, कारभारी, इत्यादींना ह्याचसाठी पुन्हा शिकविण्यात येत आहे. ही कुशलता प्रशिक्षण केल्यानेच येते पण हे प्रशिक्षण केवळ खात्याच्या नियमांचे अगर कारभाराच्या यंत्रणेचे असता कामा नये. त्यामुळे काम करणारांत समर्पणाची भावना व निष्ठा उत्पन्न झालीच पाहिजे. सार्वजनिक हितासाठी आपण काम करीत आहो ह्याची तीव्र जाणीव निर्माण झाली पाहिजे. एखाद्या विवक्षित क्षेत्रातील कार्य-क्षमता ह्या गुणांमुळे उत्पन्न होते. डॉक्टर्स, नर्सेस व शिक्षक आपले अभ्यासक्रम संपवून बाहेर पडताना मी पाहिले आहेत; पण त्यांची कार्यक्षमता वाढलेली दिसली नाही. कारण त्यांच्या कामाचे उद्दिष्ट अतिशय खालच्या दर्जाचे होते. देशाकरिता काम करण्याची भावना असेल तरच कार्यक्षमतेत वाढ होऊ शकते.

### कार्यक्षमतेची व्याख्या

अशा कार्यक्षमतेचे छांदोग्योपनिषदात फार चांगले वर्णन केले आहे. उपनिषदात कार्यक्षमतेची व्याख्या अशी केली आहे. 'कार्यक्षमतेसाठी पहिली आवश्यकता विद्येची म्हणजे एखाद्या विषयाच्या संपूर्ण तांत्रिक ज्ञानाची असते. दुसरी आवश्यकता श्रद्धेची असते. आपली स्वतःवर आणि आपण करीत असलेल्या कामावर पूर्ण श्रद्धा असली पाहिजे, आणि विषयाचे सखोल ज्ञान विचारपूर्वक मिळविलेले असले पाहिजे. थोडक्यात विद्या, श्रद्धा, सखोल ज्ञान, ह्यांची एखाद्या क्षेत्रात कार्यक्षमता मिळविण्यास जरूरी असते.' तांत्रिक ज्ञान ही कार्यक्षमतेची एक बाजू आहे. केवळ त्यामुळेच कमाल कार्यक्षमता साध्य होत नाही. त्याच्या जोडीला श्रद्धाही असली पाहिजे. स्वामी विवेकानंद श्रद्धेवर अतिशय जोर देत असत. दुसऱ्या कोठल्याही देशापेक्षा आपल्या देशाला श्रद्धा बाळगण्यास शिकणे फार आवश्यक आहे. कारण, स्वतःवरच्या श्रद्धेशिवाय इतर सर्व गोष्टींवर आपली श्रद्धा आहे. आपली ३३ कोटी देवदेवतांवर श्रद्धा आहे. पण ते आपल्या मदतीला कधीच आले नाहीत. स्वामी विवेकानंद म्हणत, "प्रथम आपल्यावर श्रद्धा पाहिजे, मग दुसऱ्यावर श्रद्धा पाहिजे आणि मग देवदेवतांवर श्रद्धा असावी." आपली आपणावरच जर श्रद्धा नसेल तर दुसऱ्या श्रद्धांचा उपयोग होणार नाही.

### श्रद्धेचे महत्त्व

म्हणून श्रद्धा ही फार महत्त्वाची आहे. तीच आज भारतात नष्ट झाली आहे. अश्रद्धेच्या रोगाने आपल्या सार्वजनिक जीवनात घर केले आहे; आणि आपली हृदये व मने नष्ट करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या श्रद्धाहीनतेलाच इंग्रजीत नाक उडविण्याची मनोवृत्ती म्हणतात. मनोवृत्तीत सर्व नकारात्मक शक्तींचा समावेश असतो. प्रत्येक मूल्याची आपण टिंगल करतो. आपण कोणतीच गोष्ट मनापासून करीत नाही. ही वृत्ती मरणापेक्षाही वाईट आहे. म्हणून देशावर श्रद्धा ठेवा, त्याच्या भविष्य कालावर श्रद्धा ठेवा, आणि तो भविष्यकाल उज्ज्वल करण्याच्या कामी आपण हातभार लावू शकतो हेही विसरू नका. अशा श्रद्धेने चमत्कार वाटण्यासारखी कामे होतात. जो मनुष्य अज्ञ असतो व श्रद्धाहीन असतो तो स्वतःचा नाश करतोच; पण दुसऱ्याचाही असाच नाश करतो. म्हणूनच श्रद्धा हा दुसरा गुण अतिशय महत्त्वाचा ठरतो. आणि शेवटी आपण विचारी मनो-वृत्तीची जोपासना केली पाहिजे. आपल्या देशाला खूप विचार करण्याच्या संवयीची फार जरूरी आहे. पण स्वातंत्र्यानंतर आपण पहिला बळी दिला तो विचारशक्तीचा. आपण सगळ्या गोष्टी सहजप्राप्त, सुखाने मिळणाऱ्या आहेत असे समजतो. आपणांला स्वातंत्र्य मिळाले ते अगदी अनपेक्षित. मग आपण स्वस्थ बसलो आणि स्वातंत्र्याची फळे चाखण्याची इच्छा धरली. परिणामी जिकडे तिकडे अनावस्था पसरली; ह्या स्वयंतुष्टतेवर पहिला आघात चीनच्या आक्रमणाने झाला; मग पाकिस्तानच्या

आक्रमणाने धक्का दिला. तेव्हा कोठे आपण जागे झालो. माणसाची प्रगती विचाराने होते. आपल्या प्राचीन संस्कृतीप्रमाणेच इतर थोर संस्कृतीही विचारातूनच उगम पावलेल्या आहेत. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचा उगमही खोल शास्त्रीय, सामाजिक व राजकीय विचारमंथनातूनच झाला आहे. ह्या राष्ट्राला जर पुन्हा मोठेपणा प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर तो विचारमंथनानेच मिळेल; स्वयंतुष्टतेने नाही. स्वातंत्र्यानंतर आपण खूप बडबड केली; विचार मात्र फार थोडा केला. आता उलटे केले पाहिजे; कमी बोलणे, अधिक विचार करणे आणि अधिक काम करणे हे आपले ध्येय असले पाहिजे.

### कमी बोला, अधिक काम करा

आपणा सर्व भारतीयांत उठसुठ बडबडणे हा मोठा दोष राहून गेला आहे. विवेकनंदांनी आपल्या एका भाषणात त्याचा उल्लेख केला आहे. कमी बोला आणि अधिक काम करा असे त्यांचे सांगणे आहे. तुमचे राष्ट्रावर प्रेम असेल तर ते कृतीने दाखवा; वेळी-अवेळी तोंडाची वाफ दवडून नव्हे. कमी बोलण्यामुळे आपण विचारप्रवण होतो आणि कृतीला प्राधान्य देतो. "उभे राहा, आळस सोडा, झोपी जाऊ नका," हाच उपनिषदाचा संदेश आहे. आपण फार काळ आळसात घालविला आहे. दीर्घकाळ झोपून राहिलो आहो. ही वेळ झोपण्याची नव्हे व रडण्याचीही नव्हे. आपणांस किती तरी गोष्टी अजून करावयाच्या आहेत. भगवान् कृष्ण म्हणतात :" उभे राहा; माणसाला साजेशी कीर्ती मिळवा; शत्रूला जिंका आणि ह्या मर्दांनी देशात सार्वभौम सत्तेचा आनंद लुटा." भारताचे नागरिक व्हा; दारिद्र्य, अन्याय आणि मागासपणा ह्यांना नामोहरम करा; आणि नागरिकत्वाची मौज लुटा. ह्या मोठ्या कार्यात तुमचाही वाटा आहे. श्रीकृष्ण आज प्रत्येक नागरिकाला हा उपदेश ऐकवीत आहेत.

---

### वाघ-वाघिणींची विमानमार्गे देवघेव

पांढऱ्या रंगाची एक वाघीण, दोन वर्षे वयाची सीता, ब्रिटनमधून भारतात १९ ऑक्टोबर रोजी विमानाने पाठविण्यात आली. तिच्या बदली एक वाघ २७ ऑक्टोबर रोजी विमानाने ब्रिटनला पाठविण्यात आला.

---

### ॲस्फॉल्टसाठी ह्यापुढे पिपे नाहीत

रस्ते करण्यासाठी ॲस्फॉल्ट किंवा बिटयुमिन वापरण्यात येते, त्यासाठी पोलादी पिपांचा उपयोग करण्यात येतो. ही पिपे एकदा उघडली की पुनः त्यांचा उपयोग करता येत नाही. पिपांसाठी लागणारे पोलाद आयात करावे लागते. तेव्हा ह्यापुढे पोलादी पिपांऐवजी रेल्वे वाघिणी आणि रोड टँकर्स ह्यातून ॲस्फॉल्टची वाहतूक केली जाईल.


ही दिपावली व नूतन वर्ष आमच्या ग्राहकांस, सभासदांस व हितचिंतकांस सुखाचे व समृद्धीचे जावो.

| शेअर भांडवल | एकूण ठेवी |
| --- | --- |
| २,४२,२००=०० | ११,०१,२७९=०५ |

सभासदांना दिलेली कर्जे
१५,७७,८०५=४३

मुदत ठेवीवर आकर्षक व्याज
सोने-चांदी दागिन्यांवर वाजवी दरात कर्जे

*सिन्नर तालुक्याची एकमेव बँक*

## श्री सिन्नर व्यापारी सहकारी बँक लि., सिन्नर, जि. नासिक

मधुकर शांताराम गुजराथी — व्हाइस चेअरमन
हरिश्चंद्र नारायणभाई गुजराथी — चेअरमन
देवकिसन बस्तिरामशेठ सारडा — संचालक
जगन्नाथसा भिकुसा क्षत्रिय — संचालक
भानुदासशेठ भिकुसा क्षत्रिय — संचालक
वासुदेवराव विनायकराव पवार — संचालक
श्रीरामशेठ चुनीलाल लड्डा — संचालक
पी. सी. लाणकर — मॅनेजर
स. गो. परदेशी — अकौन्टन्ट



◆इचलकरंजीच्या होतकरू व कर्तबगार कारखानदार व्यापारी बंधूंच्या उत्कर्षास साहाय्यभूत झालेली इचलकरंजीतील एकमेव नागरी बँक◆

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.,

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. २२३६

| | रु. |
| --- | --- |
| अधिकृत शेअर्स भांडवल | १०,००,००० |
| भरलेले भांडवल | १२,५९,६०० |
| रिझर्व्ह फंड | ५,१४,००० |
| इतर फंडस् | ९,१५,१०० |
| खेळते भांडवल | १,७२,१३,७०० |

ठेवीचे दर :- चालू १ टक्का
सेव्हिंग्ज ४ टक्के
मुदत ठेव ६·५० ते ८·५० टक्के
कॉल डिपॉझिट ५·५० ते ६·५० टक्के
कर्जाचा दर ९ ते १२ टक्के

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. श्री. ज. दांडेकर — मॅनेजर
श्री. स. मा. मुरदंडे — चेअरमन

# नंगा बाजार

( लेखक :— श्री. चिं. काळे, एअर इंडिया, मुंबई )

( १ )

स्थळ:— पोफळी — टेकचंद आम्रावालाचे मिठाईचे दुकान. काळी विजार आणि पांढरा बुशशर्ट घातलेला एक इसम येतो आणि म्हणतो, "माझे नाव ए. बी. नंगा. इंडिपेंडंट ट्रॅन्सपोर्ट कं. ( आय. टी. सी. ) चा मी पर्चेस ऑफिसर आहे. तुमची मिठाई फार चांगली असते असे आम्ही ऐकले आहे. आम्ही विकत घेऊ इच्छितो. तुम्ही एक सँपल बॉक्स बनवून द्या,' ती शेजारच्या नारळी गावातल्या आमच्या कचेरीत घेऊन जाईन." टेकचंदने त्याप्रमाणे सँपल बॉक्स दिली. आय. टी. सी. सारख्या सुप्रसिद्ध कंपनीचा सप्लायर होणे मानाचे समजले जात असे.

( २ )

पोफळीच्या टेकचंदला नंगाचा निरोप. मिठाई पसंत करण्यात आली आहे; टेकचंदने आता टेंडर भरून त्याचे पैसे नारळी येथील आय. टी. सी. च्या कचेरीत समक्ष भरावयाचे आहेत. टेकचंदाला हे मान्य झाले. नंगा हा टेकचंदचा भाऊ गिव्हचंद ह्याची आय. टी. सी. च्या पर्चेस ऑफिसात शुक्रवारी १२–३० वाजता वाट पाहील.

( ३ )

नारळी येथील आय. टी. सी. च्या पर्चेस ऑफिससमोर, गेट पास घेऊन, गिव्हचंद दाखल होतो. नंगा आतल्या बाजूने पुढे येतो आणि गिव्हचंदला पायऱ्यांवरच भेटतो. "पैसे आणले आहेत का ?" विचारतो. गिव्हचंद चेक दाखवतो. त्यावर सही केलेली असते, बाकी तो कोरा असतो. "हा जरा लांबच्या बँकेचा चेक आहे. त्याची रक्कम सोमवारच्या आत मिळायची नाही आणि टेंडरची तर उद्याच तारीख आहे. तेव्हा तुम्हांला ऑर्डर हवी असेल तर हा चेक उपयोगी पडणार नाही; आम्ही तुमचीच मिठाई पसंत केलेली असल्यामुळे आम्हीही निराश होऊ."

गिव्हचंद जरा गोंधळात पडला. आपला भाऊ टेकचंद ह्याला विचारूनच उत्तर देणे त्याला जरूरीचे होते. "हा टेंडर फॉर्म मी भरून तयारच ठेवला आहे. त्यावर फक्त सही करावयाची. तुमच्यासाठी मी माझे स्वतःचे पैसे ॲडव्हान्स केले आहेत. तुम्ही ते नंतर परत द्या." नंगाने सांगितले. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १० वाजता दोघांनी भेटावयाचे ठरले.

( ४ )

टेकचंद आणि गिव्हचंद नारळी येथील आय. टी. सी. च्या मुख्य प्रवेशद्वारापाशी ११–३० वाजता दाखल. पर्चेस ऑफिस मध्ये श्री. ए. बी. नंगा ह्यांना भेटावयाचे आहे असे सिक्युरिटी ऑफिसरला सांगून पास घेतात आणि काही अंतरावरील पर्चेस ऑफिसपाशी येतात. नंगा पायरीवर उभा असतो. "तुम्हांला उशीर झाला आहे" असे नंगा त्यांना सांगतो. तो त्यांना वरच्या मजल्यावर, पर्चेस खात्याच्या अधिकाऱ्यांच्या नावाच्या पाट्या ओलांडीत, घेऊन जातो. तेथे नंगा एकदम उजवीकडे जाऊन टेकचंद आणि गिव्हचंदला सोफ्यावर बसवतो. "पैसे आणले आहेत ना ? लवकर द्या. ११ वाजताच कॅशिअरचे ऑफिस बंद झाले. पण तुमच्यासाठी खास म्हणून त्याने अजून हिशेब पुरे केलेले नाहीत. तुम्ही रु. ४,४४०·०० द्या. टेंडर फॉर्मचे रु. १० आणि कॅशिअरला बक्षिशीचे रु. ५ ह्यांचा त्यातच समावेश आहे. मी रु. ४,४२५ ची आता पावती घेऊन येतो." तो पैसे मोजून घेतो आणि बाहेर जाताना वाटेत काही अधिकाऱ्यांच्या केबिन्स-मध्ये डोकावून 'हॅलो मि. गुळे., गुडमॉर्निंग मि. ढेकणा; सभेची तयारी झाली आहे ना ?' असे मोठ्याने विचारतो. तो दृष्टिआड होतो. दहा मिनिटे सर्व काही शांत असते.

( ५ )

दहा मिनिटांनंतर नंगा परत येतो. त्याचे पाठोपाठ चहाचा ट्रे घेऊन एक पोऱ्या येतो. "आता लंच टाईम आहे. त्यामुळे सगळेजण कँटीनमध्ये आहेत." नंगा खुलासा करतो. "ही तुमची पावती नीट ठेवा" असे सांगतो. टेकचंद आणि गिव्हचंद पावती वाचतात, "श्री. टेकचंद आम्रावाले ह्यांच्याकडून रु. चार हजार, चारशेचाळीस पोचले." सही न वाचता येण्यासारखी— इंडिपेंडंट ट्रॅन्सपोर्ट कं. चीफ कॅशिअर. ( रबर स्टॅंप ).

नंगा त्या दोघांना सांगतो, "तुम्ही आता जाऊ शकता. तीन वाजता परत या. त्या वेळी आमची मीटिंग होईल. आम्ही तुम्हांला आत बोलावू आणि काही वाकडेतिकडे प्रश्न विचारू पण काळजी करू नका. मला असं करणं भागच आहे. पण ऑर्डर तुम्हांलाच, ह्याची खात्री बाळगा. त्यानंतर रस्त्याच्या पलीकडील आमच्या आय. टी. सी. हौसिंग कॉलनीत मी राहतो तिथे या. कुणालाही विचारा, ते माझे घर दाखवितील. तिथे माझे कमिशन चुकते करा. ओ. के. ? अच्छा !"

( ६ )

तीच जागा. तीन वाजले. टेकचंद आणि गिव्हचंद वाट पाहात थांबले आहेत. कुठेच हालचाल दिसत नाही. ते मि. गुळेच्या केबिन-मध्ये डोकावतात, तर ती मोकळी. मि. ढेकणांची केबिनही रिकामी. ते इकडेतिकडे हिंडून बघू लागतात. पहिल्या मजल्यावरही कुणी नाही; दुसऱ्या मजल्यावरही कुणी नाही. शेवटी पहिल्या मजल्या-वर कुणीतरी त्यांना आढळतो. "चौकशी"— "मि. नंगा ह्या खात्यामध्ये नाहीत. टेंडर कमिटीची सभा इथे भरत नाही. आमच्या

कंपनीचा पाच दिवसांचा आठवडा आहे. माझे काही काम शिल्लक होते, ते करायला मी आलो आहे. तुम्ही कोण ? कॅश डिपार्टमेंटमध्ये तुम्ही आज पैसे भरले ? अशक्य. ते खातेही आज बंद आहे. पावती बघू, ही आमची पावती नाही. त्यावर फक्त रबर स्टँप आहे. आमच्या पावतीवर कंपनीचे नाव मोठ्या अक्षरात छापलेले असते. पावतीवर निळ्या रंगाचा सिक्युरिटी प्रिंट असतो. आमची कंपनी मोठी आहे. तेव्हा आमच्या पावतीची नक्कल करता येणार नाही - अशीच आमची पावती आहे. ह्या पावतीवर रेव्हेन्यू स्टँपही नाही. इथे तुम्हांला कुणी यायला सांगितले ? कुणी तुम्हांला आत सोडले ? चला, आपण सिक्युरिटी ऑफिसात जाऊ या."

ह्यापुढील हकीकत म्हणजे, हौसिंग कॉलनीत ए. बी. नंगा ह्या नावाचा कोणीही इसम नाही. कँटीनमध्ये एक नंगा काम करतो, त्याचा पत्ता काढला व त्याला भेटायला दोघे गेले. "मीच नंगा". "नाही, नंगा ठेंगणा आणि गोरा आहे." "मीच ए. बी. नानगर असून आय. टी. सी. मध्येच आहे"

पोलिस कचेरी—"दर वर्षी अशी एखादी तरी तक्रार असतेच. तपशिलात काय तो थोडा फरक. गेल्या वर्षी हार्डवेअर व्यापारी फसवला गेला; अकौंटस खात्यात ते घडले. त्यापूर्वीच्या वर्षी सर्व व्यवहार दुकानदाराच्या दुकानातच पुरा झाला. टेंडर फॉर्म, आय. टी. सी. च्या सारख्या सुद्धा पावत्या नाहीत, बनावट करण्याचा प्रयत्नही नाही. आम्हांला ते सर्व सापडले आहेत. तुमच्यासारखे लोक लुबाडले गेले तरी तुम्ही कधीच फिर्याद दाखल करीत नाही. नंगाने सर्व बंदोबस्त केलेला असल्याखेरीज टेंडर मिळण्याची शक्यता नाही, हे तुम्हांला माहीतच असते. दुसरी गोष्ट म्हणजे ही गोष्ट वृत्तपत्रात छापून येणे तुमच्या लौकिकाला बाधक होते, नाही का ?"


दिपावली व नूतन वर्षानिमित्त आपल्या सभासदांचे, ठेवीदारांचे व हितचिंतकांचे हार्दिक शुभचिंतन !

*मराठा बँकेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी*

बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

*—सेवा, सहकार व सचोटी या त्रयीवर आधारलेली—*

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना ] फोन नं ५२५ [ १९४२

सर्वांच्या सहकार्याने ३० वर्षांची प्रगतीची वाटचाल:—

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. १,५१,७०० |
| रिझर्व फंडस | रु. ७,४१,५९० |
| एकूण ठेवी | रु. ७३,५७,३१४ |
| इन्व्हेस्टमेंटस | रु. ११,७६,७५८ |
| खेळते भांडवल | रु. ९०,१८,१४१ |
| निव्वळ नफा (१९७१-७२) | रु. १,८९,४८४ |

१. १९७१–७२ साली बँकेने शे. १२ टक्के डिव्हिडंड देऊन सहकारी क्षेत्रांत नवा विक्रम प्रस्थापित केला.

२. सुरुवातीपासूनच बँक ऑडिट 'अ' वर्गांत आहे.

३. विविध प्रकारच्या बचत ठेवीवर आकर्षक व्याज, निरनिराळ्या कर्जरूपाने लहान उद्योगधंदे, व्यापार व सामान्य माणसांच्या गरजा भागविण्यासाठी कर्ज योजना, इतर सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहाराची सोय.

अधिक माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात भेटा अगर चौकशी करा.

श्री. अर्जुनराव गोविंदराव घोरपडे, चेअरमन



ही दीपावली आमच्या सर्व सभासदांस, खातेदारांस व हितचिंतकांस आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो हीच शुभेच्छा

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३०

सतत ऑडिट 'अ' वर्गामध्ये असणारी पुण्यातील एक अग्रेसर
—सहकारी बँक—

(१) अधिकृत भाग भांडवल रु. ६ लाख
(२) वसूल भाग भांडवल रु. ४ लाख ६१ हजाराचे वर
(३) खेळते भाग भांडवल रु. १ कोटीचे वर
(४) कर्जे रु. ६७ लाखाचे वर
(५) ठेवी रु. ९० लाखाचे वर
(६) गंगाजळी रु. २ लाख,७५ हजाराचे वर

| वर्षे | १ | २ | ३ | ५ | ७ |
|---|---|---|---|---|---|
| व्याज दर | ६॥% | ७% | ७॥% | ८% | ८॥% |

(अ) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
(ब) कॉसमॉस बँकेच्या नजरगहाण, मालतारण, जामिनकी कर्ज, भाडेकरार इत्यादी कर्जयोजनांचा अवश्य फायदा घ्या.
(क) ठेवींच्या सुरक्षिततेसाठी डिपॉझिट इन्शुरन्स स्कीम.
(ड) आपली रक्कम कॉसमॉस बँकेच्या विविध ठेव योजनांमध्ये गुंतवून जास्तीत जास्त व्याज मिळवा.

— आजच समक्ष भेट द्या —

मुख्य कार्यालय : कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मीरोड, पुणे ३० दूरध्वनी : ५६२८३

शाखा : ४८९-अ-२, पर्वती पर्वतीदर्शन, पुणे ९. दूरध्वनी : २७३८६

ब. गं. बर्वे, व्यवस्थापक
म. ना. परांजपे, कार्याध्यक्ष

# भारताच्या मंत्रिमंडळाची सामाजिक पार्श्वभूमी

देशाच्या सत्तास्थानांच्या शिखरावर पोचलेल्या राजकीय पुढाऱ्यांचा त्यांच्या सामाजिक स्तरांच्या पार्श्वभूमीवर अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे. भारत सरकारच्या मंत्रिमंडळात काम केलेल्या मंत्र्यांचे एकत्रित चित्र कसे दिसते ते रेखाटण्याचा हा उपक्रम आहे. १९६२ ते १९७२ ह्या गेल्या दशकांतील मंत्र्यांचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. ह्या काळात भारताच्या तीन पंतप्रधानांची काही मंत्रिमंडळे तरी स्थापन झालेली दिसून येतात. राज्यघटनेत कॅबिनेटचा उल्लेख नाही; पण कौन्सिल ऑफ मिनिस्टर्स अथवा मंत्रिमंडळ असा निर्देश आहे. प्रत्यक्षात मात्र मंत्रिमंडळात बऱ्याच जणांचा समावेश असतो आणि त्यांच्या बैठका नेहमीच होत असतात असे नाही. त्यामानाने कॅबिनेटच्या बैठकी अधिक लवकर होतात. कॅबिनेटमध्ये पंतप्रधान आणि वरिष्ठ मंत्री ह्यांचा समावेश असतो. तथापि कॅबिनेट सुद्धा काही दडपणाखालीच काम करीत असते. त्यामुळे त्यातही कामाच्या स्वरूपाप्रमाणे कमी अधिक लवचिक गट पडतात. त्याशिवाय राज्यकारभारातील विशेष प्रकारची व गंभीर कामे करता येणे कठीण जाते. एखाद्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांत पंतप्रधानांच्या दृष्टिकोनाचे आणि वैयक्तिक निवडीचे प्रतिबिंब कितपत दिसून येते ? घटनेच्या ७५ व्या कलमांत पंतप्रधानांची नेमणूक राष्ट्रपतींनी करावी आणि पंतप्रधानांचा सल्ला घेऊन इतर मंत्र्यांची नेमणूक करावी असे सांगितले आहे. मंत्र्यांच्या अधिकारपदाचा काल राष्ट्रपतींच्या मर्जीप्रमाणे राहील अशी तरतूद आहे. व्यवहारात मात्र पंतप्रधानाची निवडच प्रभावी ठरते.

### मंत्र्यांच्या निवडीचे स्वातंत्र्य

पंतप्रधानांना मंत्र्यांची निवड करतांना कितपत स्वातंत्र्य असते ? ह्या स्वातंत्र्यावर काही बंधने असतात का ? राजकीय दडपणे ही तर असतातच; पण प्रत्येक पंतप्रधानाच्या बाबतीत ती वेगवेगळी असू शकतात. लालबहादूर शास्त्री ह्यांनी मंत्र्यांच्या नेमणुकीबाबत दुसऱ्या कोणाचा हात असल्याचा इन्कार केलेला होता. ते म्हणतात, " कोणाही सहकाऱ्याबद्दल अनादर न दाखविता मी असे म्हणू शकतो की, माझ्या कॅबिनेटच्या घडणीबाबत मी कोणाचाही सल्ला घेतलेला नाही. त्यात घातलेली भर अगर केलेले बदल मी स्वतःच केलेले आहेत. माझ्या सरकारातील मंत्र्यांच्या नेमणुकीबाबत मी गुप्तता पाळलेली आहे. " असे असले तरी काही उदाहरणे अशी दाखविता येतात की कॅबिनेटमध्ये असलेल्या अगर त्यात येण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तींकडून येणाऱ्या दडपणाखाली पंतप्रधान वागताना दिसतात. अर्थखाते दिल्याशिवाय कॅबिनेटमध्ये येण्यास तयार नसल्याचे टी. टी. कृष्णमाचारी ह्यांनी जाहीर केलेले होते. एस. के. पाटील ह्यांच्याकडून अन्नखाते काढून घेऊन त्यांना रेल्वेखाते देण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी जोरदार विरोध दर्शविण्यात आला होता. मनुभाई शहांनी तर नेमणूक झाल्यावर राज्यमंत्र्यांच्या ऐवजी कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा दिल्याशिवाय शपथ घेण्याचे नाकारले होते. पण ह्या प्रकरणात पंतप्रधानांचा जय झाला आणि नंतर काही दिवसांनी मनुभाई शहांनी पक्षत्याग केला. तथापि एका पंतप्रधानांवर असणारी दडपणे दुसऱ्यावर असतीलच असे नाही. म्हणून एखाद्या विवक्षित राजकीय परिस्थितीमधील तपशिलाची काळजीपूर्वक चिकित्सा केल्याशिवाय खऱ्या स्थितीवर विश्वसनीय प्रकाश पाडता येणार नाही. ह्या मुद्याचा येथे विचार करण्यात आलेला नाही: किंवा कॅबिनेटच्या अधिकाराबद्दलही येथे चर्चा केलेली नाही.

### निर्णय कोण घेतो ?

अर्थात, राजकीय सत्तेच्या घटनात्मक स्थानाप्रमाणे नेहमीच निर्णय घेतले जातात असे नाही. राष्ट्रीय महत्त्वाचे सर्व निर्णय कॅबिनेटच घेते असे नाही. बरेचस निर्णय कॅबिनेटच्या नावावर विकले जातात. पण बऱ्याच वेळा ते पंतप्रधानांनी घेतलेले असतात; किंवा पंतप्रधानांनी कॅबिनेटबाहेरील व्यक्तींच्या अगर गटांच्या सल्ल्याने घेतलेले असतात. माजी अन्न व शेतकी मंत्री ए. पी. जैन ह्यांनी लोकसभेत दिलेल्या जबानीप्रमाणे अन्नधान्याचा व्यापार सरकारच्या हाती घेण्याचा निर्णय नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलने घेतलेला होता. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील अन्नधान्याच्या उत्पादनाचे उद्दिष्ट २५ टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णयही त्याच संघटनेने घेतलेला आहे. ह्या बाबतीत संबंधित खात्याशी विचारविनिमय करण्यात आलेला नव्हता. मुंबई शहर ५ वर्षेपर्यंत केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी कॅबिनेटचा रीतसर सल्ला घेण्यात आला नव्हता, ही गोष्ट सी. डी. देशमुख ह्यांनी अर्थ-मंत्रीपदाचा राजीनामा दिला, त्यावेळी काहीशा कटुतेने स्पष्ट केली होती. त्यांनी लोकसभेत सांगितले की, कॅबिनेटच्या कमिटीच्या बैठकीची सुद्धा नोंद नाही. कॅबिनेटच्या सदस्यांना तथाकथित निर्णयाची अधिकृत प्रत मिळालेली नाही. तेव्हा कॅबिनेटविषयी विचार करताना राज्यांतील सर्वांत प्रबल अशा व्यक्तीगटाविषयी विचार करण्यात येत असतो, ह्या मुद्यावर अधिक जोर देण्याचे काही कारण नाही.

### प्रादेशिक प्रतिनिधित्व

कोण आहेत ही सत्तास्थानावरील माणसे ? आणि त्यांचे सामाजिक स्थान कोणते आहे ? एक मुद्दा अगदी प्रथम लक्षात येतो. तो असा की, देशातील ८०टक्के लोक ग्रामीण भागांत राहात असले तरी कॅबिनेट मंत्र्यांपैकी निम्म्यापेक्षाही कमीजण ग्रामीण भागांत जन्मलेले आहेत. १९६२ ते १९७२ ह्या दशकात

उरलेल्या २० टक्के शहरी भागांतून कॅबिनेट मंत्र्यांपैकी अर्ध्याहून अधिक मंत्री आलेले आहेत आणि त्यांच्यापैकी जवळजवळ दोन तृतिआंश मंत्री एक लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातून आलेले आहेत. दोन मंत्र्यांचा जन्म परदेशी झालेला आहे. एकाचा फ्रान्समधील कॅने ह्या शहरी आणि दुसऱ्याचा लंडन येथे. कॅबिनेटमध्ये देशातील निरनिराळ्या भागांचे आणि वेगवेगळ्या राज्यांचे प्रतिनिधित्व काय प्रमाणात आढळून येथे ह्याबद्दल बरीच आस्था दाखविण्यात येत असते. पण ह्या चिकित्सेचा अतिरेक होण्याची शक्यता आहे. प्रादेशिक प्रतिनिधित्व राजकीय दृष्ट्या महत्त्वाची बाब आहे ह्यात शंकाच नाही. पण कॅबिनेटमधील मंत्र्यांच्या जागा भरताना दुसऱ्या न्याय्य बाबींचेही वजन पडत असते. हाती आलेल्या माहितीवरून असे दिसते की एकंदरीत देशातील सर्व महत्त्वाच्या विभागांना कॅबिनेटमध्ये प्रतिनिधित्व मिळालेले आहे. (कोष्टक १) कॅबिनेटमध्ये उत्तर प्रदेशाचे वर्चस्व असते असे अनेकदा सांगण्यात येते. पण त्याला आधार दिसत नाही. उत्तरप्रदेशाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या १७ टक्के आहे. कॅबिनेटमधील मंत्र्यांची टक्केवारीही जवळजवळ अशीच आहे. पूर्व भागाला; विशेषत: पश्चिम बंगालला फारच कमी प्रतिनिधित्व मिळाले आहे असे दिसून येत नाही. उत्तर विभागालाही योग्य प्रतिनिधित्व मिळाले आहे. दक्षिण विभागाचे प्रतिनिधित्व थोडेसे अधिक आहे. गेल्या दशकातील कॅबिनेट मंत्र्यांच्या संख्येत सर्वात अधिक प्रतिनिधित्व पश्चिम विभागाला मिळालेले आहे. देशातील सर्वात मोठ्या अल्पसंख्यांकांच्या कॅबिनेटमधील प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने पाहता असे आढळून येते की नेहरू, शास्त्री आणि इंदिरा गांधी एकाच वाटेने जात आहेत. देशातील एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे जे प्रमाण आहे, त्याच प्रमाणात तिघांच्याही कॅबिनेटमध्ये मुसलमानांना प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे. १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे मुसलमानांची संख्या लोकसंख्येच्या १० टक्के होती व अभ्यासात असलेल्या कॅबिनेटसमध्ये त्यांना तितकेच प्रतिनिधित्व मिळालेले दिसून येते.

### शिक्षण आणि अनुभव

कॅबिनेटमधील जागेसाठी वापरण्यात येणाऱ्या कसोट्या बऱ्याच आहेत आणि त्यांतील काही एकमेकांना छेद देणाऱ्या आहेत. आतापर्यंत फक्त राजकीय कसोट्यांचा विशेष विचार करण्यात आला. समाजातील भिन्नभिन्न थरांकडून राजकीय सत्तेसाठी येणाऱ्या मागण्यांचे समाधान करण्याची जरुरी असते; ह्याच राजकीय कसोट्या. अशा कसोट्या वापरून ज्या निवडी करण्यात येतात त्यांचे असे समर्थन करण्यात येऊ शकेल की असे केल्याशिवाय सर्व थरांना प्रतिनिधित्व मिळाले नाही तर त्यांचे हितसंबंध दुर्लक्षले जाण्याचा संभव असतो. हा कोटिक्रम कायदेमंडळाच्या बाबतीत बहुधा बिनतोड असला तरी कॅबिनेटचा मामला वेगळा आहे. अनेक प्रकारच्या हितसंबंधांना प्रतिनिधित्व देणे हा कायदेमंडळाच्या स्थापनेचा उद्देश असतो. कॅबिनेटचे तसे नाही. कॅबिनेट ही एकच संस्था अशी आहे की जिला राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने सर्व बाबींसंबंधी विचार करावा लागतो. कॅबिनेटबद्दलच्या सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वामुळे तर अशा प्रकारच्या विचाराची गरज अधिकच उठून दिसते. कॅबिनेटमध्ये सत्ता अधिष्ठित असते. म्हणून त्यात घेण्यात येणारी माणसे शिक्षण, अनुभव आणि व्यक्तित्व ह्या गुणांनी युक्त अशी असली पाहिजेत. तरच सत्तेचा वापर वस्तुनिष्ठ पद्धतीने होणे सुलभ होईल. आता शिक्षण आणि अनुभव ह्या दोन गुणांचा मंत्र्यांतील आढळ कसा आहे ते आता पाहू. कसाही विचार केला तरी एकंदरीने भारताच्या मंत्रिमंडळातील आणि कॅबिनेटमधील व्यक्ती जगातील कोणत्याही देशातील सत्तेवर असणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांपेक्षा बहुधा जास्त उच्चशिक्षित अशा आहेत. (कोष्टक २) गेल्या दशकातील कोणत्याही मंत्रिमंडळातील फक्त २ ते ४ टक्के व्यक्तींनी विद्यापीठात प्रवेश केलेला नव्हता. पदवीनंतरची दुसरी पदवी सुमारे दोनतृतिआंश जणांनी मिळविलेली होती आणि अभ्यासांतर्गत शेवटच्या कौन्सिलमध्ये ५ जणांपैकी ४ जणांनी पदव्युत्तर पदवी मिळविलेली दिसली. त्यातल्या त्यात कॅबिनेटच्या सदस्यांपैकी निदान निम्म्या जणांनी तरी एका अगर अधिक विद्यापीठपदवीशिवाय कायद्याची पदवीही मिळविलेली दिसते. इंदिरा गांधींच्या अगदी अलीकडच्या कॅबिनेटमधील ४ सदस्यांपैकी तीन सदस्य कायदेपंडित असल्याचे दिसून येते. देशातील लोकसंख्येतील साक्षरतेचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेतले तर त्यामानाने कॅबिनेटमधील सदस्यांची शैक्षणिक पातळी अधिकच लक्षात भरण्यासारखी वाटते. परंतु मध्यवर्ती कार्यकारी मंडळातील सदस्यांचा शैक्षणिक दर्जा आणि राष्ट्रीय कायदेमंडळातील सदस्यांचा शैक्षणिक दर्जा ह्यांच्यातील अंतरही जवळपास असेच आहे. लोकसभेच्या एकूण सभासदांपैकी जवळजवळ तीनचतुर्थांश सभासद विद्यापीठाचे पदवीधर आहेत. ह्याचा अर्थ, लोकसभेचे सभासद आणि कॅबिनेटचे सदस्य ह्यांच्यातील शैक्षणिक दर्जाचा फरक बेताचा आहे. म्हणजेच, मध्यवर्ती सत्तास्थानांची एकमेकांशी असलेली जुळगी बरीच निकटची आहे.

कॅबिनेटच्या सभासदांपैकी तीस टक्क्यांपेक्षा कमी जणांनी परदेशी शिक्षण घेतलेले आहे. त्यांनी ज्या परदेशात शिक्षण घेतले त्यांची नावे लक्षात ठेवण्यासारखी आहेत. परदेशी शिक्षणासाठी गेलेल्या १४ सभासदांपैकी ११ जणांनी इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेतले. दोघांनी अमेरिकेत शिक्षण घेतले आणि एकाने पश्चिम जर्मनीत घेतले. निदान चार जणांनी तरी कायद्याचे शिक्षण लंडनमधील संस्थांतून घेतले. पूर्वीच्या ब्रिटिश वसाहतीतून पुढारी म्हणून पुढे आलेल्या अनेक जणांनी आपले शिक्षण लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेत पूर्ण केलेले आहे. पण

भारतामधील गेल्या दशकातील कॅबिनेटच्या सभासदांपैकी फक्त दोघांनी त्या संस्थेत शिक्षण घेतलेले आहे.

### व्यावसायिक विविधता

मंत्रिमंडळातील सभासदांच्या व्यवसायांचा विचार करता असे सहज दिसून येते की ह्या बाबतीत बरीच विविधता आहे. अनेक व्यवसायांतून ते आलेले आहेत. ( कोष्टक ३ ) सर्वात अधिक सभासद कायद्याच्या अभ्यासकातून आलेले आहेत. शेतीच्या व्यवसायातील सभासदांची टक्केवारी एकंदरीने सारखीच म्हणजे सुमारे १७ टक्के राहिलेली आहे. शैक्षणिक, वैद्यकीय व व इंजिनिअरिंग व्यवसायांनाही प्रतिनिधित्व मिळालेले आहे. मंत्रिमंडळाच्या सदस्यांची व्यावसायिक मोडणी आणि जनतेमधील व्यवसायांची मोडणी ह्यांच्यात काहीच तुलना होण्यासारखी नाही. पण शिक्षणाप्रमाणेच व्यावसायिक दृष्टिकोनातून लोकसभेच्या सदस्यांशी त्याची तुलना करणे उद्बोधक ठरण्यासारखे आहे. इंदिरा गांधींच्या दुसऱ्या मंत्रिमंडळातील सदस्यांची तुलना त्याच अवधीतील लोकसभेच्या सदस्यांशी केली तर बरेच साम्य दिसून येते. ( कोष्टक ४ ) लक्षात घेण्यासारखा फरक वकील आणि शेतकी व्यवसायांच्या बाबतीत दिसतो. लोकसभेशी तुलना करता मंत्रिमंडळात वकिलीचा व्यवसाय १२ टक्क्यांनी अधिक दिसतो आणि शेतकी व्यावसायिकांची १३ टक्क्यांनी घट झालेली दिसते. ह्या दोन्ही संघटनांच्या सध्याच्या स्थितीची तुलना केली तर चित्र थोडेसे निराळे दिसते. दोन्ही संघटनांमधील शेतकीच्या व्यवसायाच्या प्रतिनिधित्वात जो फरक होता तो आता जवळ जवळ नाहीसा झाला आहे. मुख्यत: लोकसभेतील त्याच्या सभासदांत कपात झाल्यामुळे असे घडले आहे उलट दोन्ही संघटनांतील धंदेवाइकांच्या प्रमाणात असलेला फरक अधिक वाढलेला दिसतो. मंत्रिमंडळात बुद्धिमंत आणि धंदेवाईक ह्यांचे प्रमाण ६० टक्क्यांपर्यंत आहे तर लोकसभेत त्यांचे प्रमाण फक्त ३६ टक्के आहे. व्यावसायिक अनुभवाच्या बाबतीत कॅबिनेटमधील सदस्यांचा अनुभव मंत्रिमंडळातील सदस्यांच्या अनुभवाच्या मानाने विविधतेच्या दृष्टीने कमी दर्जाचा आहे. १९६० सालापासून ही विविधता कमी होत गेलेली दिसते. असे होता होता १९७१ पर्यंत वरच्या शिखरात धंदेवाइकांची चढती कमान झाली. १९७१ च्या पूर्वीच्या दहा वर्षांत कॅबिनेटमधील शेती व्यावसायिकांची टक्केवारी १३ आणि १८ च्या दरम्यान होती. १९७१ मध्ये बनविलेल्या कॅबिनेटमध्ये शेतीव्यावसायिक नाहीतच.

### वकिलांचे वर्चस्व

अगदीच अलीकडील कॅबिनेटमध्ये वकिलांची एकूण संख्या कायम राहिली. पण इतर व्यवसायिकांची संख्या कमी तरी झाली अगर नाहीशी तरी झाली. भारताच्या कॅबिनेटमध्ये वकिलांचे प्राबल्य असावे ही काही असाधारण घटना नाही. उदा. अमेरिकेच्या आणि कॅनडाच्या कॅबिनेटमध्ये अनुक्रमे ७० व ६० टक्के पर्यंत सभासद कायदेपंडितांमधून आलेले आहेत. जर्मनीतील कॅबिनेटमध्ये अर्धे सभासद कायदेपंडित असलेले दिसतात—मग नाझी अमलापूर्वीचे, अमलातील अगर नंतरचे कोठलेही कॅबिनेट असो. राजकीय पुढारी वकीलवर्गातूनच पुढे यावे ह्यात एक सुसंगतता असल्याचे पुष्कळदा मानण्यात येते. कारण वकिलीच्या व्यवसायातील यशाला जरूर असणारे बुद्धिचापल्य आणि मंत्र्याला आवश्यक असणारी तरल बुद्धी ह्यात बरेच साम्य आहे. एखादी बाजू मांडणे ( तीसंबंधी स्वत:चाच मतभेद असला तरी ), प्रकरणे अभ्यासून तयार करणे, लोकांची मने वळविणे, इत्यादींसाठी लागणारे गुण दोघांतही असावे लागतात. शिवाय काही थोड्या व्यवसायांपैकी हा एकच असा व्यवसाय आहे की तो करण्याचे मध्येच सोडून देता येते आणि पुन्हा सवडीप्रमाणे तो पुन्हा करता येतो. कधी कधी अशा धरसोडीत अधिकच यश मिळण्याचाही संभव असतो. असा हा व्यवसाय राजकीय पक्ष आणि व्यावसायिक ह्या दोघांनाही हितकारक ठरला आहे. कित्येक कायदेपंडित असलेल्या मंत्र्यांनी कॅबिनेट मधून सेवानिवृत्त झाल्यावर पुन्हा यशस्वीपणे वकिली केल्याचे दिसून येते.

### मंत्रिमंडळातील तरुणांची संख्या

सामाजिक लक्षणाच्या दृष्टीने इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळात आणि त्यापूर्वीच्या मंत्रिमंडळात वयाच्या बाबतीत मोठा फरक दिसून येतो. नेहरू आणि शास्त्री ह्यांच्या मंत्रिमंडळातील फक्त एक चतुर्थांश सदस्य ५० वर्षांच्या खालील होते इंदिरा गांधींच्या पहिल्या मंत्रिमंडळात एक तृतिआंशापेक्षा अधिक सदस्य ५० वर्षे वयाच्या खालचे होते. त्यांच्या गेल्या दोन मंत्रिमंडळांतील सदस्यांपैकी अर्ध्यापेक्षा अधिक पन्नाशीच्या खालचे होते. कॅबिनेटमंत्री आणि राज्यमंत्री ह्यांच्याशी तुलना करता मंत्रिमंडळातील डेप्युटी मिनिस्टर्स वयाने बरेच तरुण असल्याचे दिसते. इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळापुरते हे विशेषच खरे आहे. त्यांच्या अलीकडील मंत्रिमंडळाच्या सभासदांपैकी एक तृतिआंश पेक्षा अधिक जण वयाच्या तिशीतच नेमले गेले आहेत. कॅबिनेटमधील सदस्यांची वयाची परिस्थिती मंत्रिमंडळातील सदस्यांच्या तुलनेने बरीच वेगळी आहे. इंदिरा गांधींच्या सर्वात अलीकडील कॅबिनेटमध्येही ४० वर्षे वयाखालील कोणीही मंत्री नव्हते. कॅबिनेट आणि मंत्रिमंडळे ह्यांतील सदस्यांच्या वयाची एकत्रित परिस्थिती अभ्यासली तरी त्यामुळे त्यांच्या स्वरूपाविषयी फारसा प्रकाश पडणार नाही. अशा अभ्यासाचे मोल मर्यादितच राहील. कारण सदस्यांची मंत्रिमंडळाबाहेर अगर कॅबिनेट बाहेर व आत ये-जा चालू असते. त्याचा परिणाम त्यांच्या वयाच्या परिस्थितीवर होतो. मंत्री ज्या मानाने कॅबिनेट मध्ये अधिक काल टिकतील त्या मानाने कॅबिनेटचे वयही वाढत जाणार हे उघडच आहे. संबंधच २५ वर्षांच्या कालात एकच पक्ष प्रभावशाली राहिल्यामुळे ह्या मुद्द्याला साहजिकच महत्त्व आले आहे. तेव्हा

*Deepawali Greetings to All...*

# THE BELGAUM BANK
## LIMITED

(Scheduled Bank)

Regd. Office: 659-60, Raviwar Peth,

BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Bombay office at Mandvi, Bombay-9. and Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore-2.

**Our Motto is Service**
**And We Really Serve.**

S. Y. KAMAT
General Manager.

K. B. KIRTIKAR
Chairman.

# श्री सुवर्ण सहकारी बँक लिमिटेड

१०,००० ठेवीदारांची अपूर्व किमया
अवघ्या तीन वर्षांत

**१००,००,०००**

रुपये खेळते भांडवल

: मुख्य कार्यालय :

७५९/५१ डेक्कन जिमखाना, पुणे ४. दूरध्वनी : ५४५२९

: शाखा :

(१) ३१, बुधवार पेठ, रेणुसे बिल्डिंग, पुणे २. दूरध्वनी : ५४९३९

(२) १०३५/२ टिळक रोड, पुणे ३० दूरध्वनी : ५८६४८

दर रविवारी आपल्या सेवेस सज्ज
बुधवारी सुट्टी

तुझ्या घामामधून, तुझ्या कामामधून
उद्या पिकलं सोन्याचं रान....

भारताचे उद्याचे सोन्याचं रान पिकण्यासाठी खरीखुरी 'सुवर्णभूमी' निर्माण करण्यासाठी घाम गाळला पाहिजे, काम उपसले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये कामगारांच्या घामातून, कष्टातून यशवंत सिमेंट वस्तू निर्माण सहकारी सोसायटी निर्माण झाली आहे. ते सोन्याचं रान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. शेतकरी साथ देत आहेत. तशीच साथ पुढेही द्यावी अशी या दिवाळीच्या शुभदिनी आशा करतो.

ना. पा. कराडकर
सेक्रेटरी

झा. भा. माने
चेअरमन

# यशवंत सिमेंट वस्तू निर्मिती सहकारी सोसायटी

औद्योगिक वसाहत, सांगली.

सर्वेऽपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामय: ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दु:खमाप्नुयात् ॥

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक तसेच कारखान्याचे सन्माननीय सभासद व कामगार यांना यंदाची दीपावली आनंदाची व सुखसमृद्धीची जावो, ही शुभेच्छा !

के. डी. भगत, पाटील
व्हा. चेअरमन

रा. वि. धुमाळ, पाटील
चेअरमन

आर. एस. जगधने
बी. एस्सी. (ॲग्री.) मॅनेजिंग डायरेक्टर

# दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.

श्री शिवाजीनगर, ता. राहुरी, जि. अहमदनगर

इंदिरा गांधींनी नेमणूक केलेले मंत्री त्यांच्यापूर्वी नेमल्या गेलेल्या मंत्र्यांपेक्षा वयाने तरुण आहेत ह्याला अधिकच महत्त्व आहे. मंत्रिमंडळात सदस्य प्रथम प्रवेश करतात त्या वेळी त्यांचे वय काय असते ही कसोटी अधिक उपयुक्त होऊ शकेल. उपलब्ध माहितीवरून असे स्पष्ट दिसते की सध्याच्या पंतप्रधानांचा कल तरुण लोकांना मंत्रिमंडळात घेण्याकडे दिसून येतो. फक्त मंत्रिमंडळांचा विचार केला तर असे दिसते की कनिष्ठ पातळीवरील मंत्र्यांची नियुक्ती करताना तरुण लोकांना घेण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. अशा मंत्र्यांची वये ५० वर्षांखालील दिसून येतात. नेहरू व शास्त्री ह्यांच्या मंत्रिमंडळांतील अशा मंत्र्यांची संख्या निम्म्यापेक्षाही कमी होती. इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळांत त्यांची टक्केवारी ७० आहे.

### भारताची कॅबिनेट्स वयस्कर

शास्त्रींच्या काळापेक्षा इंदिरा गांधींच्या अमदानीत ४० वर्षांखालील मंत्र्यांच्या कबिनेट प्रवेशाचे प्रमाण दुप्पट आहे. देशातील उच्चतम अधिकाराच्या स्थानावर तरुण लोकांच्या आरोहणाचे प्रमाण वाढत जाण्याची प्रवृत्ती ते लोक जी धोरणे स्वीकारण्याचा संभव आहे त्या दृष्टीने अर्थगर्भ म्हटली पाहिजेत. शिवाय, अशा तरुण व्यक्ती त्या स्थानावर किती काल राहू शकतील त्याची खूणही त्या प्रवृत्तीने मिळते. मंत्र्यांचा मामुली आलटपालट लक्षात घेतला आणि काँग्रेस पक्ष हा अजून बराच काळ सत्तारूढ राहील असे धरले तर असा एक काळ येईल की ज्यावेळी कॅबिनेटचे वय वाढलेले असेल, अगर वाढू लागलेले असेल. कॅबिनेटमधील सदस्यांच्या तारुण्यामुळे पक्षांतर्गत खुलेपणाचेही दिग्दर्शन होऊ शकते. म्हणजे असे की उच्चतम अधिकारांच्या जागांपर्यंत पोचण्याची संधी मिळणे केवळ ज्येष्ठपणावरच अवलंबून असणे शक्य राहणार नाही विशेष बुद्धिमत्ता आणि राजकीय पात्रता ह्यांचा पुरावा ज्यांनी राजकीय जीवनात अगर त्याबाहेर दाखविला असेल त्यांनाही तेथपर्यंत पोचण्यासारखी परिस्थिती उत्पन्न होऊ शकेल. सर्वसाधारणपणे असे दिसते की इतर देशांशी तुलना करता भारताची कॅबिनेटस् वयस्कर आहेत. ( कोष्टक ५ ) पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की, दहा वर्षांच्या कालातील सरासरी वयांचा भारताच्या माहितीत उपयोग करण्यात आलेला आहे. पूर्वी पाहिल्याप्रमाणे वयस्करपणापासून तारुण्याकडे झुकण्याची स्पष्ट प्रवृत्ती आता दिसून येत आहे.

### कॅबिनेटकडे जाणारे मार्ग

लोकमतावर आधारलेल्या पद्धतीत राज्य घटनेप्रमाणे कॅबिनेटच्या सभासदाने लोकसभेचे सदस्य असले पाहिजे. लोकसभेत काम करीत असलेल्या सभासदांतून विशेषत: कनिष्ठ सभागृहाच्या सभासदांतून कॅबिनेट बनविण्यात यावे अशी सामान्यत: अपेक्षा असते. पार्लमेंटरी पद्धत चालू असलेल्या देशांतून ही प्रथा दिसते पण भारताच्या बाबतीत ते पूर्ण खरे नाही. ( कोष्टक ६ ) ह्या अभ्यासात समाविष्ट केलेल्या कॅबिनेटसूचा विचार केला तर असे दिसते की त्यातील सदस्यांपैकी १२ टक्के सदस्य मंत्रीच लोकसभेच्या सभासदांतून प्रत्यक्ष निवडण्यात आले होते. १९ टक्के सदस्य मंत्री राज्यसभेतून थेट निवडल्याचे दिसते. डेप्युटी मिनिस्टर अगर राज्यमंत्री ह्या पदावर काम करून कॅबिनेटमधील सदस्याकडे जाण्याचा मार्ग खुला होतो काय ? उत्तर असे की प्रत्येक तीन कॅबिनेट मंत्र्यांपैकी एकच ह्या मार्गाने आलेला दिसतो. सगळयात अर्थपूर्ण गोष्ट अशी की ४० टक्क्यांपेक्षा अधिक कॅबिनेट मंत्री लोकसभेत अगर राज्यसभेत सभासद् म्हणून पूर्वी कधीही न बसताच तेथपर्यंत पोचलेले आहेत. भारत स्वतंत्र झाल्याच्या आरंभकाळी असे असणे तर्कशुद्धच म्हटले पाहिजे. कारण निवडणूक झालेली लोकसभा स्थापन होण्यापूर्वी कॅबिनेटस् अस्तित्वात होती. खुद्द पंडित नेहरूंनी पंतप्रधान होण्यापूर्वी अलाहाबाद म्युनिसिपल कौन्सिलवरच काय ते काम केलेले होते. सरकारी यंत्रणेचा त्यांना इतर कसलाही अनुभव नव्हता. हीच परिस्थिती त्यांच्या सहकाऱ्यांचीही होती. पण कालगत होत जाईल तसतशी पूर्वीची ही विशेष परिस्थिती बरीच पालटेल आणि दुसऱ्या टोकाला झुकेल अशी अपेक्षा आहे. भारतामधील पहिली निवडणुकीने उभारलेली पार्लमेंट १९५२ साली अस्तित्वात आली. म्हणून कॅबिनेटकडे जाणाऱ्या मुख्य मार्गांचे जे दिग्दर्शन १९६२-१९७२ ह्या कालातील माहितीवर करण्यात आलेले आहे ते त्या संदर्भातच लक्षात घेतले पाहिजे. हे उघडच दिसते की, पंतप्रधान बुद्धिमान व्यक्तींची निवड करताना आपले, क्षेत्र लोकसभा व राज्यसभा एवढ्यापुरतेच मर्यादित ठेवीत नाहीत. पंतप्रधानांनी निवड करण्यापूर्वीच कॅबिनेटमधील सदस्य कायदेमंडळात असतात असे नाही. उलट, पंतप्रधानांनी निवडल्यावर बऱ्याच वेळा त्यांचा तेथे प्रवेश होतो. कधी कधी राज्यातील राजकीय पुढाऱ्यांतून ते निवडले जातात तर कधी पक्षाच्या बाहेरील राजकीय संस्थांतूनही ते येतात. मुख्य मुद्दा असा आहे की सदस्यांसाठी पसरण्यात येणारे जाळे बरेच दूरवर फेकले जाते, आणि निवडीची प्रक्रिया बरीच लवचिक असते. त्यामुळेच फक्त पार्लमेंटच्या दोन सभांतूनच त्यांची निवड न करता सर्व राष्ट्रांतून करता येणे शक्य होते.

### सामाजिक पातळीचा वर्तनाशी संबंध ?

सध्या जगातील देशाची विभागणी विकसित व अविकसित अशी करण्याची प्रथा आहे. पण ह्या दोन्हीही देशांत राजकीय पुढारीपणाचा समान प्रश्न आहेच. शिवाय ह्या पुढारीपणाच्या दर्जाचा प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणून राजकीय सत्तास्थानी येणारे पुढारी कोणत्या प्रकारचे आहेत आणि ते सत्तास्थानी आल्यावर कोणती धोरणे स्वीकारण्याचा संभव आहे ह्यासंबंधी काही आडाखे बांधणे नेहमीच महत्त्वाचे असते. सामाजिक-राजकीय चिकित्सा करण्याचे ज्यांचे काम आहे त्यांना ह्या प्रश्नाच्या कठीणपणाने नेहमीच नादी

# इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

स्थापना : ७ फेब्रुवारी, १९६३

हेड ऑफिस : मेन रोड, इचलकरंजी ] [ फोन नं. २१९१, २१९२

शाखा : ( १ ) कोल्हापूर : सी २२७, भेंडे गल्ली, ( २ ) शिरोळ : श्री. दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळचे परिसरात. ( ३ ) जयसिंगपूर : मेनरोड.

## दहाव्या वर्षात आम्ही पदार्पण करीत आहोत.

- केवळ दहा वर्षांचे अवधीत जिल्ह्यांतील अग्रेसर बँक म्हणून आमची लोकप्रियता.
- बँकेचे कार्यक्षेत्र जिल्हा झाल्याने, जिल्ह्यांतील प्रमुख ठिकाणी शाखा उघडण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे.
- कोल्हापूर, शिरोळ व जयसिंगपूर येथे शाखा सुरू झाल्या आहेत.
- ज्यांना पत नाही, परंतु उद्योगधंदा सुरू करू इच्छिणाऱ्यांस, लघु उद्योगधंद्यास अग्रहक्काने पतपुरवठा करणे हेच आमचे ध्येय.
- शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी योग्य त्या हमीपत्रावर कर्जे दिली जातात.
- ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर दिले जातात. अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

रा. पु. कुलकर्णी
मॅनेजर

क. बा. आवाडे
चेअरमन



## शुभ दीपावली

दीपावली व नूतन वर्ष आमच्या भागीदारांस, ग्राहकांस व हितचिंतकांस सुखाचे व समृद्धीचे जावो

# दि उगार शुगर वर्क्स लि., उगार-खुर्द

जिल्हा बेळगाव ] ❋ [ म्हैसूर स्टेट

रजिस्टर्ड ऑफिस :
बखारभाग–सांगली

फॅक्टरी :
उगार–खुर्द

★ शुभ्र दाणेदार साखर, ★ इंडस्ट्रियल अल्कोहोल ★ व आय. एस. आय. मार्क मिळालेले इंडियन मेड फॉरिन लिकर्सचे एकमेव अग्रेसर उत्पादक

लावले आहे. एका बाजूला सुप्त मनाचे व्यापार संशोधणारे मानसशास्त्रज्ञ आणि दुसऱ्या बाजूला मार्क्सवादी ह्या दोघांनीही सत्तास्थानी असलेल्या पुढाऱ्यांचे आत्मवृत्त आणि त्यांचे वर्गीय स्थान ह्यांचे महत्त्व सतत प्रतिपादन केलेले आहे. प्रश्न असा आहे की राजकारणात वरचे स्थान प्राप्त झालेल्या लोकांची सामाजिक पार्श्वभूमी समजावून घेतली तर त्यांच्या मताविषयी, वृत्तीविषयी आणि राजकीय वर्तनाविषयी काही भाकिते करता येणे शक्य आहे काय? त्यांच्या सामाजिक स्थानांविषयी कोणत्याही राजकीय पातळीवर चिकित्सा केली तर त्यांच्या हेतूविषयी आणि कृतीविषयी काही मार्गदर्शन होऊ शकेल काय? गतकालातील अपरिवर्तनीय घटनांच्या माहितीवरून सद्य:कालातील व भविष्यकालातील वर्तणुकीविषयी विश्वासार्ह तर्क करणे हा नेहमीच एक न सुटलेला प्रश्न होऊन बसला आहे. पण तो सोडविण्याच्या नादी न लागणेच बरे. त्यापेक्षा राज्य कोण करतो हाच प्रश्न महत्त्वाचा नव्हे काय? ह्या प्रश्नांच्या उत्तराच्या अनेक तऱ्हा आहेत. अर्थात एका विशिष्ट काळापुरताच, अगर विशिष्ट पातळीवरील पुढारीपणापुरताच हा प्रश्न विचारण्यात आला तर येणाऱ्या उत्तरांच्या उपयुक्ततेला साहजिकच मर्यादा पडतात. सामाजिक पार्श्वभूमीसंबंधीची माहिती ज्या मानाने दीर्घकालावधीतील असेल त्या मानाने कमी-अधिक उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे सामाजिक आणि राजकीय स्तरांच्या ज्या पातळीवर ती गोळा करण्यात आली असेल त्यावरही तिचे मूल्य अवलंबून असते.

### धावत्या कालाचे प्रतिबिंब महत्त्वाचे

एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सामाजिक पार्श्वभूमीची माहिती स्थिरचित्र ह्या दृष्टीने फारशी उपयुक्त नसते. उलट धावत्या कालाचे प्रतिबिंब तीत पडलेले असेल तर ती अर्थपूर्ण ठरत जाते. तिला तौलनिक मिती असेल तर फार उत्तम. दुसरा एक असा प्रश्न उत्पन्न होतो की राष्ट्रीय सत्तास्थानांच्या शिखरभागी असणाऱ्या राजकारण्यांचे सामाजिक स्थान आणि राष्ट्राची समाजरचना ह्यांचा काही संबंध लावता येतो काय? मर्यादित माहिती असेल तर हा प्रश्न अधिकच अवघड होऊन बसतो. पण सामाजिक पार्श्वभूमीची माहिती अधिक संग्राहक आणि विस्तृत असली तरीही राज्याराज्यांतील आणि राज्यांतर्गत फरक फसवा असू शकेल. भारतात अशी संग्राहक व विस्तृत माहिती फारशी उपलब्ध नाही. पण ब्रिटन आणि अमेरिका येथे अशी चिकित्साप्रधान माहिती उपलब्ध आहे. तिचे परीक्षण करून असा निर्णय काढण्यात आला आहे की समाजव्यवस्थेतील वरच्या थराच्या जवळ असणाऱ्यांना सर्वात उत्तम राजकीय संधी मिळतात. तथापि ह्या निश्चित निर्णयानंतर लगेच असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे की अमेरिकेतील समाजरचना ब्रिटनशी तुलना करता अधिक प्रवाही आणि खुली आहे. ब्रिटिश समाजरचना ही अधिक स्थितिशील आणि भेदभावयुक्त आहे. पण, ब्रिटनमध्ये कामगार वर्गातील माणसे अधिक प्रमाणात राजकीय जबाबदारीच्या जागांवर असलेली दिसतात. हा एक अनाकलनीय विरोधच म्हटला पाहिजे.

### माहितीची कक्षा आणि पृथ:करण

समाजात अग्रस्थानी असणाऱ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीच्या चिकित्सेने सामाजिक-राजकीय रचनेत होणारे बदल समजून घेणे अशक्य आहे असे मात्र नाही. परंतु असा उपयोग होण्यासाठी माहितीची कक्षा पुरेशी विस्तृत पाहिजे आणि माहितीच्या पृथकरणाची पद्धत कल्पक असली पाहिजे. ह्या बाबतीत दोन वेगळ्या पद्धतीच्या समाजांचे परीक्षण करता येईल. ग्रेट-ब्रिटनमध्ये १८६८-८६ आणि १९३५-५५ ह्या कालखंडात कॅबिनेटमधील वरिष्ठ वर्गाच्या प्रतिनिधीत फक्त ६ टक्क्यांनी घट झाली तर त्याच अवधीत कामगार वर्गाचे प्रतिनिधी शून्यापासून २१ पर्यंत वाढले. १९५५ पासून नंतरची माहिती कदाचित सत्तेबाबत झालेले बदल अधिक स्पष्टपणे दाखवील. आता जर्मनीचे उदाहरण पाहू. राजकीय सत्तास्थानाच्या शिखरावर असणाऱ्यांच्या माहितीवरून राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टीवर कसा प्रकाश पडतो ते जर्मनीच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसून येते. १८९० पासून १९४५ पर्यंत जर्मनीत जी कॅबिनेटस् अस्तित्वात आली त्यांच्यातील सदस्यांच्या वर्गीय स्थानांची तपासणी केली तर नाझी राजवटीचा प्रतिक्रांतिकारक मुखवटा स्पष्टपणे दिसून येतो. जर्मनीच्या नॅशनल सोशलिस्ट-पार्टीने कितीही जोरदार प्रचार केला असला तरी जर्मन समाजात सामाजिक समतेची जी वृत्ती येत होती तिला नाझी पक्षाने उलट दिशेने फिरविले हे उघड दिसून येते. ( कोष्टक ७ ) भारताबाबत ह्याविषयी काही शिकता येण्यासारखे आहे काय? जी काही अल्पस्वल्प मर्यादित माहिती उपलब्ध आहे, तीवरून भारताच्या कॅबिनेटसच्या सदस्यांचा सारखेपणा सतत दिसून येतो. त्याचबरोबर जनसामान्यापासून त्याचे निराळेपणही स्पष्ट होते. परंतु आहे ही माहिती अजून तुटपुंजी, अपुऱ्या कालातील व वरवरची आहे. काही बाबतीत संशोधनासाठी अधिक माहितीची गरज आहे. उदा. कॅबिनेट सदस्यांच्या मातापितरांची अधिक माहिती मिळाली पाहिजे. ही माहिती मामुली चरित्रांतून क्वचितच सापडते. अशा प्रकारच्या तपशीलवार माहितीमुळे पुढचे पाऊल टाकता येणे शक्य होते. कारण, पुढाऱ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीची लोकशाहीच्या तात्त्विक कारभाराशी संबंध जोडू लागले म्हणजे अधिक महत्त्वाचे व दीर्घकालीन प्रश्न पुढे येतात. त्यात पुढारीपण कोणाकडे असावे, आणि राजकीय पुढारी आणि जनसामान्य ह्यांच्यातील दरी भरून काढावी काय, आणि तशी ती काढता येईल काय, इत्यादी प्रश्न येतात. राजकीय पुढारी, राजकीय तत्त्वचिंतक आणि नागरिक ह्यांनी ह्या प्रश्नांकडे सतत लक्ष द्यावे काय, हाही प्रश्न आहेच.

# रत्नागिरी अर्बन को-ऑप. बँक लि.

**स्थापना : १९१४**

**मुख्य कार्यालय – सुभाष रोड, रत्नागिरी**

फोन क्र. ११ ]  शाखा संख्या : ६  [ तार : अर्बन बँक

* आर्थिक अप्रगत समाजाला साह्य करणारी नागरी सहकारी बँक.

**तपासणी वर्ग—अ**

* रु. १०,००० पर्यंतच्या ठेवी विमा सुरक्षित असतात. आकर्षक व्याजाकरता आपली बचत सेव्हिंग, चालू, स्वल्प बचत, मुदतीचे अगर संचयी ठेवखात्यात गुंतवा.
* सार्वजनिक विश्वस्त निधीच्या ठेवी स्वीकारण्याला सरकारने मान्यता दिली आहे.
* सभासदांना तारणावर अगर पतीवर कर्ज दिले जाते. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

वि. वि. भाटवडेकर
मॅनेजर

सोलापुरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ सहकारी बँक

# दि लक्ष्मी को-ऑप. बँक लिमिटेड

रजि. हेड ऑफिस – दक्षिण कसबा, मेन रोड, सोलापूर

—शाखा—

(१) साखरपेठ, सोलापूर.  (२) अक्कलकोट,

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. ४,४०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ६,९०,००० |
| ठेवी | रु. ६०,००,००० |
| एकूण खेळते भांडवल | रु. ७१,००,००० |
| ऑडिट वर्ग | अ. |
| डिव्हिडंड | ९% |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

कृ. ल. सिद्धम
मॅनेजर

कृ. नो. जानकर
चेअरमन

*नवनवीन फॅन्सी माल ।*  *योग्य किंमत ! !*

बनारसी शालू, कांजीवरम, कोईमतूर, बंगलोर साड्या व अनेक फॅन्सी साड्यांचा भरपूर स्टॉक ! तसेच इतर सर्व प्रकारच्या मालासाठी

# शाहाडे आठवले [प्रा. लि.] दादर

टेलि. : ४५४५५४)

आणि

# शाहाडे आणि कंपनी, गिरगाव

टेलि. : ३५६१११)

मुंबई ४.

## कोष्टक १

### कॅबिनेटमधील प्रादेशिक प्रतिनिधित्व १९६२-७२ (टक्केवारी)

| विभाग | लोकसंख्येची टक्केवारी शिरगणती (१९६१) | | कॅबिनेटमधील प्रतिनिधित्व | |
|---|---|---|---|---|
| मध्य विभाग | २४·२ | | १८·४ | |
| उत्तर प्रदेश | | १६·८ | | १८·४ |
| पूर्व विभाग | २५·९ | | २२·४ | |
| आसाम | | २·७ | | ४·१ |
| बिहार | | १०·६ | | ८·२ |
| त्रिपुरा | | ०·३ | | १·९ |
| पं. बंगाल | | ८·० | | ८·२ |
| उत्तर विभाग | १०·९ | | १०·२ | |
| हरयाणा | | — | | २·० |
| जम्मू व काश्मीर | | ०·८ | | २·० |
| पंजाब | | ४·६ | | २·० |
| राजस्थान | | ४·६ | | ४·१ |
| दक्षिण विभाग | २५·२ | | २८·६ | |
| आंध्र प्रदेश | | ८·२ | | १०·२ |
| केरळ | | ३·८ | | २·० |
| म्हैसूर | | ५·४ | | १०·२ |
| तामीलनाडू | | ७·७ | | ४·१ |
| पाँडीचेरी | | ०·१ | | २·१ |
| पश्चिम विभाग | १३·७ | | २२·४ | |
| गुजरात | | ४·७ | | ८·२ |
| महाराष्ट्र | | ९·० | | १४·३ |

## कोष्टक २

### कॅबिनेट सदस्य आणि मंत्रिमंडळ सदस्य ह्यांचे शिक्षण

| | पदवी नाही (टक्केवारी) | बी. ए. (टक्केवारी) | पहिल्या पदवीनंतरची पदवी: एम. ए. (टक्केवारी) | पीएच डी (टक्केवारी) | कायदा (टक्केवारी) | एग् |
|---|---|---|---|---|---|---|
| **कॅबिनेट** | | | | | | |
| नेहरू | १३ | १७ | ४ | ४ | ६२ | (२३) |
| शास्त्री | २३ | १२ | — | — | ६५ | (१७) |
| इंदिरा गांधी (१ ले) | २५ | १२ | — | — | ६३ | (१६) |
| ,, ,, (२ रे) | ८ | १७ | ८ | १७ | ५० | (२४) |
| ,, ,, (३ रे) | १३ | ७ | — | ७ | ७३ | (१५) |
| **मंत्रिमंडळ** | | | | | | |
| नेहरू | ११ | १९ | १४ | ७ | ४९ | (६१) |
| शास्त्री | १४ | २० | ११ | ५ | ५० | (५६) |
| इंदिरा गांधी (१ ले) | १६ | २१ | १५ | ६ | ४३ | (५३) |
| ,, ,, (२ रे) | १० | १२ | १७ | १० | ४२‡‡ | (६९)‡‡‡ |
| ,, ,, (३ रे) | ९ | १५ | १८ | ९ | ५१‡‡ | (५५) |

‡ जे कायद्याचे पदवीधर असून शिवाय एम. ए. आहेत ते 'कायदा' सदरात गणले आहेत. ‡‡ कायद्याशिवाय पीएच. डी. पदवी असलेल्या एका सभासदाची त्यांत गणना आहे. ‡‡‡ ह्या मंत्रिमंडळापैकी ६ जणांबद्दल माहिती उपलब्ध नाही.

## कोष्टक ३

### कॅबिनेट सदस्य आणि मंत्रिमंडळ ह्यांचे व्यवसाय (टक्केवारी)

| | शेती | धंदा | एंजिनिअरिंग | वेतन | कायदा | शिक्षण | राजकीय व सामाजिक कार्य | पत्रकार | इतर | माहिती नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कॅबिनेट** | | | | | | | | | | |
| नेहरू | १७ | ४ | — | — | ३० | ४ | ३४ | ९ | — | — |
| शास्त्री | १८ | ६ | — | — | ३५ | — | २९ | १२ | — | — |
| इंदिरा गांधी (१ ले) | १२ | — | — | — | ३८ | — | ५० | — | — | — |
| ,, ,, (२ रे) | १३ | — | — | ० | ३८ | १३ | २९ | — | ८ | — |
| ,, ,, (३ रे) | — | — | — | — | ६० | — | २७ | ७ | ७ | — |
| **मंत्रिमंडळ** | | | | | | | | | | |
| नेहरू | १६ | ७ | ३ | ७ | ३३ | ५ | १८ | ७ | ५ | २ |
| शास्त्री | १८ | ७ | ४ | ७ | ३२ | ४ | १४ | ९ | ४ | २ |
| इंदिरा गांधी (१ ले) | १७ | ८ | ४ | ४ | ५२ | — | ९५ | ४ | ४ | ४ |
| ,, ,, (२ रे) | १८ | १३ | ३ | — | २९ | १० | ११ | १ | ७ | — |
| ,, ,, (३ रे) | १५ | ९ | ४ | — | ३७ | १५ | १५ | ४ | ४ | — |

## कोष्टक ४

### व्यवसायांचे तौलनिक प्रमाण (टक्केवारी)

| | चौथी लोकसभा | मंत्रिमंडळे (१९६७-७०) |
|---|---|---|
| वकील | १७ | ३९ |
| शिक्षण व शिक्षणतज्ञ | ७ | १० |
| पत्रकार | ५ | १ |
| एंजिनिअर्स, डॉक्टर्स, माजी मुलकी व लष्करी नोकर | ७ | ३ |
| धंदेवाले | ८ | १३ |
| शेतीवाले | ३१ | १८ |
| सामान्य व राजकीय कार्यकर्ते | २३ | १९ |
| इतर | २ | ७ |

## कोष्टक ५

### कॅबिनेटमधील प्रवेशाच्या वेळचे वय : आंतरराष्ट्रीय तुलना (टक्केवारी)

| राष्ट्र | ३०-३९ | ४०-४९ | ५०-५९ | ६० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|
| भारत (१९६२-७२) | २ | २२ | ४७ | २९ |
| युनायटेड स्टेटस् (१९००-५८) | १ | ३३ | ३७ | २८ |
| कॅनडा (१९४६-५७) | ५ | ४३ | ३४ | १८ |
| ग्रेट ब्रिटन (१९२२-६०) | ७ | २६ | ४६ | २१ |
| फ्रान्स (१९४७-५८) | १३ | ४२ | ३८ | ७ |
| ऑस्ट्रेलिआ (१९४६-५७) | ११ | ४८ | ३७ | ४ |

कोष्टक ६

कॅबिनेटमध्ये जाण्याचे मार्ग

| भरती होण्याचे क्षेत्र | कॅबिनेट सदस्य, एन्. = ४९ (टक्केवारी) | |
|---|---|---|
| (१) मंत्रिमंडळातून मिळालेली बढती | | ३२·६ |
| (२) थेट पार्लमेंटमधून | | २४·४ |
| (अ) लोकसभा | १२·२ | |
| (ब) राज्यसभा | १२·२ | |
| (३) पार्लमेंट आणि मंत्रिमंडळ याबाहेरील क्षेत्रांतून | | ४२·९ |

कोष्टक ७

जर्मन कॅबिनेटमची वर्गीय पार्श्वभूमी (टक्केवारी)

| वर्ग | राजसत्ताक १८९०–१९३३ | प्रजासत्ताक १९१८–१९३३ | नाझी १९३३–१९४५ |
|---|---|---|---|
| वरिष्ठ वर्ग (जमीनदार, सरदार) | ६४·५ | ११·५ | २७ |
| मध्यम वर्ग | ३५·५ | ७८·०० | ७० |
| कामगार वर्ग | ० | ११ | ३ |


*With Compliments of*

The Deccan Paper Mills, Co. Ltd.

**Commonwealth Building, Laxmi Road,**

**POONA 30**

**(Tel : 56314)**

सामान्य जनतेच्या आर्थिक विकासासाठी
सातत्याने झटत असलेली

# जनता सहकारी बँक लि., सांगली

**सतत ११ वर्षे ऑडिट वर्ग "अ"**

**अल्पावधीतील प्रगतीपर वाटचाल**

(आकडे लाखात)

| | | |
|---|---|---|
| (ज) शेअर-भांडवल | ... | ४·८१ |
| (न) रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | ४·६३ |
| (ता) ठेवी | ... | ६८·५७ |
| (बँ) खेळते भांडवल | ... | ८७·६५ |
| (क) वार्षिक उलाढाल | ... | १५ कोटींचे वर |

**पा. आ. कवाडे**
मॅनेजर

**म. गो. बर्गे**
व्हा. चेअरमन

**म. सा. कराळे**
चेअरमन

# सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व ह्यापुढे वाढतच जाणार

## सामाजिक न्यायावर भर आणि गरिबी दूर करण्याचे जनतेला दिलेले वचन ह्याची जबाबदारी

### (श्री. मोहन धारिया, मध्यवर्ती नियोजन खात्याचे राज्यमंत्री, ह्यांचा स्पष्ट इशारा)

सार्वजनिक क्षेत्रात कोठेही चांगली कामगिरी दिसून येत नाही, हे म्हणणे खोटे आहे. या क्षेत्रात कुठेकुठे उणिवा आहेत, कुठे कुठे तोटा येतोय, यात शंका नाही. काही कारखाने कार्यक्षमरीत्या चालविले जात नाहीत हेही खरे आहे. आणि म्हणूनच नियोजन मंडळाने आपले उद्योग-विषयक सदस्य श्री. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचीही नेमणूक केली आहे.

सार्वजनिक क्षेत्रावर लक्ष ठेवणाऱ्या या समितीने, या क्षेत्रातील डझन एक कारखान्यांना आतापर्यंत भेटी दिल्या असून त्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते, त्यांच्या प्रगतीत कोणते अडथळे येतात, याची माहिती करून घेतली आहे. यामुळे या कारखान्यांच्या कामगिरीत सुधारणा व्हावी यासाठी काय केले पाहिजे, त्यांना येणारे अडथळे कसे दूर करता येतील, याची आम्हाला चांगली कल्पना येऊ लागली असून त्यावर तावडतोब उपाय योजता येतील असा आम्हांला विश्वास वाटतो.

आज आम्ही समाजवादी समाजव्यवस्था उभी करीत असून त्या दृष्टीने आमच्या अधिकारक्षेत्राचा विस्तार करण्याचा विचार केला तर असेच म्हणावे लागेल की आमच्या अर्थव्यवस्थेचे रुंदावत व उंचावत जाणारे अधिकारक्षेत्र सार्वजनिक क्षेत्राच्या नियंत्रणाखाली आणणे अत्यंत जरुरीचे आहे. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्राच्या कामगिरीत सुधारणा करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतानाच दुसरीकडे या क्षेत्राचा विस्तार करण्याच्या दृष्टीने पुढे पाऊल टाकणे जरुरीचे आहे. अन्यथा प्रगतीचे व विकासाचे फायदे खाजगी क्षेत्रातील काही थोड्यांच्याच पदरात पडतील. आज असे थोडे-फार घडत आहेही.

तसेच, सार्वजनिक क्षेत्राच्या कामगिरीचा आढावा घेताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की या क्षेत्रातील उद्योगाचे ताळेबंद व हिशेब संसदेसमोर ठेवले जातात आणि त्यावर सर्वत्र खुली चर्चा केली जाते. याउलट, खाजगी उद्योगधंद्यांच्या हिशेब व ताळेबंदावर अशा प्रकारे खुली चर्चा होत नाही वा त्यांची लोकांकडून छाननीही केली जात नाही.

#### नफ्यापेक्षा समाजहित महत्त्वाचे

खाजगी व सार्वजनिक क्षेत्राच्या उद्दिष्टाचाही मुद्दा महत्त्वाचा आहे. खाजगी उद्योग, एखाद्या व्यक्तीला वा गटाला नफा व्हावा या हेतूने राबविले जातात; तर सार्वजनिक क्षेत्राला सामाजिक उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून कार्य करावे लागते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास अ‍ॅन्टी-बायोटिक्स औषधांच्या उत्पादनाचे देता येईल. सार्वजनिक क्षेत्रात पिंपरी येथे हिंदुस्थान अ‍ॅन्टी-बायोटिक्स कारखाना सुरू होण्यापूर्वी या औषधांच्या किमती ४ ते ५ रु. होत्या. सरकारी कारखान्यांतून उत्पादनास प्रारंभ होताच हीच किंमत १४ आण्यांपर्यंत खाली आली. आज किंमत वाढूनही १·२५ रु. त औषध मिळू शकते. तेव्हा हिंदुस्थान अ‍ॅन्टी-बायोटिक्स कारखान्याला तोटा झाला असता तरी कारखान्याची समाजहिताची भूमिका समाजाने लक्षात घ्यायला हवी होती. सुदैवाने हा कारखाना नफ्यात आहे. हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यात तयार होणाऱ्या घड्याळांची तीच गोष्ट. आयात घड्याळांच्या किमती २७५ ते ३२५ रु. असताना मी या कारखान्यात तयार झालेले घड्याळ १०६ रु. स विकत घेतले. तुलनेने हे घड्याळ कितीतरी स्वस्त व चांगल्या दर्जाचे आहे. तेव्हा सार्वजनिक उद्योगांचा विचार करताना केवळ त्यास नफा किती होतो हे न बघता त्यामुळे समाजहित किती साधले जाते त्याचाही विचार केला गेला पाहिजे. याच दृष्टीने मी सार्वजनिक क्षेत्राकडे बघतो.

#### कारभार निष्ठावंताकडे हवा

सार्वजनिक क्षेत्राच्या मूलभूत तत्त्वावर श्रद्धा असलेल्या आणि समाजवादी अर्थव्यवस्थेत या क्षेत्राची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे याची जाणीव असलेल्या व्यक्तींच्याच हाती या क्षेत्रातील उद्योगांची सूत्रे असली पाहिजेत असे माझे ठाम मत आहे. अशी श्रद्धा व निष्ठा नसलेल्या व्यक्तींच्या हाती जेथे जेथे त्यांचा कारभार सोपविला गेला, त्या ठिकाणी नुकसान जरूर झाले. याबाबतीत एका महत्त्वपूर्ण घटनेकडे मी लक्ष वेधू इच्छितो. सुप्रसिद्ध कामगार नेते श्री. बगाराम तुळपुळे यांच्याकडे दुर्गापूर पोलाद कारखान्याचा कारभार सोपविण्यात आला आहे. यावरून या क्षेत्राच्या भूमिकेवर श्रद्धा असलेल्या निष्ठावान व्यक्तींची महत्त्वपूर्ण अशा सार्वजनिक उद्योगांच्या संचालकपदी नेमणूक करण्याबाबत सरकार किती उत्सुक आहे याची प्रचीती येईल. तसेच अशा उद्योगाच्या व्यवस्थापनात सरकार, सर्वसामान्य लोक व कामगार यांचे प्रतिनिधी तसेच त्या त्या क्षेत्रातील जाणकार शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांचा समावेश असावा. असे व्यवस्थापक मंडळ सार्वजनिक उद्योगांना खऱ्या अर्थाने सार्वजनिक स्वरूप मिळवून देईल. दुसरी गोष्ट अशी की कामगारांना व्यवस्थापनात सहभागी

करून घेण्याच्या दृष्टीने सध्याची प्रगती मंद आहे. या दृष्टीने काही निश्चित पद्धतींचा अवलंब करता येईल किंवा काय याबाबत सरकार गंभीरपणे विचार करीत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील एखाद्या कारखान्यात काम करणारे कामगार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ व अन्य अधिकारी हे आता तेथे काम करणारे केवळ नोकर समजले जात नाहीत. ते खऱ्या अर्थाने त्या उद्योगातील भागीदार समजले जातात. ही भावना सर्वत्र रुजली पाहिजे.

तसे पाहिले तर व्यवस्थापकीय तंत्रज्ञांची देशात तशी वाणच आहे. यासाठी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात आली तर काही काळात सार्वजनिक क्षेत्रात जबाबदारीची कामे घेणारे लोक आम्हांला सहज मिळू शकतील. या दृष्टीने कार्यक्रम हाती घेऊन याबाबतची अडचण दूर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

### अधिकारांचे विकेंद्रीकरण

अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने नुकतेच आम्ही काही ठळक प्रयत्न चालविले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांच्या प्रमुखांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी पुरेसे अधिकार मिळवून देणे हे आमचे यामागील उद्दिष्ट आहे. त्याच वेळी असे अधिकार असलेल्या व्यक्ती संसद व सरकार यांना जबाबदार राहतील या दृष्टीनेही संबंधित कायद्यात पुरेशी तरतूद करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे.


आज असे होते की एखादा आय. सी. एस. अधिकारी एखाद्या सरकारी कारखान्याचा प्रमुख झाला तरी आपल्या कामाच्या जबाबदारीची तो पुरेशी जाणीव ठेवीलच असे नाही. कारण, काही झाले तरी आपल्या नोकरीत सुरक्षितता आहे, असे त्याला वाटत असते. सरकारी कारखान्यातील ही सारी सेवा समाजाला जबाबदार राहील असे तिचे स्वरूप असावे असाच आमचा प्रयत्न आहे. तसेच तेथील प्रमुखांना व अधिकाऱ्यांना आपली कामगिरी परिणामकारकरीत्या पार पाडता यावी यासाठी त्यांना पुरेसे अधिकार मिळवून देण्यावर आमचा भर आहे.


### मक्तेदार उद्योगधंद्यांची आर्थिक सत्ता

सरकारी क्षेत्राच्या निर्मितीमुळे आर्थिक सत्ता काही थोड्यांच्या हाती एकवटण्यास मदत झाली आहे, असे मक्तेदारी आयोगाने आपल्या पाहणीत म्हटले आहे. गेल्या पंचवीस वर्षांत जो विकास घडून आला त्याचे बरेचसे फायदे देशातील मक्तेदार उद्योगधंद्यांना मिळाले. आजही ही मक्तेदारी प्रवृत्ती वाढत आहे असे आपण पाहतो. या प्रवृत्तीला आळा घालण्याची वेळ येऊन ठेपली आहे. वस्तुतः मक्तेदारी आणि व्यापार नियंत्रण कायद्याचा आणि त्यानुसार मक्तेदारी आयोगाची नेमणूक करण्याचा हेतूच मुळी अशा प्रवृत्तीला आळा घालणे हा आहे. तसेच मक्तेदार उद्योगधंद्यांची आर्थिक सत्ता कमी करण्याच्या हेतूनेच, सरकारी क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक पहिल्या पंचवार्षिक योजनेत केवळ २९ कोटी रु. होती, ती आता ४,५०० कोटी रु. पर्यंत गेली आहे. यात रेल्वे आणि दळणवळण व्यवस्थेचा अंतर्भाव केला तर ही रक्कम ८,००० कोटी रु. पर्यंत जाते.

### नियंत्रणाची उपाययोजना

देशातील वाढत्या मक्तेदारी प्रवृत्तींवर प्रभावी नियंत्रण



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : १३२ तार : IVwpijoay

ठेवण्यासाठी सरकारने आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार, सार्वजनिक अर्थविषयक संस्थांनी खाजगी उद्योगाला दिलेल्या कर्जाचे समहक्क (इक्विटी) भांडवलात रूपांतर करता येईल असा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला आहे.

मक्तेदारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आणि भांडवलदारांचा राजकीय नेतृत्वावरील प्रभाव कमी करण्यासाठी आणखी काही उपाययोजना करता येतील असे मला वाटते. एक उपाय सुचवितो. उदाहरणार्थ, आपल्याकडील निवडणुकांस फार मोठा खर्च येतो. बऱ्याच वेळी हा पैसा भांडवलदारांकडून पुरविला जातो आणि त्यानंतर हे लोक केलेल्या आर्थिक साहाय्याचा गैरफायदा उठवू पाहतात. या बाबतीत पश्चिम जर्मनीत एका अभिनव पद्धतीचा अवलंब केला जातो, तिचा आपण अवलंब केला पाहिजे. तिथे निवडणुका लढविण्यासाठी मान्यताप्राप्त पक्षांनो लागणारा पैसा मुळी सरकारी खजिन्यातूनच पुरविला जातो. त्यामुळे तेथील राजकीय पक्षांना निवडणूक निधीसाठी भांडवलदाराकडे जावे लागत नाही.

## मानव आणि संपत्ती

आता याच प्रश्नाकडे दुसऱ्या बाजूने बघू. या देशातील काही लोकांजवळ चैनीने आणि रुबाबाने राहता येईल इतका भरपूर पैसा आहे. या लोकांत संस्थानिक, उद्योगपती व मोठे जमीनदार यांचा समावेश असून ते अत्यंत चैनीचे जीवन जगतात. देशातील आर्थिक विकासामुळे अधिकाधिक लोकांना चैनीचे जीवन जगण्यासाठी पैसा गोळा करण्याची इच्छा होऊ लागली आहे. या प्रवृत्तीला पायबंद घातला पाहिजे. मानव आणि संपत्ती यामधील संबंधाबाबत निश्चित व्याख्या करण्याची निकड आहे. त्यातही उत्पादक आणि अनुत्पादक संपत्ती अशीही वर्गवारी करावी लागेल. समाजाच्या सर्व थरांतील लोकांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याची हमी देता येईल अशी परिस्थितो निर्माण करण्याची अत्यंत जरुरी आहे. यासाठी समाजाने वृद्ध माणसे आणि स्त्रिया यांना पुरेशी सुरक्षितता मिळवून दिली पाहिजे. तसेच लहान मुलांची काळजी घेतली जाईल आणि प्रत्येकाला शालेय व महाविद्यालयीन शिक्षण मिळण्याची संधी प्राप्त होईल अशी हमी मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येकाला आपले भवितव्य घडविण्याची पुरेशी संधी मिळेल अशी समाजाने काळजी वाहिली पाहिजे. नागरिकाला अशी संधी मिळण्याची हमी हवी. तशी ती मिळाली तर अवास्तव धन गोळा करण्याचा त्याचा हव्यास नाहीसा होऊ शकेल. आम्हांला आमच्या समाजवादी कल्पना यापुढे प्रत्यक्षात आणावयाच्या असतील तर आज जी आर्थिक सत्ता काही थोड्या मोठ्या उद्योगपतींच्या हाती एकवटली आहे ती कमी करण्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रमाची निष्ठेने अमलबजावणी करावी लागेल.

## प्रादेशिक विकासामधील असमतोल

प्रादेशिक विकासातील असमतोलाची कारणे स्पष्ट व उघड आहेत. रस्ते, वीज, पाणी, वाहतूक, इ. सोयी व कच्चा माल जेथे सहज उपलब्ध आहेत, अशा शहरांत वा प्रदेशात याआधीच उद्योगधंद्यांचे जाळे पसरले आहे. त्यामुळे भांडवल व उद्योगधंदे यांचा ओघ साहाजिकच अशा शहरांकडे व विभागाकडे वळतो आणि मागासलेले विभाग तसेच मागासलेले राहतात. दुसरी गोष्ट म्हणजे उद्योगपतींनाही असेच वाटते की आधीच औद्योगीकरण झालेल्या विभागात त्यांनी नवे उद्योग सुरू केल्यास ते अधिक लाभदायक ठरेल.

तिसरी गोष्ट म्हणजे शहरात अनेक सोयी असतात, करमणुकीची अनेक साधने उपलब्ध असतात. साहजिकच तेथे जाऊन स्थाईक होण्यात आणि तेथेच उद्योगधंदा सुरू करण्यात माणसाचे मन ओढ घेते. भांडवल वा अन्य साधनसामग्री मागास विभागातून उभी करणे कठीण असते. त्यातच भर म्हणजे मागास भागात दळणवळण वा अन्य सोईसवलती निर्माण करण्यासाठी पैशाची गुंतवणूक करण्यास अनेक वेळा शासनकर्ते कचरतात. कारण त्या गुंतवणुकीपासून पुढे चांगला मोबदला मिळेल अशी त्यांना खात्री नसते.

## सार्वजनिक क्षेत्राची भूमिका

खरे म्हणजे अशा विभागातच सार्वजनिक क्षेत्राने पुढे सरसावले पाहिजे.

या बाबतीत सार्वजनिक क्षेत्र फार महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडू शकेल असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे हे खरे; परंतु सार्वजनिक क्षेत्रामुळे मागास विभागांचा कायापालट घडतोच असे आढळत नाही. बिहारचे उदाहरण घेऊ. या राज्यात सार्वजनिक क्षेत्रात अमाप पैसा गुंतविण्यात आला आहे. राज्यात २० टक्के क्षेत्र पाटबंधाऱ्याखाली आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती चांगली आहे. असे असताही हे राज्य मागासलेले का राहावे? तेव्हा मागासलेपणाची अन्य कारणेही शोधली पाहिजेत.

दुसरी गोष्ट भिलईची. या कारखान्याच्या पाच मैलांच्या परिसराबाहेर तेच अविकसित मध्य प्रदेश राज्याचे दृश्य सर्वत्र नजरेत येते. तेव्हा थोडे-फार सरकारी कारखाने उभारल्याने एखाद्या मागास विभागाचा संपूर्ण कायापालट घडून येईल वा प्रादेशिक असमतोल कमी होईल असे नव्हे. उलट, मागास विभागाचा विकास साधण्यासाठी, अन्य आर्थिक बाबींचा विचार न करता सरकारी कारखाने तेथे उभारले गेले, परंतु त्यामुळे त्या भागाचा विकास तर फारसा झाला नाहीच पण प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेक कारखान्यांना आर्थिक झळ सोसावी लागली, तोटा सहन करावा लागला, अशी स्थिती आहे.

तेव्हा यासाठी निराळ्या दृष्टिकोनाची गरज आहे. विविध पातळींवर नियोजन आखून त्याची अमलबजावणी हा एक उपाय

## सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. ३-२८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



## IMPORT SUBSTITUTE GADRE KEYS



ALL TYPES AS PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)

PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"



# ओगले

## प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,

◆ वादळी वाऱ्यात,

◆ ओबड-धोबड रस्त्यावर,

◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी (जि. सातारा)





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

## निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर असे आपण कोणतेही व्यवसायीक असा निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक

## महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

माउली, सातारा

आहे. या दृष्टीने जिल्हा पातळीवर योजना आखण्याच्या मुद्याचा आम्ही गंभीरपणे विचार करीत आहोत. जिल्हा हाच एक पूर्ण घटक धरून कार्यक्रम आखले गेले तर त्यातील मागास विभागांच्या विकासाचा आपोआपच विचार केला जाईल. त्यामुळे तेथील उपलब्ध साधनसामग्रीचा विचार करून निश्चितपणे कार्यक्रम हाती घेता येईल, अमलबजावणी करता येईल आणि परिणामी त्या विकास कार्यक्रमाचे फळही चांगले मिळेल.

## मागास भागातील स्थानिक परिस्थिती

आपण कोकण विभागाचेच उदाहरण घेऊ. मी मूळचा कोकणातला. माझे विचार कोकणातील किती मित्रांना पसंत पडतील ते सांगता येत नाही, पण कोकणाच्या विकासासाठी कोणी म्हणेल की ५०० कोटी रु. गुंतवा आणि एखादा प्रचंड सरकारी प्रकल्प वा कारखाना येथे उभा करा; तर मी म्हणेन की त्याऐवजी मासेमारीच्या विकासासाठी वा नारळ, आंबा, फणस, काजू, इ. च्या लागवडीच्या विकासासाठी, तसेच तेथे उपलब्ध असलेल्या काथ्यासारख्या उपपदार्थांचा उपयोग करून घेतील अशा उद्योगांच्या विकासासाठीच गुंतवणूक केली गेली पाहिजे. कोकणात २०० इंच पाऊस पडतो तो लक्षात घेऊन छोटी धरणे, वीजउत्पादन, अशा योजनांत पैसा गुंतवावा, खनिज साठ्याचा शोध घेण्याचेही काम करावे, असे मी सुचवीन.

नियोजन मंडळ आणि केंद्र सरकार यांनी मिळून देशातील अनेक जिल्हे मागास म्हणून ठरविले आहेत. राज्याच्या अन्य भागांतील सरकारी उत्पन्नाशी तुलना करता जेथे हे उत्पन्न कमी पडले अशा जिल्ह्यांचा मागास विभागात समावेश केलेला आहे. त्यांच्या विकासासाठी सवलतीच्या दराने पैसा पुरविला जातो. याखेरीज प्रत्येक मागास राज्यातील दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून त्यांना सवलतीच्या दराने पैसा पुरविला जातो. खेरीज तेथील उद्योगांत गुंतविण्यात येणाऱ्या रकमेच्या १० टक्के रकम आर्थिक मदत (सब्सिडी) म्हणून दिली जाते. या मदतीचा सारा लाभ उठवायचा असेल तर त्या भागात आम्ही वीज, पाणी, रस्ते, वाहतूक, इ. सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

त्याचप्रमाणे मागास भागांच्या विकासाचा विचार करताना केवळ तेथील आर्थिक विकासाचा विचार न करता सामाजिक विकासाचाही विचार केला पाहिजे. कारण सामाजिक परिस्थिती हीही विकासाला अनेक वेळा खीळ घालते. बिहारचेच उदाहरण पुनः घ्यायचे तर तेथे भरपूर गुंतवणूक केल्यानंतरही आज शाळेत जाणाऱ्या मुलींचे त्या राज्यातील प्रमाण, राज्यातील एकूण मुलींच्या केवळ ५ टक्के आहे. तसेच, अलाहाबादजवळ नेहरूंनी एकदा एका मुलींच्या शाळेचे उद्घाटन केले. परंतु तीन वर्षांनंतर ती शाळा बंद करावी लागली. कारण शाळेला मुली मिळेनात. याचे कारण आधी तेथे शिक्षण घेतलेल्या मुलींशी कोणी लग्नच करायला तयार होईना. मागास विभागांच्या विकासाचा विचार करताना या गोष्टी लक्षात घेऊनच आम्ही यापुढे गुंतवणूक करू. राष्ट्रीय विकास मंडळानेही त्या दृष्टीने काही पद्धती आखून दिल्या असून त्यानुसार आम्ही या विभागांना साह्य करतो.

## औद्योगिक धोरणातील सहकारी क्षेत्र

सन १९५६ च्या औद्योगिक धोरण विषयक ठरावाचा सरकारने व नियोजन मंडळाने पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा होती. परंतु औद्योगिक परवाने धोरण चौकशी समितीच्या मतानुसार या धोरणाची पायमल्लीच अधिक झाली आहे. सत्ताधारी पक्षाला मिळालेले बहुमत व "गरिबी हटाव" धोरणाबाबत वचनबद्ध असलेल्या सरकारची स्थापना या गोष्टी लक्षात घेता सरकारने आपले औद्योगिक धोरण अधिक सुस्पष्ट केले पाहिजे.

संसदेत चवथ्या योजनेच्या मध्यावधी आढाव्यावर चर्चा चालू असता मी व त्या वेळेचे नियोजनमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् यांनी असेच म्हटले की सध्याच्या औद्योगिक धोरणाचा फेरविचार करण्याची निकड आहे. अर्थात सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व आमच्या दृष्टीने कमी होत चालले असा कोणी याचा अर्थ लावू नये वा तशा भ्रमातही राहू नये. उलट सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व यापुढे वाढतच जाणार आहे. आज या विविध क्षेत्रांची भूमिका काय, विशेषतः संयुक्त क्षेत्राची व्याख्या काय ते स्पष्ट करण्याची निकड आहे. तसेच आजचा औद्योगिक धोरणविषयक ठराव सहकारी क्षेत्रावर फारसा भर देत नाही. दुर्दैवाने सहकारी क्षेत्र हा खाजगी क्षेत्राचा भाग समजला जातो. हे योग्य नव्हे. लोकशाही समाजवादी व्यवस्थेत सहकारी क्षेत्राची खरी गरज असते. तेव्हा या ठरावातील काही उणिवा व परस्परविरोधी विधाने दूर करावी लागतील.

## छोटे व ग्रामीण उद्योग

यानंतर मोठे उद्योगधंदे आणि छोटे व ग्रामीण उद्योगधंदे यांमधील संबंधाबाबत विचार करावा लागेल. छोट्या व ग्रामीण उद्योगांकडून देशातील एकूण उत्पन्नापैकी ४५ टक्के उत्पादन होते; परंतु आम्ही या क्षेत्राकडे म्हणावे तसे लक्ष पुरविलेले नाही. मोठ्या उद्योगांना, गेल्या काही वर्षांत, ज्या सोयी-सवलती देण्यात आल्या त्यामानाने छोट्या व ग्रामीण उद्योगक्षेत्राला मदत देण्याबाबत आम्ही फारशी चिंता केलेली दिसत नाही. हे योग्य आहे का ?

उद्योगधंद्याचा विचार करताना "औद्योगिक तह" या बाबीचा मी उल्लेख करतो. ही एक गंभीर समस्या आहे. गेल्या वर्षी संपामुळे दोन कोटींच्या वर मानवी श्रम दिवस (मॅन डेज) वाया गेले. परंतु संपावर बंदी असावी असे मी म्हणणार नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की आम्हांला आर्थिक प्रगती साधून समाजवादी उद्दिष्टे साध्य करावयाची असतील तर येत्या ८–१० वर्षांत संप वा टाळेबंदी या देशाला परवडण्यासारखी नाही.

हेड ऑफिस टे. नं. ११ मिश्रखत विभाग टे. नं. ५६
माल खत वि. विभाग टे. नं. ५८ ऑईल मिल टे. नं. ५०

शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी निर्मित

# पैसाफंड मिश्रखत

| | |
|---|---|
| १५ : ५ : ५ | १२ : ६ : ० |
| १० : ५ : ५ | ६ : १२ : ० |
| ९ : ९ : ५ | ९ : ९ : ० |

सर्व पिकांना वापरणे पसंत करतात. आपण एकवेळ अनुभव घेतल्यास कमी पैशांत भरपूर मोबदला मिळाल्याचे समाधान आपणासही लाभेल. एकवेळ वापरून खात्री करा.

एल. वाय. पाटील
चेअरमन

डी. बी. वेमाण्णा — शेती अधिकारी
आ. बा. नाईक — मॅनेजिंग डायरेक्टर

**श्री. पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.,**
**हुपरी, जिल्हा—कोल्हापूर.**

# सांगली अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना १९३५ )

नूतन दीपावली वर्ष सर्वांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल ... | रु. ८,९७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस ... | रु. १५,३८,००० |
| ठेवी ... | रु. २ कोटी ८७ लाखांचे वर |
| कर्जे ... | रु. २ कोटी १३ लाखांचे वर |

शाखाविस्तार—
माधवनगर, खणभाग (सांगली), बुधगाव, गावभाग (सांगली), विश्रामबाग, कसबेडिग्रज, भिलवडी, म्हैसाळ व मराठवाड्यातील बीड व परभणी या जिल्ह्यांचे ठिकाणी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

*वि. ह. माईणकर* — बी. एससी., एलएल्. बी. — कार्याध्यक्ष
*ल. य. लागू* — बी. ए., एलएल्. बी. — व्यवस्थापक

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

पाणी मुदल झाडा जाये । तृण ते प्रसंगेचि जिये ।
तैसे पैका बोलिलें होये । सर्वांहि हित ॥ —श्रीज्ञानेश्वरी.

**साखरेचा नवीन हंगाम १ ऑक्टोबर १९७२ ला सुरू झाला.**

**चालू हंगामात साखरेचे जास्तीत जास्त उत्पादन करण्याचे उद्दिष्ट असून, त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.**

*मागील हंगामातील उत्पादनाचा तक्ता :*

| गळिताचा हंगाम | साखरेचे उत्पादन | स्पिरिटचे उत्पादन |
|---|---|---|
| १९७१–७२ | २,१३,४७६ पोती | ५३,८४,८३७ लीटर्स |

मद्य निर्मितीचे उत्पादन व्यवस्थित चालू आहे.

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

ज. चं. आगाशे
ज्ञा. चं. आगाशे
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

अर्थात कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने सध्याच्या कामगार कायद्यात दुरुस्ती केल्यानंतरच हे शक्य आहे.

व्यवस्थापन आणि कामगार वर्ग यात सलोख्याचे संबंध रहावे यासाठी आम्हाला बरेच काम करावे लागेल. ज्या ठिकाणी ते काम करतात तो कारखाना त्यांचा आहे, ही भावनाही कामगारात आम्हाला रुजवावी लागेल.

### परदेशी सहकार्याचा दुरुपयोग

आपले कारखानदार परदेशी कारखानदारांचे सहकार्य मिळावे यासाठी फार उत्सुक असतात. यासाठी कारखानदारात जणू स्पर्धाच चालली आहे. सहकार्याला माझा विरोध नाही देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने आणि आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यांचा लाभ मिळवण्यासाठी काही मर्यादेपर्यंत हे सहकार्य आवश्यक आहे. परंतु देशातच सहजगत्या तयार होऊ शकणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांसारख्या वस्तूंच्या उत्पादनासाठी देखील परकीय भांडवलाचे साहाय्य व सहकार्य कशाला हवे ? हे टाळलेच पाहिजे. निर्यातीला किंवा परदेशी हुंडणावळ मिळविण्याला साहाय्य करू शकेल यासाठी परदेशी उद्योगाचे सहकार्य मी समजू शकतो.

### संयुक्त क्षेत्राची भूमिका

संयुक्त क्षेत्राच्या स्वरूपाबाबत पंतप्रधान आणि देशातील उद्योगपती यांचा दृष्टिकोन भिन्न दिसतो. खाजगी क्षेत्राला असे वाटते की मोठ्या खाजगी उद्योगात सरकारच्या विविध यंत्रणांचा एवढा हस्तक्षेप आहे की तेथे त्याच्या अनुमतीखेरीज कोणता निर्णय घेताच येत नाही. तेव्हा संयुक्त क्षेत्र एक प्रकारे अस्तित्वात आहेच. उलट, पंतप्रधानांनी एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे खाजगी उद्योगाला पैसा कर्जाऊ देणाऱ्या सार्वजनिक आर्थिक संस्थांनी या उद्योगाच्या सर्व थरात सहभागी होऊन ते उद्योग प्रत्यक्ष चालविण्यातही भाग घेतला पाहिजे. याबाबतीत पंतप्रधानांचे म्हणणेच बरोबर आहे. हे दोन भिन्न दृष्टिकोन जवळ येण्याचा प्रश्नच नाही. अनेक कायदे व नियम खाजगी उद्योगात पाळावे लागतात. अनेक नियंत्रणेही त्यांच्यावर आहेत. परंतु त्यामुळे संयुक्त क्षेत्राची कल्पना एकापरी अमलात येत आहे असे कसे म्हणता येईल ? पंतप्रधानांच्या म्हणण्याप्रमाणे भांडवल पुरविणाऱ्या सार्वजनिक आर्थिक संस्थांचे त्या त्या उद्योगांवर प्रभावी नियंत्रण तर हवेच परंतु संबंधित उद्योगांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतानाही या संस्थांचा सल्ला घेतला पाहिजे. कारण अखेरीस ते वापरीत असलेला पैसा लोकांचा आहे; सरकारी खजिन्यातून आलेला आहे. सध्या असे घडत नाही. खाजगी उद्योगावर सध्या असलेले नियंत्रण लक्षात घेता फार तर त्याचे वर्णन 'नियंत्रित क्षेत्र' असे करता येईल; 'संयुक्त क्षेत्र' असे नव्हे. संबंधित उद्योगांना महत्त्वाच्या बाबतीत संयुक्त क्षेत्रात सरकारचा वेळोवेळी सल्ला घ्यावा लागेल. आमच्या नव्या औद्योगिक धोरणात हा सर्व खुलासा करावा लागेल. माझे तर असे मत आहे की पाच कोटी रु. पेक्षा अधिक गुंतवणूक असलेल्या कोणत्याही उद्योगाने सरकारचे मत व अनुमती घेतल्याखेरीज महत्त्वपूर्ण निर्णय घेऊ नयेत. या बाबतीत आम्ही निश्चित निर्णय घेतले पाहिजेत. खाजगी क्षेत्राच्या भांडवल गुंतणुकीचे स्वरूप आम्ही आधी लक्षात घेत नाही, ही आमच्या नियोजनातील फार मोठी उणीव आहे.

### नुकसानभरपाईचे बंधन दूर झाले

स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने स्टेट बँक, आयुर्विमा, विमान वाहतूक अशा काही निवडक उद्योगांचेच राष्ट्रीयीकरण केले. बँका, सर्वसाधारण विमा-व्यवसाय आणि कोळसा खाणी यांचे राष्ट्रीयीकरण पाहाता आता धोरणात फेरबदल झाला आहे. हा पवित्रा तात्पुरता नव्हे; सरकारच्या धोरणात फेरबदल झाल्याचा हा पुरावा आहे. आपण स्वतंत्र झालो तेव्हा लोकशाही समाजवादाचे धोरण काही सरकारने स्वीकारलेले नव्हते. त्या वेळी ते धोरण समाजवादी धर्तीची समाजरचना यापुरते मर्यादित होते. १९६४ पासून त्यात फरक होत गेला आणि आता कोठे लोकशाही समाजवादी धोरणाच्या अमलबजावणीस प्रारंभ झाला आहे.

घटनेच्या २५ व्या दुरुस्तीमुळे ताब्यात घेतलेल्या मालमत्तेच्या बाबतीत बाजारातील किमतीनुसार भरपाई देण्याचे कायदेशीर बंधन दूर झाले आहे असे दिसते. यामुळे भरपाईचा विचार न करता मनात येईल त्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करणे सरकारला सहज शक्य होईल.

२५ वी घटनादुरुस्ती ही ऐतिहासिक महत्त्वाची असून तीमुळे भूतकाळात केली गेलेली एक मोठी चूक दुरुस्त झाली आहे. मला असे वाटते की लवकरच घटनेच्या ३१ (अ) या कलमात देखील दुरुस्ती करावी लागणार आहे. कारण, सरकारने जमिनीची कमाल मर्यादा खाली आणण्याचा एकदा निर्णय घेतला की जादा जमिनीच्या नुकसानभरपाईचा प्रश्न येईल. वरील कलम शेतजमिनीच्या पूर्ण नुकसानभरपाई बाबत आहे. हे कलम दुरुस्त करावे लागेल. बहुधा सरकार लवकरच ही दुरुस्ती संसदेपुढे ठेवील.

किती भरपाई द्यावी हा एक मूलभूत महत्त्वाचा प्रश्न आहे. याबाबत माझी काही वैयक्तिक मते आहेत. व्यक्ती आणि कुटुंब आणि त्यांचे संपत्तीबरोबरचे संबंध याबद्दलची व्याख्या स्पष्ट करण्याची निकड आहे. दांडेकर आणि रथ या अर्थशास्त्रज्ञांनी म्हटल्याप्रमाणे समाजातील वरच्या थरातील १० टक्के लोकांनी त्याग केला तरच बेरोजगारीचा प्रश्न सुटण्यास साह्य होईल. वेळ आली तर त्यांना हा त्याग करण्यास भाग पाडले पाहिजे. या दोघांचे म्हणणे खरे आहे.

### लाचलुचपत

समाजात जबाबदारीची जाणीव वाढू लागली की लाचलुचपत कमी होऊ लागेल. कारण या रोगाविरुद्ध लढा द्यायचा तर त्याच्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीव असलेला समाज आपण प्रथम निर्माण केला पाहिजे. यासाठी आपल्याला कष्टावे लागेल. या आघाडीवर सत्तास्थानी असलेल्या पक्षाने पुढाकार घेतला पाहिजे, असे मला वाटते. (योजना, १५-८-७२)

“ रौप्यमहोत्सवी ”

भारतीय स्वातंत्र्यदिनास विनम्र अभिवादन...

सेवा—सहकार—सचोटी

करवीर नगरीतील “रौप्यमहोत्सवी”

अग्रेसर नागरी सहकारी बँक...

## श्री वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

( स्थापना १९४२ )

मुख्य कार्यालय : कोल्हापूर १५१७ सी वॉर्ड, कोल्हापूर
फोन नं. ५०३

शाखा—( १ ) गडहिंग्लज फोन नं. १८ ( २ ) इचलकरंजी फोन नं. २१२९ ( ३ ) रेंदाळ ( ४ ) श्री शाहु मार्केट कार्य. कोल्हापूर, फोन नं, २८३०

या बँकेत अनेक बचत ठेव योजनाद्वारे गुंतलेला पैसा लघु-उद्योगधंदे, शेतकी उत्पादनवाढीसाठी व सामान्य जनतेच्या व आर्थिक उन्नतीकरिता उपयोगात आणला जातो. तेव्हा आपण आमच्या बँकेत ठेव ठेऊन आपलाही व्याजरूपाने अधिक फायदा करून घेऊन देशहित साधण्याची संधी दवडू नका.

बाबुराव बळवंत पाटील, हुदिहाळकर, उपाध्यक्ष — शंकरराव आपाजी पाटील, चंदूरकर, अध्यक्ष

एस. डी. घाळी, व्यवस्थापक

---

आव्हान :

☆ दिपावली बरोबरच नव्या समस्या पुढे उभ्या राहिल्या आहेत. महागाईचा नरकासुर जीवन उध्वस्त करतो की काय अशी भीती निसर्गाच्या लहरीपणाने निर्माण झाली आहे.

★ आणि याच आव्हानाच्या क्षणाला त्या संकटावर मात करण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करू. इथल्या पाण्याच्या थेंबा थेंबाचा उपयोग करून जीवन सुजलाम सुफलाम करण्याचा आमचा मनोदय आहे.

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

श्री. शं. बोंद्रे, एम्. एल्. ए.
चेअरमन

जी. एम. जोशी, जनरल मॅनेजर — डॉ. एस. आर. संकपाळ, व्हाईस चेअरमन

---

## *हा आधार निश्चित करा*

☆ सांगली बँकेची मासिक वेतन योजना

★ म्हणजेच मुद्दल सुरक्षित

☆ शिवाय दरमहा १८ रु. व्याज

★ म्हातारपणी आपणास पेन्शन मिळेल. परंतु खर्चास ते पुरेल का ? त्यासाठीच अधिक पैसे दरमहा मिळण्यासाठी तरतूद करणे अवश्य आहे. सांगली बँकेच्या मासिक–वेतन योजनेनुसार आपण बँकेकडे ३७ वा ६१ महिन्यांसाठी किमान रु. ३०००/– गुंतवा. यामुळे भांडवल तर सुरक्षित राहिलच. शिवाय त्यावर मुदतीप्रमाणे रु. १८ वा १८-७५ व्याज दरमहा आपल्यां सेव्हिंग्ज खाती जमा होईल. तसेच रु. १,०००/– चे प्रत्येक जादा ठेवीवर रु. ६ वा रु. ६–२५ प्रमाणे अधिक व्याज दरमहा मिळेल. ही योजना म्हणजे जणू आपल्या पेन्शनमध्ये वाढ.

*योजनेची माहिती आमच्या ६१ पैकी कोणत्याही शाखेत मिळेल.*

## *दि सांगली बँक लि.*

रजि. ऑफिस : राजवाडा चौक, सांगली ] [ चेअरमन : वा. त्रिं. कोरडे

# सहकारी चळवळीत नवा मनु आणणारे

# मान्यवर धनंजयराव गाडगीळ

( लेखक : खं. म. खंडागळे )

ना व्याजस्तुति वा खुशामत तशी
स्वार्थार्थ केली कधीं,
डोकाऊ दिधले न मी क्षणभरी
कोणास चित्तामधी !
झालो अंकित ना विचार अथवा
व्यक्तित्व यांच्या कदा
'माझा मी' मम जीवनांत रमलो
आल्या जरी आपदा ......



१९६० चा ऑक्टोबर महिना. औरंगाबाद येथे महाराष्ट्र राज्य शेतकी व ग्रामीण विकास परिषद भरली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, लि. चे चेअरमन या नात्याने डॉ. ध. रा. गाडगीळ तिला उपस्थित होते. परिषदेच्या पहिल्याच दिवशी त्यांचे परिषदसंबद्ध अशा एक विषयावर विचारपरिप्लुत भाषण झाले. दुसरे दिवशी त्यांना परिषदेच्या मंडपात घेऊन येण्याचे काम मजकडे आले. औरंगाबाद येथील ते उतरलेल्या हॉटेलमध्ये मी गेलो. त्यांना मी नमस्कार करून चलण्यास सांगितले. "चहा घेऊन निघू या" असे म्हणून ते कपडे करू लागले. काहीतरी बोलायच म्हणून मी म्हटले,

"कालचे तुमचे व्याख्यान लोकांना फार आवडले! विशेष म्हणजे त्यात तुम्ही एक देखील इंग्लिश शब्द येऊ दिला नाही !"

"निश्चयपूर्वक प्रयत्न केला, सराव ठेवला, तर त्यात विशेष काही अवघड नसते. थोड्या विचारांती आपणास मायभाषेतील अन्वर्थक शब्द सापडतात ... सुचतात ... निर्धार मात्र हवा..."

चहा आला. तबकांतील साखरेचे भांडे त्यांनी मजकडे सारले! मी प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे पाहिले. "मी चहांत साखर घेत नाही ... अलीकडेच नाही ... १९१८ पासून ... इंग्लंडात होतो तेव्हापासून ... तेव्हा तेथे रेशनिंग होते ..." मी अवाक झालो ! एका सहकारी साखरकारखान्याचे पहिले अध्यक्ष बिन-साखरेचा चहा घेतात ... असे व्रतपालन, अशी निष्ठा अलीकडे दुर्मिळच.

या उपरोक्त दोन गोष्टी धनंजयराव गाडगीळांच्या स्वभाव वैशिष्ट्यावर आणि व्यक्तिमत्त्वावर चांगलाच प्रकाश टाकतात. एकादे कार्य करावयाचे म्हणजे ते सर्वार्थाने करावयाचे; नव्हे ते एक प्रकारचे 'व्रत'च समजावयाचे. मग त्या बाबतीत उतायचे नाही, मातायचे नाही, टाकून द्यावयाचे नाही. घेतलेला 'वसा' कसाला उतरून शेवटास न्यावयाचा आणि साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण करावयाची.

धनंजयराव मुळचे नागपूरचे. जन्म नाशिक शहरी १९०१ मध्ये. वडील नागपुरातील नामांकित वकील. वडिलांचा एकुलता एक मुलगा. सीनिअर केंब्रिजची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर वडिलांनी त्यांना १९१८ साली आय्. सी. एस्. होण्यासाठी इंग्लंडला पाठविले. पण सनदी नोकर होण्याचा त्यांचा पिंडच नव्हता; ते आय्. सी. एस्. ला बसलेच नाहीत. १९२३ मध्ये ते भारतात परत आले ते एम्. ए., एम्. लिट्. या पदव्या घेऊन. १९२७ साली त्यांचा विवाह झाला. प्रमिलाताई काळे या त्यांच्या सहचरी, सखी आणि सचिव झाल्या.

इंग्लंडहून ते १९२३ मध्ये परत आले. ते 'आय्. सी. एस्.' ऐवजी 'अर्थशास्त्रज्ञ' म्हणून. सुरवातीला त्यांनी मुंबई येथे अर्थखात्यात काही काळ काम केले. पण या 'रत्नां'त 'राम' नाही असे आढळून येताच या हनुमंताने ते रत्न फेकून दिले ! मग एका कॉलेजचे प्राचार्यपद स्वीकारिले. पण शिक्षण क्षेत्रातच हे 'पाणी' वाहाते राहावे अगर जिरून जावे असे नियतीच्या मनात नव्हते. त्यांचे दानशूर श्वशूर रा. ब. काळे यांनी पुणे येथे ना. गोखले यांचे स्मरणार्थ 'गोखले राजकारण-अर्थशास्त्र संशोधन मंदिर' ही संस्था स्थापन केली आणि ती गाडगीळांचे हाती सुपूर्द केली. १९३० या वर्षी ते तिचे संचालक झाले. या संस्थेत प्रवेश केल्यानंतरच लोकांना गाडगीळ कोण आहेत, काय आहेत, कसे आहेत, हे जवळून पाहता आले. गोखले संस्थेचे कार्य महत्त्वाचे आणि मोलाचे होते. सार्वजनिक कार्य होत पण ती ठराविक चाकोरीतून. 'ताप येतोय—कोयनेल घे' या चिकित्सापद्धतीने. गोखले संस्थेने यात बदल घडवून आणण्याचे ठरविले. सार्वजनिक जीवनात सुधारणा करावयाची,

ऑफिस फोन २२२९ तार : TEATRADE
रेसिडन्स ,, २१७८ पो. बॉ. नं. १८८

सर्वोत्कृष्ट असा आसामचा हायग्रोन डस्ट चहा
व सर्व प्रकारच्या चहाचे
व लाल छत्री छाप चहाचे

घाऊक व्यापारी

मे. दामोदर शिवराम
आणि कं.

शाहुपुरी–कोल्हापूर

—ब्रँचेस—
कराड, चिपळुण, संगमनेर, मुंबई, पुणे, सांगली
फो. नं. ५४ ६ ९ ३१०२५ २२३१०

शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी
चमन
चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.
बाटली किंमत रु. १·५०
*याच्या सेवनाने तहान भागून आवाज खुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान–थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.*
इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार
स्टार कंपनी, बेळगाव

समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी – सहकार – हाच एकमेव पर्याय आहे.

शुभ्र दाणेदार साखर, रेक्टिफाइड, डिनेचर्ड व न्यूट्रल स्पिरिट, जीन, रम, ब्रँडी, व्हिस्की इत्यादि मद्यार्कांचे उत्पादन व पोल्ट्री व पशुखाद्याचे उत्पादन व फळबाग-योजना यांचे यशस्वीरीत्या संचालन करून राष्ट्राच्या सेवेस हातभार व शेतकरी आणि कामकऱ्यांचे हितरक्षण हे दुहेरी हेतू सहजरीत्या साध्य करणारी महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रातील एक आद्य व प्रमुख संस्था

शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
सांगली

तार : साखर–सांगली.
फोन नं. २१७१, २१७२ व २१७३, ७४, ७५

वि. द. दिवाण,
मॅनेजिंग डायरेक्टर.

जिनगोंडा सुरगोंडा पाटील,
व्हाईस चेअरमन

दिनकरराव हिं. पाटील
चेअरमन

पण ती करण्यापूर्वी समाजाची आर्थिक आणि सामाजिक पाहणी करून संशोधन करून. प्रथम रोगनिदान करणे आवश्यक आहे. निदान झाल्याशिवाय उपचार कसा आणि कोणता करणार? हा दृष्टिकोन गाडगीळांनी समाजापुढे प्रत्यक्ष कार्याच्या रूपाने ठेवला आणि तो पटवून दिला. युक्ती आणि कृती यांचा मेळ बसविला आणि त्यानेच त्यांना आणि त्यांच्या संस्थेला सरकारात आणि सर्वत्र मानाचे आणि मोलाचे स्थान प्राप्त झाले. यात गाडगीळांची कोणताही प्रश्न तळापासून तपासून काढण्याची प्रवृत्ती, अभ्यासू वृत्ती, चिकित्सक दृष्टी आणि तत्त्वनिष्ठा दिसून येते. ते शुद्ध बुद्धिवादी होते. भावनेच्या आहारी क्वचित जात. आपली मते ते स्पष्ट मांडीत अगदी क्षुल्लक दिसणाऱ्या विषयाबद्दलही एकादे वेळी ते सहज बोलून जात. एकदा ते म्हटल्याचे स्मरते की, "महाराष्ट्रीय माणूस हा जात्याच फार भिडस्त, अवाजवी संकोची असतो! पगाराचे पैसे अर्थात स्वतःचे मिळाले तरी ते तो मोजून घेणार नाही! हातात आले की एकदम खिशात कोंबणार! स्वतःस मिळालेला पैसा मोजून का न घ्यावा?..." महाराष्ट्रीयांनी व्यवहारी व्हावे, हिशेबी असावे, हीच याच्या मुळाशी तळमळ होती. गाडगीळांनी ग्रंथही लिहिले आहेत आणि ते मान्यताही पावले आहेत. इतरही लिखाण तर पुष्कळच आहे. संस्थेचे वजन पाठीशी असल्याने 'वजनदार' झालेली माणसे पुष्कळ असतात, पण व्यक्तीच्या कार्यामुळे संस्था नावारूपास येतात आणि त्यात गोखले संस्था हिचा क्रम अगदी वरचा लागेल.

सहकारी तत्त्वावर गाडगीळांची पूर्ण श्रद्धा होती म्हणूनच ते सहकारी चळवळीकडे एका विशिष्ट दृष्टिकोनातून पाहात होते. गोखले संस्थेतील 'संशोधक नजर' त्यांनी सहकारी चळवळीकडे वळविली. भारतातील ग्रामीण सुधारणा ही आर्थिक बाब असून हा आर्थिक प्रश्न सुटला तर सहकारी संघटनेमार्फतच सुटेल असा त्यांचा विश्वास होता. गोखले संस्थेची सूत्रे त्यांनी हाती घेतली त्या वर्षी (१९३०) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ दुर्दैवाने मंदीच्या तडाख्यात सापडली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. ही या चळवळीत अग्रभागी असून बिगर-सरकारी धुरीणत्व संभाळीत होती. वैकुंठराय मेहता सारखा एक थोर सेवाभावी पुरुष या चळवळीला बँकेतर्फे आर्थिक साहाय्य आणि मार्गदर्शन करीत होता. इतरही अनेक कार्यकर्ते चळवळीचे जहाज सुखरूपपणे किनाऱ्याला लागेल असे प्रयत्न करीत होते. सूट-सवलतीच्या योजना सरकारनेही आखलेल्या होत्या. या वेळेपासूनच सहकारी संस्थांबद्दल सामान्य जनांच्या मनात काही 'अपूर्व' विचार डोकावू लागले होते असे वाटते. लोकांच्या मनात येई "या चळवळीपासून, ज्यांच्यासाठी ही चळवळ चालू आहे त्यांचा काही फायदा होत आहे का? 'हे' या चळवळीने त्यांना दिले असे एखाद्या गोष्टीकडे अंगुलीनिर्देश करून दाखविता येईल का?" लोकांच्या या प्रश्नांना उत्तर देणे, समाधानकारक उत्तर देणे, अवघड जात होते! लोकांना वाटायचे, या चळवळीत असलीच तर 'गति' आहे; पण 'प्रगति' दाखवा म्हटले तर ती दाखविणे सोपे नव्हते. शिवाय या चळवळीचे प्रातिस्विक (विशिष्ट) कार्य कोणते आणि ते या चळवळीत होत आहे का? १९३६ च्या सुमारास धनंजयरावांचा सहकारी चळवळीशी प्रत्यक्ष संबंध आला.

पुणे जिल्हा सहकारी बँक, लि. चे ते अध्यक्ष झाले. युद्ध सुरू झाल्यानंतर वाटप दुकाने सहकारी संस्थांकडे देण्यात आली तेथेही त्यांचा संबंध आला. याच प्रसंगाने त्यांची दृष्टी सहकारी कार्यपद्धतीकडे वळली असली पाहिजे. वैकुंठरायबरोबर त्यांनी विचारविनिमयही केला असेल. माझी आठवण बरोबर असेल तर धनंजयरावांच्या संस्थेच्या एका वर्धापनदिनी (ते साल बहुधा १९४१ असावे) वैकुंठराय यांनी सहकारक्षेत्रात नियोजनाची आवश्यकता या विषयावर तेथे एक व्याख्यानही दिले होते. सहकारी चळवळीला नवीन वळण दिले पाहिजे, तीत परिवर्तन घडवून आणले पाहिजे, असे गाडगीळांच्या मनात घोळत असले पाहिजे. एके ठिकाणी ते म्हणतात, "सहकारी संस्थांचे यश व बळ हे सभासदांच्या निष्ठेत सामावलेले असते. तात्पुरत्या फायद्याकडे नजर न देता संस्थेच्या हिताकडे म्हणजेच स्वतःच्या सामुदायिक हिताकडे अढळ लक्ष देण्यातच आपले अंतिम वैयक्तिक हित आहे हे सभासदांना समजून त्यांच्या वागणुकीत ते प्रतिबिंबित झाले म्हणजेच सहकारी संस्थेचा पाया दृढ होतो." विचारांती त्यांना हेही जाणवले असावे की, भारतात गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्था फारशा यशस्वी होणार नाहीत; झाल्याच तर उत्पादकांच्या सहकारी संस्था निघून यशस्वी होतील. गाडगीळांचे हे निदान काळाने अचूक ठरविले आहे! मंदीच्या माऱ्याने रंजीस झालेल्या आणि हताश होऊ लागलेल्या नगर जिल्ह्यातील बागायतदारांनी १९४५ या वर्षी श्रीरामपूर येथे एक आपली परिषद घेतली. तीत धनंजयरावांनी चर्चेनंतर आपला एक क्रांतिकारक विचार बोलून दाखविला. त्यांनी सांगितले, शेतकऱ्यांची उन्नती व्हावयास हवी असेल तर त्यांची पिळवणूक थांबली पाहिजे आणि पिळवणूक थांबावयाची असेल तर शेती मालावर प्रक्रिया करणारा कारखाना सहकारी तत्त्वावर काढणे जरूर आहे. कारण यामुळे त्याच्या मालाला वाजवी भाव मिळून मधला दलाल दूर होईल.

दूरदृष्टीच्या शेतकऱ्यांना हा विचार पटला. पुराणमतवाल्यांना तो अवास्तव वाटला. इतरांना तर तो वेडगळपणाचा वाटला. पण गाडगीळांनी त्याचा पिच्छा पुरवून संबंधितांच्या सहकार्याने त्याचा पाठपुरावा केला आणि १९४८ च्या असेरीस नगर जिल्ह्यातील लोणी या गावी (आता प्रवरानगर) पहिला सहकारी साखरकारखाना रजिस्टर करून दाखविला! सर्व संकटांवर मात करून या कारखान्याने १९५०-५१ या हंगामात साखरउत्पादन करून सर्वांची तोंडे गोड केली! आज महाराष्ट्रात जे सहकारी साखरकारखाने निघालेले आहेत त्यांचा 'प्रवरा सहकारी साखर

कारखाना ' हा मूळपुरुष होय!''' हा कारखाना 'गाडगीळ गोत्रोत्पन्न' च! त्याचे प्रवर मात्र तीन आहेत. देवकी–वसुदेवाच्या कृष्णाला पुढे यशोदा-नंदकुमार म्हटले जात असले म्हणून काय झाले? सहकारी साखरकारखाना म्हणजे सहकारी चळवळीने, तिच्यासाठी खस्ता खाल्लेल्या शेतकऱ्यांना दिलेला 'अमृत कलश' च होय! गाडगीळांची क्रांतिकारक कल्पना साकार झाली आणि महाराष्ट्रातील बागायतदार शेतकरी सुखी झाला, संपन्न झाला, स्वावलंबी बनला; आनंदाची गोष्ट होय.

ऊस बागायतदारांचा प्रश्न गाडगीळांनी सोडवून दाखविला. त्यांच्यापुढे जिरायत शेतकऱ्यांचाही प्रश्न होता. त्याबद्दल त्यांचे विचार चालू होते म्हणतात. पीक-कर्ज-योजनेखाली काही योजना राज्य सहकारी बँकेने आखलेल्या आहेत. पण जिरायत शेतकऱ्यांचा प्रश्न अद्याप एक समस्याच राहिलेली दिसते. गाडगीळ यांचे मनात त्याबद्दल काही निश्चित कल्पना असण्याची शक्यता होती. पण हा प्रश्न मार्गी लावण्याचे अगोदरच त्यांना दिल्लीचे बोलावणे आले. १९६७ साली मोठ्या कामासाठी ते तिकडे गेले. पण त्याही कामांतून त्यांना मधूनच उठून यावे लागेल. गतवर्षी ते महाराष्ट्रात परत येत असताना वाटेतच निर्घृण काळाने त्यांच्यावर आपले पाश टाकले आणि त्यांना कायमचेच दूर नेले! त्यांच्या अकल्पित निधनाची दुःखद वार्ता वाचल्यावर माझ्या मनात एका कविवर्यांच्या पुढील काव्यपंक्ती घुमल्या :—

न झाली भावगीताची अजूनी पूर्ण अस्ताई।
मधें तो सूर का थांबे? कुठे ती गायिका जाई? ॥

धनंजयरावांची कामे आता कोण आणि कशी पुरी करणार? जिरायत शेतकऱ्यांचा प्रश्न कसा आणि केव्हा सुटणार, कोण जाणे?... त्यांची ती पुणेरी पोषाखांतील प्रसन्न मूर्ती डोळ्यांपुढे आली की वाटते—

वळुनी पाहता आज मागुती
दिसू लागते मनःचक्षुला :
अर्थ पुरावे 'सहकारा' ला
सहकारांतिल 'अर्थ' हरवला...
वियोगांतले गेले वर्ष
झिरपत झिरपत पहा संपते,
कर्तृत्वाची स्मरण मालिका
गाभाऱ्यामधि ज्योत तेवते!...
पुढे चालवू सेवा नित्य
गाभाऱ्यांतिल प्रकाश पाहुन;
सांग व्हावया कार्य आमुचे
तुझ्या स्मृतीला कृतज्ञ वंदन..

---



# सहकारी पतपुरवठा यंत्रणेवरील वाढता ताण

## नैसर्गिक अडचणीत मानवनिर्मित दोषांची भर
## लोकशाही कारभार आणि विकेंद्रित व्यवहार

लेखक : श्री. नी. श्री. सपकाळ,
चेअरमन, महाराष्ट्र स्टेट को. बँक लि.

सुधारलेल्या व संकरित बियाण्यांचा वापर, सधन शेती, अशा प्रकारच्या शेती विकासाच्या विविध कार्यक्रमांत सहकारी संस्था वाढत्या प्रमाणात सहभागी होत आहेत. त्याचप्रमाणे धान्याची आणि आता कापसाचीही एकाधिकार खरेदी सहकारी यंत्रणेमार्फत होत आहे. या सर्व कार्यासाठी आवश्यक कर्ज-पुरवठा करण्यासाठी केंद्रीय बँकेवरील आर्थिक जबाबदाऱ्या अलीकडे झपाट्याने वाढत आहेत. त्याचबरोबर खेड्यापाड्यांत कृषी औद्योगिक क्रांतीचे लोण पोचल्याने साखरकारखाने, सूतगिरण्या आणि इतरही प्रक्रिया व औद्योगिक सहकारी संस्था यांच्याकडूनही कर्जाची वाढत्या प्रमाणात मागणी होत आहे. रिझर्व बँक, स्टेट बँक आणि तिच्याशी संलग्न बँका, राज्य सरकार आणि इतर आर्थिक संस्था यांच्या सहकार्याने आपण या सर्वांच्या गरजा बहुतांशी भागविल्या आहेत हे जरी खरे असले तरीही गेल्या दोन-तीन वर्षात सहकारी पतपुरवठा यंत्रणेवरचा आर्थिक ताण वाढत आहे. यात भर म्हणून गेल्या दोन-तीन वर्षात निसर्गानेही आपणावर अवकृपा केली आहे.

### नापिकीमुळे थकबाकी

गेल्या दोन वर्षात लागोपाठ झालेले आवर्षण व त्यातून निर्माण होणारी नापिकी यामुळे सहकारी बँकांच्या कर्जव्यवहारावर मर्यादा निर्माण झाल्या आहेत. गेल्या दोन वर्षाच्या दुष्काळानंतर यंदाही पावसाने दडी मारल्याने एक गंभीर समस्या निर्माण होऊ पाहात आहे. आवर्षणाची परिस्थिती कमीअधिक प्रमाणात महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांत निर्माण झाली असली तरी मराठवाड्यात परिस्थिती अतिशयच गंभीर आहे. गेल्या दोन वर्षातील दुष्काळानंतरचे यंदाचे आवर्षण मराठवाड्यातील जिल्ह्यांना अतिशय जाचक ठरेल व त्यामुळे त्या भागातील सहकारी पतपुरवठा व्यवस्थेचा पाया डळमळीत होईल की काय अशी भीती वाटू लागली आहे. गेली दोन वर्षे आपण मराठवाडा व महाराष्ट्रातील इतर काही जिल्ह्यांत रूपांतर, व रूपांतर कर्जाच्या हप्त्यांची फेरआखणी या उपायांचा अवलंब केला. १९७०-७१ साली राज्यातल्या २१ जिल्ह्यांना दुष्काळाचा तडाखा बसला आणि जिल्हा बँकांकडील १७ कोटी रुपयांचे कर्ज रूपांतरित करण्यात आले. गेल्या वर्षीही राज्यांच्या बऱ्याच भागात नापिकी झाली. त्यामुळे १२ कोटी रुपयांची कर्जे रूपांतरित करण्यात आली आणि ७ कोटी रुपयांहून अधिक मागील वर्षांच्या रूपांतर कर्ज हप्त्यांची फेरआखणी करण्यात आली. यंदाही सतत तिसऱ्यांदा निर्माण झालेल्या नापिकीमुळे आता पुढे काय ? हे भले मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### उपाययोजना

लागोपाठ दोन-तीन वर्षे नापिकी झाल्यामुळे ग्रामीण भागात जे आर्थिक प्रश्न निर्माण होतात त्यांचा अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने ( गोरवाला समिती-१९५४ ) प्रथमच सांगोपांग अभ्यास केला. सतत नापिकीची परिस्थिती उद्‌भवली म्हणजे त्या भागातील शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन उध्वस्त होते आणि त्यामुळे सहकारी पतयंत्रणेचा डोलाराच कोसळून पडतो. हा धोका लक्षात घेऊन गोरवाला समितीने अशाही परिस्थितीत शेतकऱ्याला मिळणाऱ्या कर्जाचा ओघ खंडित होऊ नये आणि त्यांच्यावरील कर्जाचा बोजाही त्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ नये या दृष्टीने काही निश्चित उपाययोजना सुचविली. एखाद्या वर्षी नापिकी झाली तर पीक-कर्जाच्या येणे बाकीचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर करावे, दुसऱ्या वर्षीही नापिकी झाली तर त्या वर्षीच्या पीक-कर्जाच्या येणे बाकीचे मध्यम मुदत कर्जात रूपांतर तर करावेच, पण त्याचबरोबर मागील वर्षीच्या रूपांतरित कर्जाच्या परतफेडीच्या हप्त्यांची फेरआखणी करावी, लागोपाठ तिसऱ्याही वर्षी जर नापिकीची परिस्थिती उद्‌भवली तर मात्र याही पुढे जाऊन पहिल्या वर्षीच्या रूपांतरित कर्जाला माफी देण्याशिवाय गत्यंतर नाही, असे गोरवाला समितीने प्रतिपादन केले.

रूपांतर व्यवहार सोईस्करपणे करता यावे म्हणून राज्य व जिल्हा सहकारी बँकांमध्ये पतस्थिरता निधी ( अॅग्रिकल्चरल क्रेडिट स्टॅबिलायझेशन फंड ) निर्माण करण्यात यावा. त्याचप्रमाणे या निधीचा पूर्ण वापर करून झाल्यानंतर कर्ज माफीची सवलत देण्याच्या दृष्टीने "आपत्काली आणीबाणीच्या प्रसंगी सरकारला आपली जबाबदारी पार पाडता यावी म्हणून राज्य व केन्द्र पातळीवर शेती कर्जासाठी" रिलीफ आणि गॅरंटी फंड स्थापन करावे अशीही निःसंदिग्ध सूचना या समितीने केली. या नंतरच्या ग्रामीण पतपुरवठा पुनर्पाहणी समितीने ( वेंकटपय्या समिती १९६९ ) तर याही पुढे जाऊन असेही प्रतिपादन केले की, पतस्थिरता निधीमध्ये उपलब्ध असलेल्या रकमेचा पूर्ण वापर झाल्यानंतरच सोसायटीला रिलीफ आणि गॅरंटी फंडातून सवलत

दिली जावी हे धोरण योग्य नाही. हे दोन फंड निरनिराळ्या कारणांकरता निर्माण केलेले असल्यामुळे परिस्थिती पाहून आवश्यकतेप्रमाणे दोन्ही फंडांतील रकमेचा वापर योग्य कारणांसाठी करावा असेही या कमिटीने स्पष्ट केले. कर्जमाफीबाबतच्या या सूचनांची कार्यवाही करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे.

### मानवनिर्मित थकबाकी

मात्र एवढ्यानेच थकबाकीचा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. गोरवाला कमिटीने सुचविलेल्या पद्धतीने कर्जमाफी योजनेची कार्यवाही केली तर गेल्या वर्षी कर्जहप्त्यांची फेरआखणी केलेल्या सुमारे ७-८ कोटी रुपये कर्जांचाच प्रश्न सुटेल. आज महाराष्ट्रात शेतीकर्जाची सभासदांकडील एकूण थकबाकी ६०–६५ कोटी रुपये आहे. या थकबाकीची प्रामुख्याने दोन प्रकारांत विभागणी करायला हवी : (१) नापिकी, शेतमालाच्या भावातील घसरगुंडी अगर तत्सम नैसर्गिक अथवा शेतकऱ्यांचे नियंत्रण नसणाऱ्या अन्य कारणांतून उद्भवलेली थकबाकी आणि (२) राजकीय हेवे-दावे, अफरातफर, अकार्यक्षम कारभार, इत्यादी कारणांमुळे उद्भवलेली थकबाकी. राज्य बँकेने गेल्या वर्षी केलेल्या जिल्हा बँकांच्या थकबाकीच्या कारणवार छाननीतून असे दिसून आले होते की एकूण थकबाकीपैकी सुमारे ५५ ते ६० टक्के थकबाकी ही नैसर्गिक कारणाने उद्भवलेली असते आणि उरलेली ४० ते ४५ टक्के ही मानवनिर्मित कारणांतून उद्भवलेली असते. अशी थकबाकी प्रामुख्याने बड्या लोकांकडून होत असते हीही गोष्ट आता काही नव्याने सांगावयास नको. मात्र थकबाकीच्या रकमेत अशा बड्या लोकांकडे असलेली 'रक्कम' जास्त असली तरी छोट्या छोट्या शेतकऱ्यांची 'संख्या' त्यात फार मोठी आहे ही गोष्टही विसरून चालणार नाही. त्यांचा काहीही दोष नसताना त्यांना या थकबाकीच्या भोवऱ्यात अडकून पडावे लागते.

### रूपांतराच्या सवलतीची पद्धत

थकबाकीबाबत विचार करताना रूपांतराची सवलत देण्याबाबतच्या प्रचलित पद्धतीचाही विचार करावयास हवा. नापिकीच्या परिस्थितीत शेती-कर्जाला रूपांतराची सवलत देण्यासाठी पिकांची आणेवारी आधारभूत समजली जाते. आणेवारी ही प्रामुख्याने सारामाफीच्या संदर्भात ठरविली जाते. शेतसाऱ्याचा शेतकऱ्यावरील बोजा कर्जाच्या बोजाच्या मानाने फारच अल्प असतो. त्यामुळे सारामाफीसाठी ठरविण्यात आलेली सहा आणे ही आणेवारीची मर्यादा कर्जरूपांतराच्या संदर्भात लावणे अयोग्य आहे. आणेवारी सहा आण्यांहून अधिक असली तरीही नेहमीच कर्जफेडी ताकद असतेच असे नाही. सबब आणेवारीऐवजी दुसरी एखादी अधिक वस्तुनिष्ठ पद्धत अगर निकष कर्जरूपांतराच्या संदर्भात ठरवायला हवा. महाराष्ट्र सरकारने आणेवारी ठरविण्याच्या प्रचलित पद्धतीचे मूल्यमापन करण्यासाठी डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक समिति नियुक्त केली आहे. कर्जरूपांतराची सवलत देण्यासाठी आणेवारीचा कशा तऱ्हेने वापर करणे इष्ट होईल याचाही या समितीने विचार केल्यास सहकारी पतपुरवठा पद्धतीच्या दृष्टीने ती एक स्वागतार्ह घटना होईल. या संदर्भात आणखीही एका गोष्टीचा विचार करावयास हवा; ती म्हणजे शेत-मालाच्या भावाची अस्थिरता! ज्याप्रमाणे अवर्षण, अतिवृष्टी, इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते तसेच किंबहुना कित्येकदा त्याहूनही अधिक नुकसान शेतमालाच्या भावातल्या घसरगुंडीमुळे होते, अशा प्रसंगीही कर्जरूपांतराची सवलत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विचार करावयास हवा. या दृष्टिकोनातून कर्जरूपांतरासाठी कोणते निकष वापरायचे या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करणे आवश्यक आहे. ही भूमिका गेल्या वर्षीच्या जिल्हा बँकांच्या परिषदेमध्ये रिझर्व्ह बँकेच्या शेती-कर्ज विभागाचे मुख्याधिकारी यांनी तत्त्वतः मान्यही केली होती. मात्र याबाबत अद्यापि पुढे काही हालचाल झालेली दिसत नाही.

### थकबाकीस काही प्रमाणात सरकारही जबाबदार

नैसर्गिक कारणाव्यतिरिक्त इतर कारणांमुळे होणाऱ्या थकबाकीची जबाबदारी ज्याप्रमाणे प्राथमिक संस्था आणि मध्यवर्ती बँका यांच्यावर आहे, त्याप्रमाणेच ती राज्यसरकार आणि सर्व राजकीय पक्षांवरही बऱ्याच प्रमाणात आहे हेही नाकबूल करता येणार नाही. कर्जवसुलीबाबत सहकारी संस्थांचे प्रयत्न अपुरे पडतच नाहीत असा दावा कोणीही करणार नाही. मात्र पुष्कळदा त्यांच्या या प्रयत्नांना सरकार आणि सरकारपक्ष, तसेच इतरही राजकीय पक्ष यांचा पुरेसा पाठिंबा मिळत नाही. एकदोन उदाहरणांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल. महाराष्ट्रात अन्नधान्याचा व्यापार एकाधिकार पद्धतीप्रमाणे सहकारी संस्थांमार्फत होऊ लागला. यामुळे खरेदी केंद्रावर सहकारी संस्थांच्या कर्जाची परस्पर वसुली व्हावी आणि तशी ती होईल, अशीच आमची ही योजना स्वीकारताना कल्पना होती, मात्र प्रत्यक्षात अनुभव फारच निराळा आला. एकाधिकार धान्य खरेदी केंद्रामार्फत अशी वसुली होण्याचे बाजूलाच राहिले. याउलट कर्जवसुली करण्यासाठी सोसायटी व बँकांच्या कर्मचाऱ्यांना खरेदी केंद्राच्या आसपासही फिरकायला अनेक ठिकाणी, अगदी कलेक्टरच्या हुकमाने बंदी करण्यात आली. खरेदी केंद्रामार्फत झालेल्या कर्ज-वसुलीची मागच्या दोन वर्षांची आकडेवारी बोलकी आहे. १९६९-७० साली एकूण वसुलीस पात्र अशा १३३ कोटी रुपयांच्या कर्जांपैकी सुमारे ८७ कोटी रुपयांची एकूण वसुली झाली. यापैकी खरेदी-विक्री व प्रक्रिया संस्था तसेच रूपांतर व्यवहार आणि एकाधिकार खरेदी केंद्रे यांच्यामार्फत आलेली एकूण वसुली सुमारे २५–३० कोटी रुपये होती. या २५–३० कोटींमध्ये एकाधिकार खरेदी केंद्रावर झालेली वसुली केवळ दीड कोट रुपयेच होती. १९७०–७१ सालीही अशा तऱ्हेने विविध संस्थांमार्फत झालेल्या वसुलीच्या एकूण ४२॥ कोटी रुपयांपैकी एकाधिकार खरेदी केंद्रावर झालेली वसुली

केवळ सव्वा कोटी रुपये इतकी अल्प होती. एकाधिकार खरेदी योजनेमार्फत सुमारे २७ कोटी रुपयांचे व्यवहार होत असता परस्पर कर्ज-वसुली मात्र एक-दीड कोटीच्या पुढे जाऊ नये या गोष्टीचा अंतर्मुख होऊन गंभीरपणे विचार करायला हवा.

दुसरे उदाहरण सक्तीच्या मार्गाने करावयाच्या वसुलीबाबतचे. कुवत असूनही जाणूनबुजून कर्जफेड न करणाऱ्या शेतकऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत जिल्हा बँका निदान अलीकडच्या काही वर्षांत तरी जागरूक आहेत. काही ठिकाणी त्यांच्यावर याही बाबतीत राजकीय दडपणे येतात ही गोष्ट काही नव्याने सांगायला नको. अशाही परिस्थितीत अगदी दावे दाखल करून सक्तीच्याच मार्गाने वसुली करण्यासाठी दाखलेही मिळवले तरी अशा दाखल्यांची अमलबजावणी शेवटी सरकारी अधिकाऱ्याकडूनच व्हावी लागते. अशा तऱ्हेने दाखले मिळविलेल्या रकमेपैकीही फार थोडी रक्कम प्रत्यक्षात वसूल केली जाते. गेल्या दोन-तीन वर्षांच्या आढाव्यावरून ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येईल. १९६८-६९ साली सुमारे ३४ कोटी रुपयांच्या वसुलीचे दाखले जिल्हा बँकांनी मिळविले. त्यापोटी वसुली मात्र झाली अवघी साडेसोळा कोटी रुपये म्हणजे जेमतेम ४९ टक्के. त्यापुढच्या वर्षीही अशा प्रकारची वसुली फक्त ५३ टक्केच झाली. १९७०–७१ साली तर परिस्थिती अधिकच बिघडली. वसुलीचे दाखले मिळवलेल्या रुपये ४५·२७ कोटींपैकी अवघी १५·२८ कोटी रुपये (म्हणजेच ३० टक्के) वसूल होऊ शकले. या परिस्थितीला जबाबदार कोण याचाही गंभीरपणे विचार व्हायला हवा.

## मुख्य प्रश्न : थकबाकी का उद्भवते ?

वास्तविक थकबाकीचा विचार करताना मुख्य मुद्दा ध्यानात घ्यायला पाहिजे तो म्हणजे थकबाकी का उद्भवते त्या कारणांचा. अशी कारणे दूर करण्याच्या दृष्टीनेच काही मूलभूत उपाययोजना करण्याची खरी गरज आहे. थकबाकीदारांच्या संख्येमध्ये छोट्या शेतकऱ्यांचेच प्राबल्य आहे याचा वर उल्लेख झाला आहेच. अशा लोकांना सहकारी संस्थांमार्फत जे काय थोडेफार कर्ज दिले जाते ते वेळीप्रसंगी, निरुपाय म्हणून त्याने कुटुंबातील आजारपण, मुलीचे लग्न अगर कुटुंबपोषण यांसारख्या अनिवार्य गरजा भागवण्यासाठी वापरले आणि त्यामुळे जर त्याच्यावर थकबाकीदार होण्याची पाळी आली तर याचा दोष सर्वस्वी त्याच्याकडे जातो काय, याही गोष्टीचा निःपक्षपातीपणे विचार व्हायला हवा.

या संदर्भात १९४५ साली गाडगीळ समितीने केलेल्या शिफारशींची आठवण होणे अपरिहार्य आहे ग्रामीण भागातील कर्जाच्या गरजांची प्रतिवर्षी पिकांसाठी व कौटुंबिक गरजेसाठी लागणारे कर्ज, शेती विकासाच्या कामासाठी लागणारे मध्यम व दीर्घ मुदत कर्ज आणि नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी लागणारे संकटनिवारण कर्ज अशा तीन प्रमुख गटांत विभागणी केली आणि या सर्व कारणांसाठी सहकारी व्यवस्थेतून पतपुरवठा व्हावयास हवा, असे तिने प्रतिपादन केले होते. पिकासाठी लागणाऱ्या कर्जाबरोबरच कौटुंबिक गरजांसाठीही लागणारा कर्जपुरवठा सहकारी यंत्रणेतून व्हावा या दृष्टीने राज्य बँकेच्या प्रेरणेने काही जिल्ह्यांत प्रायोगिक प्रयत्नही झाले. काही कारणांमुळे असे प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर जरी अद्याप झाले नसले तरीही आलेला अनुभव उत्तेजक आहे. अशा तऱ्हेचे प्रयत्न विस्तृत प्रमाणात होऊन त्यातून शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन सहकारी कर्ज व्यवस्थेत यावयास हवे; तेव्हाच खऱ्या अर्थाने सहकारी व्यवस्था सफल झाली असे मानता येईल. महाराष्ट्रासारख्या सहकारी दृष्ट्या प्रगत राज्यांतही शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्जापैकी सुमारे चाळीस ते पन्नास टक्के कर्जच सहकारी संस्थांमार्फत दिले जाते. सबंध देशाच्या संदर्भात तर शेतकऱ्यांच्या एकूण गरजापैकी जेमतेम २५ ते ३० टक्के कर्ज सहकारी यंत्रणेतून दिले जाते.

## आजची समस्या: मोठे आव्हान

अशा परिस्थितीत थकलेल्या कर्जाबाबत शेतकऱ्यांनाच केवळ दोषी धरणे योग्य नाही आणि म्हणून थकबाकीची समस्या अधिकच बिकट होते. मानवनिर्मित कारणाव्यतिरिक्त अन्य कारणांमुळे ज्यांचे कर्ज थकले आहे अशा लोकांना कर्जपुरवठा कसा चालू ठेवावयाचा आणि त्यांच्यावरील जुन्या कर्जाचा बोजा हळूहळू कसा कमी करावयाचा ही खरी आजची समस्या आहे. राज्य व केंद्र सरकारे, सहकारी संस्था आणि सहकारी कार्यकर्ते या सर्वांनाच हे एक मोठे आव्हान आहे. राष्ट्रीयीकृत बँकांनीही या प्रयत्नात सहभागी व्हावे अशीही अपेक्षा केल्यास वावगे होऊ नये. गेली दोन वर्षे आपण मोठ्या धैर्याने दुष्काळी परिस्थितीला तोंड दिले आहे. राज्य व जिल्हा बँका, सरकार आणि रिझर्व्ह बँक या सर्वांनी स्वीकारलेले वस्तुनिष्ठ धोरण आणि स्वीकृत धोरणांच्या शिस्तबद्ध अमलबजावणीबाबत दाखवलेला सांघिक एकोपा यांच्या बळावर सहकारी पतपुरवठा अखंडितपणे चालू राहिला आहे. येत्या वर्षभरात महाराष्ट्राचे सहकारी नेतृत्व आणि कर्तृत्व यांचा खरा कस लागणार आहे. आतापर्यंत अनेक कठीण प्रसंगी महाराष्ट्रातल्या सहकारी चळवळीने आपले सामर्थ्य प्रकट केलेले आहे. सध्याच्या परिस्थितीतूनही राज्यातील सहकाराची प्रतिमा अधिकच उजळून निघेल असा विश्वास व्यक्त केल्यास ते अती महत्त्वाकांक्षी वाटू नये.

## केवळ यंत्रणा बदलून उपयोग नाही

सहकारी संस्थांची गेल्या तीन–चार वर्षांत वाढलेली थकबाकी, त्यांच्या व्यवहारांवर येणारी राजकीय व अन्य दडपणे इत्यादी दोष दूर करण्याच्या दृष्टीने प्रचलित यंत्रणाच बदलावी असाही एक विचार कधी कधी पुढे येतो. निरनिराळ्या स्तरांवर स्वतंत्र सहकारी संस्थांऐवजी राज्य पातळीवर एक संस्था असावी आणि राज्यभर तिच्या शाखा असाव्या अशा तऱ्हेची एकछत्री व्यवस्था निर्माण करण्याबाबत अलीकडे विचार होऊ लागला

## दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, जळगाव

—: विना सहकार नहीं उद्धार :—

मुख्य कचेरी : नवी पेठ, महात्मा गांधी रोड, जळगाव

– टेलिफोन नं. ४४९, १५४, १२४

स्थापना : १९१६ ] [ तारेचा पत्ता—" इकोबँक "

चेअरमन–श्री. बापुसाहेब के. एम्. पाटील, (एम्. एल्. ए.) एल्एल्. बी.

व्हाइस चेअरमन–श्री. प्रल्हादराव एकनाथराव पाटील,

व्यवस्थापक–श्री. गो. म. शहाणे, बी. कॉम., एच. डी. सी., जी. डी. सी. अँड ए.

एकूण शाखा–५४

ता. २९–९–७२ अखेर (आकडे लाखांत)

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भाग भांडवल | १००·०० |
| (२) खपलेले भाग भांडवल | ९३·९६ |
| (३) गंगाजळी व इतर फंडस् | ८५·८६ |
| (४) एकूण ठेवी | ८३०-१८ |
| (५) एकूण खेळते भांडवल | १३११·१८ |
| (६) सहकारी संस्थांना दिलेले कर्ज | ९४९·६९ |

■ *प्रामुख्याने दिल्या जाणाऱ्या सेवा—*

■ भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.

■ सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातात.

■ सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

■ जळगाव, चोपडा, चाळीसगाव, यावल, पारोळा, जामनेर व पाचोरा येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्ची व्यवस्था आहे.

■ बँकेत ठेवलेला पैसा जिल्ह्यांतील शेती उत्पादनासाठी व शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी उपयोगात आणला जातो.



## धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

—धुळे—

स्थापना : १३–९–१९५७

मुल्य कचेरीः–गरूड बाग, धुळे (पोस्ट बॉक्स नं. ३) फो. नं. ९७

बँकेची सांपत्तिक स्थिती दि. २५–८–१९७२

| | |
|---|---|
| १. अधिकृत भांडवल | १ कोटी, ५० लाख |
| २. भरपाई झालेले भाग भांडवल | ९८ लाख, ११ हजार |
| ३. ठेवी | ४ कोटी, ३८ लाख, ६८ हजार |
| ४. कर्जे | ६ कोटी, ३० लाख, ३८ हजार |
| ५. खेळते भांडवल | ८ कोटी, ४४ लाख, ७४ हजार |

जिल्ह्यांतील मुख्य कचेरी व ३३ शाखा शेतकऱ्यांचे सोयीसाठीं व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी अविरत कार्य करीत आहेत.

—आमची खास वैशिष्ट्ये—

१. ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांचे व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.

२. सर्व प्रकारच्या बँक व्यवहाराच्या सोयी त्वरित आणि अल्प कमिशन घेऊन केल्या जातात.

३. बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारते.

४. बँक अल्प ठेव योजना व रिकरिंग डिपॉझिट योजना द्वारे बचत ठेवीवर भरपूर व्याज देते.

५. आमच्या बँकेस दि. १–७–७१ पासून डिपॉझिट इन्शुअरन्स ॲक्ट अन्वये विमा संरक्षण योजना सुरू झाल्याने रु. १०,००० पर्यन्तच्या सर्व ठेवीदारांना सुरक्षितता प्राप्त झालेली आहे.

एक वेळ आपण येऊन आम्हांस आपल्या सेवेची संधी द्यावी.

—मॅनेजर



[ स्थापना १९२१ ]

## गरगट्टी अँड सन्स

फोन नं. ११६ ] शहापूर–बेळगाव [ तार : मास इस्त्री

### धोबी, फॅमिली व शिंपी पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देशबांधवांस हे वर्ष सुखाचे जावो !

आहे. राज्यातल्या भू-विकास बँकांची अतिशय खालावलेली परिस्थिती हे या विचाराला चालना मिळण्याचे एक तात्कालिक कारण. या संबंधीचा मूलभूत दृष्टिकोनच बदलायला हवा. पतपुरवठ्याबाबत जे काही दोष निर्माण झाले आहेत ते सर्वस्वी यंत्रणेमुळेच आहेत असे नाही. आणि त्यामुळे यंत्रणा बदलून ते दूरही होणार नाहीत ही गोष्ट विसरून चालणार नाही.

मानवनिर्मित कारणांमुळे कर्जे थकली तर अशा संस्थांची संचालक मंडळे बरखास्त करून त्या जागी सरकारी प्रशासक नेमल्याने सर्व काही ऑल वेल होईल असे मानणे योग्य होणार नाही. यात खरा महत्त्वाचा असतो तो कर्ज घेणारा कर्जदार आणि त्याची आर्थिक परिस्थिती. जोपर्यंत ही आर्थिक परिस्थिती आपण बदलू शकत नाही, तोपर्यंत केवळ यंत्रणा बदलून फारसा उपयोग होईल असे वाटत नाही. यंत्रणेमधील बदलांचा विचार करताना ज्या प्रकारची यंत्रणा अभिप्रेत आहे, त्याच प्रकारची यंत्रणा आज राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये अस्तित्वात आहे. असे असता त्यांनीही ग्रामीण भागांमध्ये दिलेल्या कर्जाबाबत थकबाकीची समस्या निर्माण झालेली आहे. इतरही काही कॉर्पोरेशनस् इत्यादी संस्थांचा अनुभव फारसा वेगळा नाही.

याचाच अर्थ असा की, लोकशाही कारभार आणि विकेंद्रित व्यवहार या ज्या दोन मूलभूत तत्त्वांवर सहकारी व्यवस्थेची उभारणी झालेली आहे त्याऐवजी एकतंत्री, एकछत्री अशा नोकरशाही पद्धतीने चालणारी व्यवस्था निर्माण करून फारसे काही साध्य होईल असे वाटत नाही. प्रचलित विकेंद्रित सहकारी व्यवस्थेमध्ये सर्व थरांतील लोकांना त्यांच्या संस्थेच्या कारभारात सहभागी होता येते. संस्थेचे धोरण ठरविण्यात आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यात त्यांचा स्वतःचा महत्त्वाचा वाटा असतो. राज्यव्यापी संस्थेच्या एकछत्री कारभारात या गोष्टी नसतात. मग अशा संस्थेला 'सहकारी संस्था' असे नुसते नावापुरते म्हणण्यात तरी काय अर्थ आहे ?

अशा तऱ्हेची एकछत्री व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने जिथे सहकारी चळवळ समर्थ नाही अशा राज्यात शेतीकर्ज महामंडळ (ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन) स्थापन करावे अशी सूचना १९४५ साली गाडगीळ समितीने केली होती. मात्र महाराष्ट्रात सर्व लहान लहान लोकांच्या सहकारी संस्थांनी जी प्रचंड कामे केली होती त्यावरून या राज्यातील सहकारी चळवळीचा आवाका ध्यानात घेऊन असा ठाम निर्णय घेण्यात आला की हे काम सहकारी यंत्रणेमार्फतच अधिक प्रभावीपणे होऊ शकेल.

## केंद्रित व्यवस्थेत सहकार नावापुरताच !

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ लोकेच्छा व लोकप्रेरणा यामुळेच प्रामुख्याने रुजली, फोफावली. महाराष्ट्रातली सहकारी चळवळ ही खरीखुरी "लोकांनी, लोकांसाठी चालविलेली, लोकांची चळवळ" आहे हे तिचे खरे वैशिष्ट्य आहे. विकेंद्रित व्यवस्थेशिवाय हे कसे शक्य आहे ? विशेषतः जिल्हा बँकांचे बाबतीत तर विकेंद्रित व्यवहाराला अधिकच महत्त्व प्राप्त होते. खेडोपाडी शाखा उघडून लोकांच्याकडून ठेवी जमविणे आणि त्यांना बँकिंगच्या सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे हे महत्त्वाचे कार्य जिल्हा बँकांना करावयाचे असते. यादृष्टीने जिल्ह्यातल्या लोकांशी प्रत्यक्ष संपर्क ठेवणे-वाढविणे, त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करणे, इ. मार्गांनी जिल्हा बँकेच्या संचालकांना लोकांचा प्रतिसाद मिळवावा लागतो. स्थानिक कार्यकर्ते आणि स्थानिक संस्थाच हे काम अधिक प्रभावीपणे करू शकतील. राज्य पातळीवरील बँकेच्या शाखेबाबत लोकांना जिल्हा बँकेच्या तुलनेने कमीच आत्मीयता वाटेल. जिल्हा-जिल्ह्यांतील स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात शेती सुधारणा आणि कृषि-औद्योगिक विकास यांचे कार्यक्रम आखणे आणि यशस्वीपणे पार पाडणे या कामातही स्थानिक नेतृत्वाला लोकांचा सहयोग निश्चितच अधिक प्रमाणात मिळेल. ही आपली संस्था आहे, तीमध्ये आपल्या मताला किंमत आहे, अशी समाधानाची भावना त्यांच्या मनात निर्माण होईल. त्याऐवजी राज्यव्यापी एकछत्री बँक म्हणजे एक कॉर्पोरेशनच होईल. त्यात सहकार तो नावापलीकडे काय राहणार, ते कळत नाही.

## विकेंद्रीकरणाचा बोलका अनुभव

अशा तऱ्हेच्या विकेंद्रीकरणाचा गेल्या १०-१५ वर्षातील अनुभवही याबाबत पुरेसा बोलका आहे. पूर्वी तालुकावार बँका होत्या, त्याचप्रमाणे राज्य बँकेच्या शाखाही खेडोपाडी काम करीत होत्या. किंबहुना राज्य बँक सुरू झाली तेव्हा सुरुवातीच्या काळात खेड्यापाड्यांत शाखा उघडून शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्यावरच भर होता. या दोन्ही प्रकारांच्या अनुभवातून पुढे असे स्पष्टपणे दिसून आले की ग्रामीण विकासकार्याला चालना व गती प्राप्त होण्याच्या दृष्टीने लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या जिल्हावार स्वतंत्र व स्वायत्त बँकाच अधिक फलदायी ठरतील. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने जिल्ह्यातल्या आपल्या अनेक शाखांचे व्यवहार त्या त्या जिल्ह्यातल्या जिल्हा बँकांकडे सुपूर्त केले. जिथे जिल्हा बँक नव्हती तिथे अशी बँक स्थापन करून तिची जोपासना केली. हा गेल्या दहा-पंधरा वर्षांचा इतिहास विसरून कसा चालेल ? या बदलामुळेच आपण ठेवीवाढ आणि कर्जपुरवठ्यामध्ये भरीव कामगिरी करू शकलो. इतर राज्यांच्या तुलनेने विचार केला तर आपल्या कामगिरीचे खरे महत्त्व प्रतीत होईल. देशातल्या सर्व म्हणजे ३४० जिल्हा बँकांकडील एकूण ४१९ कोटी रुपयांच्या ठेवींपैकी ११३ कोटी रुपये म्हणजेच २७ टक्के ठेवी आपल्या राज्यातल्या जिल्हा बँकांच्या आहेत. तसेच त्यांच्या एकूण ८०१ कोटी रुपये येणे कर्जांपैकी १७७ कोटी रुपये म्हणजेच २२ टक्के आपल्याकडील जिल्हा बँकांचे आहे, या गोष्टी काय दर्शवितात ?

## घडी विस्कटू नका

मात्र इथे एक महत्त्वाची गोष्ट विसरून चालणार नाही. कै. डॉ. गाडगीळांनी दहा वर्षांपूर्वी याच व्यासपीठावरून म्हटल्याप्रमाणे "सहकारी बँक व्यवस्था म्हणजे प्रत्येक जिल्ह्याची एक स्वतंत्र बँक एवढीच नव्हे तर राज्य बँक समवेत सर्वांची एक सूत्रबद्ध व्यवहार रचना आहे." त्यामुळे मोठ्या एकत्रित व्यवहारांतील शिस्त व काटकसर आणि विकेंद्रित व्यवस्थापनातले स्वातंत्र्य असे दोन्ही प्रकारचे फायदे यामध्ये मिळू शकतात आणि म्हणूनच आपले पूर्वीचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील यांच्यासारख्या अनुभवी व द्रष्ट्या सहकारी कार्यकर्त्यांनीही प्रचलित त्रिस्तर पद्धतीच सर्वथैव इष्ट आहे असे सांगितले होते. त्यांनी म्हटले होते की, वर्षानुवर्षांच्या अनुभवाने विचारवंत सहकारी कार्यकर्त्यांनी परिश्रमपूर्वक बसविलेली सहकारी व्यवस्थेची घडी विस्कटून टाकण्याचा थोडा जरी प्रयत्न झाला तरी त्याचे फार मोठे परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झाल्यावाचून राहणार नाहीत.

निरनिराळ्या समित्यांच्या शिफारशींमुळे शेती कर्जव्यवहारासंबंधी एकप्रकारे गोंधळाची परिस्थिती /निर्माण झालेली आहे. समाजातील असमर्थ घटकांची जपणूक करण्याबाबत आजपर्यन्त झालेले प्रयत्न अपुरे पडले हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे साहजिकच समाजातल्या दलित, दुर्बल, दुर्लक्षित अशा लोकांकडे विकास प्रयत्नात खास लक्ष दिले जाऊ लागले आहे. या सर्व परिस्थितीत देशातील सहकारी पतपुरवठा व्यवस्थेची जडण-घडण, कार्यपद्धती आणि त्यांचेवरील जबाबदारी यांचा विचार करण्याच्या दृष्टीने एका तज्ज्ञ व उच्चाधिकार समितीची नेमणूक करणे अगत्याचे झाले आहे. अशा बाबतीत महाराष्ट्रातील सहकारी चळवळ नेहमीच एक पाऊल पुढे असते. १५ वर्षांपूर्वी या बँकेने नेमलेल्या पीककर्ज मूल्यमापन समितीने केलेल्या शिफारसीमुळे सबंध देशाच्या शेती कर्ज-व्यवस्थेमध्ये एक नवे युग निर्माण झाले. अशाच तऱ्हेची एक तज्ज्ञ समिती बँकेमार्फत नेमण्याच्या दृष्टीने विचार चालू असून लवकरच अशी कमिटी नेमण्यात येईल.

---

## चिनी–जपानी–जर्मन–इंग्रजी शब्दकोश

देवनागरी लिपीतील चिनी, जपानी, जर्मन आणि इंग्रजी शब्दकोश आचार्य विनोबा भावे प्रसिद्ध करणार आहेत. त्यासाठी आवश्यक ते साहित्य त्यांनी जमविले आहे.

---

## जगातील सर्वांत वयस्क राष्ट्रप्रमुख

जगातील सर्वांत वयस्क राष्ट्रप्रमुख आयर्लंडचे इमॉन डी. व्हॅलेरा यांनी नुकतेच ९१ व्या वर्षात पदार्पण केले. गेली कित्येक वर्षे ते अंध अवस्थेत असून आता ते राजकीय जीवनात भाग घेत नाहीत.

चवदार पिठासाठी

# पिठाच्या चक्क्या

- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक –

**भिडे अँड सन्स प्रा. लि. सांगली**

**महाराष्ट्र राज्य.**




सोल सेलींग अेजन्टस्

नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

१७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. डी आर.

MARATHI

# कामगार व त्यांचे काही प्रश्न

## स्वतंत्र अभ्यास करणाऱ्या यंत्रणेची आवश्यकता

लेखक :— शं. ज. जोशी, बी. कॉम.

शेतीप्रधान देश गरीब असतो. उद्योगधंद्यामुळे रोजगार वाढतो व देशाला संपन्नता लाभते. देशाचे सामर्थ्य उद्योगधंद्यांवर, वैज्ञानिक प्रगतीवर व माणसांच्या गुणांवर-निष्ठेवर अवलंबून असते. जर्मनी, जपान व इसराएल यांच्या उदाहरणांवरून हे सहज दिसून येते.

### कामगाराचा अभ्यास

उद्योग-व्यवसायाचा केंद्रबिंदू कामगार–कर्मचारी. ती एक विकत मिळणारी विपुल वस्तू, असा सर्वसाधारण समज व परिस्थिती असल्याने भारतात त्याचा स्वतंत्र विचार वा अभ्यास फारसा झालेला दिसत नाही. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंडमध्ये काही विचारवंतांनी शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून काही निष्कर्ष वेळोवेळी काढले आहेत. भारतात तसे प्रयत्न होणे जरूर आहे.

### प्रचालित कायदे

फॅक्टरीज् ॲक्ट, इन्डस्ट्रिअल डिस्प्यूट्स् ॲक्ट, बोनस ॲक्ट, ग्रॅच्युइटी ॲक्ट वगैरे कामगारविषयक कायद्यात कारखाने कसे असावेत, त्यांनी काय काय केले पाहिजे, काय सोई करावयास हव्यात, वाद निर्माण झाल्यास त्याची सोडवणूक कशी करावी, कामगारांना बोनस व ग्रॅच्युइटीबाबत काय व्यवस्था करावी अशा बाबी नमूद केलेल्या असतात. सर्वसाधारणपणे इंग्लंड-मधील कायदे पुढे ठेवून हे कायदे भारतात लागू करण्यात आले होते. विकसनशील देशात प्रगत देशातील कायदे कितपत योग्य याचा स्वतंत्रपणे विचार होणे इष्ट आह. तसेच भांडवल-शाही देशातील कायदे व समाजवादी विचारसरणीच्या देशातील कायदे यांचे स्वरूप निराळे असते. जपानमध्ये काम कमी करणे किंवा साधनांची मोडतोड करणे म्हणजे देशद्रोह समजला जातो. कामगार-कल्याण-विषयक बाबींची जबाबदारी रशियात कामगार-युनियन्सवर टाकण्यात येते. भारतात ह्या जबाबदाऱ्या मुख्यत: कारखान्यांवर टाकण्यात आल्या असून त्याबाबतचे सरकारी नियंत्रण वाढत आहे.

### सरकार व कारखाने

आज परिस्थिती अशी आहे की सरकार-दरबारात कारखान-दारांबाबत अविश्वासाचे वातावरण आहे. जणू काही कारखानदार देशद्रोही आहेत. या वातावरणाचा परिणाम कामगार–मनावरही होतो आणि परस्पर-विश्वासाऐवजी दुजाभाव, वर्गद्वेष, अन्याय होत असल्याची मनोधारणा कामगारांत रुजून वाढीला लागत आहे.

उलट, सरकारी कारभाराचा अनुभव प्रॉव्हिडंड फंड, ई. एस्. आय्. बाबत येतो तो वेळकाढूपणाचा, अनास्थेचा, लाल फितीचा. राष्ट्रीयीकरण झालेल्या बँका, विमा कंपन्या, वाहतुक व्यवस्था, यात शिथिलता व दीर्घसूत्रीपणा आढळून येतो. अशा परिस्थितीत कामगार विमनस्क झाला, काय बरोबर, काय चूक, अशा संभ्रमात पडला तर नवल नाही.

### औद्योगिक संस्कृती

औद्योगिक संस्कृती नवीन आहे. जुनी संस्कृती शेतीप्रधान होती, व्यक्तिनिष्ठ होती. स्वत:ची जमीन, स्वत:चे कुटुंब, स्वत:चे घर, स्वत:चे गाव, यांत भावबंध गुंतलेले असत. कुरूढ समाजात अनेक लग्ने रूढ आहेत. घरात आलेली नवीन स्त्री व होणारी मुले टोपल्या विणायला, धंदा वाढवावयाला उपयोगी पडतात असा त्यांचा युक्तिवाद. तीच गोष्ट शेतीची. औद्योगिक युगात मशीनवर किती माणसांनी काम करावयाचे हे ठरलेले. त्यांचे शिक्षण ठरलेले. इतरांना तेथे जागा नाही. कारखान्यांचे गावी व भोवती म्हणूनच गर्दी व झोपटपट्टी.

कोकणातून आलेले बाळू व उत्तर हिंदुस्थानातून आलेले भय्ये आपापल्या गावच्या जॉबर किंवा मुकादमाचे गिरणीत किंवा कारखान्यात मुंबईला कामाला लागतात. बरेचदा त्यांना गिरणीचे नाव किंवा पत्ताही सांगता येत नाही. जागा मिळाली तर ठीक; नाही तर वर्षानुवर्ष शहरात एकटे राहावे लागते. सुटी काढून गावी केव्हातरी, सणासुदी जाणे होते. शहरातील पैसा व राहणीचे आकर्षण त्याला गावापासून दूर नेत असते. शहरात त्याला एकटे वाटते. तब्बेतीची आबाळ होते. कधी धक्के बसतात. कधी मन विषण्ण होते. पण पुढे हे सारे अंगवळणी पडते. नवीन जीवनात रस वाटू लागतो. अर्थात हा प्रवास सोपा नसतो. वळणे घेणारा, दीर्घ असतो. माणसाचे मन व शरीर बदलत्या परिस्थितीशी तडजोड करते.

### सर्वच जण चुकले आहेत !

प्रत्येकजण सर्वच चुकलेले आहेत, त्यात बदल हवा, क्रांती होणे जरूर आहे, असे सांगत असतो. अश्रद्धेच्या या वातावरणात कोणी कोणाबद्दल कसा व का आदर दाखवावयाचा ? पुढारीपण हा किफायतशीर धंदा झाला असून तो टिकवण्यासाठी ज्याची त्याची धडपड. लोकशाहीत हक्क व जबाबदारी बरोबरीने येते हे खरे असले तरी अनुभवास येते ते असे की संघटना व चळवळ यांचे जोरावर हक्क प्रस्थापित करता येतात. मग जबाबदारीच्या भानगडीत पडतो कोण ?

समाजशास्त्राचा एक संकेत असतो की आहे ही परिस्थिती

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: 1. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७२ कारखाना: १७६१०२

लक्षात घेऊनच पुढला विचार करावा. समाजजीवनाचा, घटनांचा ओघ पुढे असतो, मागील घटना गृहीत धरून पुढे चालावयाचे असते.

### कारखान्यातील काम

सर्वसाधारणपणे कारखान्यातील काम सांघिक स्वरूपाचे असते.

कामगाराचा जास्तीत जास्त वेळ संबंध येतो तो कामावरील सहकाऱ्यांशी; तेच त्याचे जग असते.

कामाचे स्वरूप, जागा, पद्धत, ह्यापेक्षा कामाचे श्रेय कुणाला मिळते, त्याला सुरक्षितता किती आहे यावर त्याची वागणूक व काम अवलंबून असते; व त्या प्रमाणात त्याला आपुलकी वाटते.

कामगार तक्रार करतो ती पुष्कळ वेळा कामाबद्दल खरोखर नसून त्याची अस्मिता दुखावलेली असते म्हणून.

कामगारांचे काम त्याच्या घरच्या व कारखान्यातील परिस्थितीवर अवलंबून असते.

वरिष्ठांच्या कामाचे पद्धतीत, वागणुकीत बदल झाला की त्याची प्रतिक्रिया कामगारांचे कामावर व वर्तणुकीवर होते.

कामगार गटाने काम करीत असल्याने गट योजनापूर्वक बनविणे इष्ट ठरते. असे एकसंघ गट बदलत्या वाऱ्यांना यशस्वीपणे तोंड देऊ शकतात.

सुपरवायझर—फोरमन यांचे काम विशेष जोखमीचे असते. चालकांचे वतीने कामगाराकडून काम करवून घेणे; तसेच कामगारांचे वतीने चालकांकडे अडचणी मांडणे असे अवघड काम त्याला करावे लागते.

### कामातील अडचणी

पुष्कळदा असे होते की योग्य माणसाला बढती न मिळता जो कटकटी-चळवळ करतो त्याला वरची जागा मिळून जाते.

बाहेरच्या, इतर जातीच्या, इतर भाविकांना कामगाराला आपल्या बरोबर कामास घेण्यास कामगार गट खूष नसतो.

धंद्यात जेव्हा तीव्र स्पर्धा असते तेव्हा जास्तीत जास्त काम कमीत कमी कामगारांत करून घेण्याचे प्रयत्न होतात. फ्रेडरिक टेलरचा अनुभव उद्‌बोधक आहे:—

"मी माझ्या प्रयोगाकरिता एका डच कामगाराची निवड केली. तो तगडा, कामसू, चार पैसे अधिक मिळवावे असे वाटणारा होता. मी त्याला सांगेन तसे त्याने काम करावे व केलेल्या कामाचे पैसे त्याला देण्याचे ठरले. नेहमीच्या १२१/२ टनाऐवजी ४७१/२ टन लोखंड त्याने रेल्वे वॅगनमध्ये भरले. जादा कामाबद्दल त्याला नेहमीपेक्षा ६० टक्के वेतन अधिक मिळाले. हा प्रयोग तीन वर्षे चालला होता. पुढे इतर कामगारही नेहमीपेक्षा जास्त काम देऊ लागले. हे काम मी केले तेव्हा तरुण होतो. पण तीन वर्षाअखेरीस काळजी व भोवतालचे तिरस्काराचे वातावरण यांनी मी किती तरी म्हातारा झालो. प्रत्येक कामगाराच्या डोळ्यांत मला जळजळीत द्वेष दिसत होता; प्रत्येकाचा मी शत्रूच बनलो होतो. त्या तीन वर्षांचा विचार आजही अंगावर शहारे आणतो."

### काही गैरसमज

माणसाला काम-व्यवसाय हवा असतो. काही न करता दिवसभर राहणे त्याला आवडत नाही.

कामाची जागा कशी आहे, तपमान, उजेड, आवाज, वगैरेंवर काम अवलंबून असते, असे नाही. एका ऑफिसमध्ये चित्रे काढण्यासारखी बारकाईने करावयाची कामे करणारे वीस-एक कर्मचारी कामगार होते. उजेडाची चांगली सोय व्हावी म्हणून साध्या दिव्याऐवजी ट्यूब्‌स् लावण्यात आल्या. लगेच डोळ्यांना त्रास होतो, डोके दुखते, अशा तक्रारींना सुरुवात झाली. डॉक्टरांनी डोळे तपासले, नवीन योजना कामाला अधिक सोईस्कर, असे त्यांचेही मत पडले. पुढे सर्वांनी अर्ज करून डोळ्यांना होणाऱ्या त्रासामुळे खात्यात काम करणे अशक्य आहे असे निवेदन सादर केले. सर्वांना बोलावून चौकशी करता असे आढळले की त्यांना प्रथम बोलावून समजावून सांगितले नव्हते ही चूक झाली होती. तेथील फोरमनही जबाबदार होता. त्याला बदलल्यावर पुन्हा तक्रार झालीच नाही. काम सुरळीत होऊ लागले.

केवळ पैशाकरता मनुष्य काम करतो हे सर्वस्वी खरे नाही. चलनवाढीच्या काळात, तसेच इतरांचे मानाने पगार कमी असतात तेथे पगाराबाबत कुरकूर करण्यास जागा असते. देशातील ३० ते ४० टक्के औद्योगिक तंटे पगारवाढीकरता असल्याचे दिसून आले आहे. भारतातील जीवनमानात १९५० ते १९६५ च्या काळात दरवर्षी फक्त १·४२ टक्क्यांनी वाढ होत असल्याचे दिसून आले आहे. असे असले तरी जेथे पगार, सुख-सवलती भरपूर असतात, तेथेही पगारवाढीबाबत वाद का असावेत ? असे दिसून येते की तेथील वातावरण गढूळ असते, शाश्वती वाटत नाही आणि त्याची भरपाई करण्याकरता अधिक वेतनाची मागणी असते.

### काही पथ्ये

कठीण परिस्थितीमुळे अशांतता निर्माण होते हे सर्वस्वी खरे नाही. "ठेविले अनंते तैसेची राहावे" हा मनुष्य-स्वभाव अनेक अर्थाने खरा आहे. अपेक्षिलेले मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली, तसे वाटू लागले, म्हणजे ते मिळण्यासाठी अशांतता उग्र स्वरूप धारण करते.

कारखाना-संस्थेच्या प्रमुखाला केवळ आपल्या कामात वाकबगार असून चालत नाही. त्याला मानवी स्वभावाचे सूक्ष्म आकलन व सहानुभूती असणे आवश्यक असते. आपल्या व्यवहारांशी संबंधित कामगार, माल देणारे, घेणारे, तसेच भांडवल पुरविणारे भागधारक व बँकर्स या सर्वांना आपल्याबरोबर घेऊन जाण्याची त्याची मनोधारणा असली पाहिजे. नाहीतर

सुप्त वा स्पष्ट असहकार, उदासीनता व अखेर संप अटळ ठरतात. लहान मुलाला, कुत्र्यासारख्या प्राण्यालाही आपुलकीची भावना समजते. ती व्यवहारी मंडळींना चटकन समजेल यात नवल नाही.

व्यक्तिमत्त्व, अस्मिता, ही माणसाची स्वाभाविक प्रकृती आहे. पण वाटचाल आहे बिन-चेहऱ्याच्या कामगाराकडे, शासनाकडे.

### कामगार चळवळ

कामगार युनियन्सचा सर्वसाधारण आग्रह असतो की कामगारांनी जे काही मिळवयाचे-द्यावयाचे ते त्यांच्या प्रयत्नामुळे, त्यांच्या मार्फतच व्हावे. औद्योगिक तंटा हा कामगार-चळवळीचा आत्मा ठरतो. राजकीय पुढारीपण बरेच वेळा कामगार चळवळीतून निर्माण होत असल्याने त्या चळवळीचा रंग निर्भेळ राहात नाही. कामगार व औद्योगिक प्रश्नांचा विचार करताना ही गोष्ट लक्षात ठेवणे जरुरीचे असते. गोदरेज कंपनीत पगार, भत्ते, कामाची व्यवस्था, याबाबत तक्रारीस जागा नव्हती. तरीही संप झाला. किरकोळ मागण्यांना महत्त्व आले. राजकारणाची मिसळ झाल्यावर निराळाच रंग भरला. दंगली झाल्या. जमावाचे मानसशास्त्र अगदी वेगळे असते. नेहमीचे संकेत गळून पडतात.

### आजची स्थिती

काही आठवड्यांपूर्वी मुंबईत कामगार प्रश्नांशी संबंधित तज्ज्ञ व पुढारी यांचा परिसंवाद झाला. आजच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत एकाच उद्योगात अनेक कामगार-युनियन्स अपरिहार्य आहेत; तूर्त एकत्रीकरण करणे कठीण दिसते. एक उद्योग, एक युनियन हे तत्त्व मान्य, पण आजच्या काळात हे कठीण, असा अखेर निष्कर्ष निघाला.

आपण आज २० व्या शतकाच्या मध्याच्या पुढे चाललो आहोत. आता परत फिरणे शक्य नाही. पुढील मार्गात कितीही अडचणी आल्या, वादळे उठली, तरी आता मागे वळता येत नाही. पुढेच गेले पाहिजे.

### अभ्यासाची निकड

भारतात औद्योगीकरणाचा वेग गेल्या २५-३० वर्षात वाढला आहे. लायक कामगार मिळत नाहीत. उद्योगांची उत्पादनक्षमता वाढत नाही. औद्योगिक अशांतता वाढत आहे. सरकारी व राष्ट्रीयीकरण झालेल्या कारखान्यांत-संस्थांतही कामगार प्रश्न उग्र स्वरूप धारण करीत आहेत. कामगार-कर्मचारी ह्यांचा विचार व्यक्ती म्हणून व्हावयास हवा. तो समाजातील एक घटक म्हणून वावरत असतो, विचार करीत असतो, वागत असतो. कामगार-कर्मचाऱ्यांच्या गटांचाही अभ्यास व्हावयास हवा. कारखान्यांचे कार्य व स्वरूप पाहता या सर्वांचा अभ्यास त्यांच्याकडून होईल असे वाटत नाही. त्यांना शक्य होणार नाही. कामगारप्रश्नांचा सखोल, शास्त्रीय-पद्धतीने सतत अभ्यास करणारी स्वतंत्र यंत्रणा व अभ्यासक यांची गरज तीव्रतेने भासते.


## दि बँक ऑफ कराड लि., कराड

(शेड्युल्ड बँक)

रजिस्टर्ड ऑफिस :—१५, रविवार पेठ, कराड

शाखा :

मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटा, कोल्हापूर, मलकापूर, भोर, ताकारी व संगमेश्वर

: ठेवीवरील व्याजाचे दर :

सेव्हिंग्ज ठेव ४½ टक्के

१ ते ५ वर्षे ६½ टक्के ते ७¼ टक्के

म. वि. खंडकर
चेअरमन

ही दीपावली आमच्या असंख्य ग्राहकांना, हितचिंतकांना, साखर व्यापाऱ्यांना सुखाची व भरभराटीची जावो.

साखर उत्पादनाबरोबर वारणा सहकारी उद्योग व शिक्षण-समूह निर्माण करून निष्कांचन वारणा खोऱ्याचा कायापालट करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणारा—

## श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि.

— वारणानगर —

पोस्ट : वारणानगर, तहशील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर [महाराष्ट्र]

तार : "वारणासाकर" वारणानगर ] [ फोन नं. कोल्हापूर २२४६

बाळासाहेब जगौंडा पाटील — व्हाईस चेअरमन
विश्वनाथ आण्णा कोरे — चेअरमन

नंदकुमार काशिनाथ नाईक
कार्यकारी संचालक

# 'द लाँगेस्ट डे'

## ( ताळेबंदाचे दिवस )

( लेखक :—विजय गोखले )

मोठी रणधुमाळी चालू होती. संगिनीवर संगिनी घासल्या जात होत्या, विमानांची घरघर ऐकू येत होती, बॉम्ब गोळ्यांचे आवाज कानात काणठळया देईपर्यंत वाढले होते, किती तास–किती दिवस उलटून गेले ह्याला सुमार नव्हता–पण हे सर्व थांबत नव्हते-थांबणे शक्यच नव्हते. युद्धच ते!

ऽऽऽ जनरल साहेबांनी ( रिटायर्ड ) आपल्या घोगऱ्या पण स्पष्ट आवाजात सांगण्यास सुरुवात केली, "यंदाचे वर्षी आपले उद्दिष्ट १२ कोटींचे आहे, आतापर्यंत झालेली विक्री व उत्पादन विचारात घेता आपल्याला बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे. आपण सर्वांनी आता जास्तीत जास्त मेहनत करून हे उद्दिष्ट गाठूया. मग कोणत्याही अडचणी आल्या तरी त्यावर मात करणे आवश्यकच आहे." वगैरे वगैरे

नवीन आलेल्या गणपतरावांना ही सभा म्हणजे विशेष वाटले. ते हिशेब करत होते, सारे ३१ दिवस राहिले आणि इतके मोठे उद्दिष्ट कसे काय गाठावयाचे? पण समोर बसलेले बंडोपंत त्यांना सांगत होते, अहो! हे दरवर्षीचेच आहे. देखते रहो! जादूची कांडी फिरल्यागत हे सर्व चालेल.

एरवी सकाळी दहानंतर केव्हातरी येणारे खरेदी अधिकारी घाईघाईने ऑफिसात लवकरच आले होते. आज त्यांना उसंत नव्हती. आल्या आल्या ऑपरेटरला दहा-पंधरा ठिकाणी फोन जोडण्यास सांगितले. स्टेनोला बोलावून एक सिगारेट शिलगावली आणि पत्राचा मजकूर सांगत राहिले. मध्येच आठवल्यागत करून एका-दोघा कारकुनांना बोलावून त्यांनाही बाजारात पिटाळले. शिपाई न बोलावताच आला होता, तोही दोन चहाची आर्डर घेऊन पसार झाला होता.

अंतर्गत फोन वाजला. कोण! हं!! होय सर, गुडमॉर्निंग सर, हो आजच, नाही, माणसांना पाठवले आहे–काय? होऽ होऽऽ येईल येईल, दुपारी निश्चितच! होय सर, यस सर, पण सर, नाही सर, ची जोरात फैर झडत होती.

मनात मात्र खरेदी अधिकारी अचंबाच व्यक्त करत होते. इतका पैसा आला कोठून? अख्ख्या वर्षात व्यापाऱ्यांना पैसे दिले नाहीत म्हणून माल मिळत नव्हता. पण आता तशी स्थिती नव्हती. माल पाहिजेच म्हटल्यावर ताबडतोब पैशयाची व्यवस्थाही करतो म्हणून साहेब म्हणत होते. वा ऽऽऽ कम्माल आहे! नाही म्हणावयाला एकतर त्यावर प्रक्रिया होऊन पक्का माल तयार होईल व बाहेर जाईल, नाहीतर आहेच जिंदगी व मालमत्तेत वर्षअखेर त्याची भर! आणखी एक सिगारेटचा जोरात झुरका....

आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे ऑफिसात आले काय वा न आले काय माहितगारांना ते ऑफीस संपल्यानंतरच भेटणार हे ठरून गेल्यागतच असे. साधारणपणे त्यांची सकाळ ह्या बँकेतून त्या बँकेत जाण्यात, दुपारी सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेण्यात आणि संध्याकाळी आफीस सुटल्यावर ऑफीसात! हे गृहस्थ कोण म्हणून सांगावयाचे विसरलोच! आमच्या संस्थेचे आधारस्तंभ–आंकड्यांचे जादूगार!

प्रभातसमयी श्रींचे आगमन म्हणजे काय विचारता? पैसे देण्यासाठी की घेण्यासाठी?

अरे, देशपांड्यांना बोलव, येताना सर्व बँकांची चेक पुस्तके व बँक रजिस्टर घेऊन येण्यास सांग.-समन्स् निघाला. हो! त्यांचेकडे इतर संस्थांची पुस्तके आहेत ती पण मागितली आहेत म्हणून सांग. अन् दाराला कुलूप लाव, कोणी आलच तर मी नाही म्हणून सांगावयाचे, कळलं का? नाहीतर मीच सांगितले आहे आलो नाही म्हणून सांगायला असे सांगशील––जा ऽ त्यांना लवकर पाठवून दे. आणि चहा-बिस्कीटे सांग मामाला. नानाला सांग गाडी घरी घेऊन जा, मी येथेच जेवणार आहे. संध्याकाळी घरी फोन करीन.

गाडीचा वेग बघितला ना? गणपतराव! आजचा दिवस म्हणजे गिरसप्पाचा धबधबा! कागद, पेन्सील, पेन, रजिस्टरे, चेक बुके, जर्नल एंट्रीज हे सर्व धडाधड खालीवर, वरखाली होणार! स्टार्ट टु विन. एकापासून ते नऊ हे आकडे किती वेळा फिरणार आहेत! स्काय इज् लिमीट. अर्थात् त्यांची झेप मात्र ताटातून वाटीत पुन्हा ताटात इतकीच हं! जर्नल लेजर टु जनरल लेजर अगेन् जर्नल अॅंट्री टू जर्नल लेजर फिरसे जनरल लेजर!! आकड्यांचा पसारा वाढतच राहतो. नव्या नवरीला धिरडी घालावयाला सांगितली की जसे पीठ आणि पाण्याचे प्रमाण समजत नाही. मग पातळ झाल की घाल पीठ, घट्ट झाल की घाल पाणी चालूच असत. तोच प्रकार संस्थेचा नफा–तोटा दाखवण्यात चालतो. प्रत्यक्षात व्यवहार काय झाला हे कधीच भागधारकाला कळत नसते. हिशोबाधिकारी जी आकड्यांची आतषबाजी करून ताळेबंद वर्षानंतर पाच-सहा महिन्यांनी काढतो अन् भागधारकांचे दातावर एक तुण फेकतो त्यातच तो समाधान मानतो, वर वार्षिक सभेला आला तर चहा-चिवडा आहेच! पुन्हा संस्थेत वर्षभर घोळ घालायला हे संस्थानिक मोकळे.—मोरया, पुढल्या वर्षी लवकर या!

तसे पाहिले तर विक्री–विभाग हा संस्थेचा कणाच, पण जनरल साहेबाला आपल्यापेक्षा कोणी हुशार मनुष्य कसा परवडणार!

## उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड

( मुख्य कार्यालय लातूर )

फोन नं.:—मुख्य कार्यालय २५०, ८७
मॅनेजर २८९, चेअरमन २८५

सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था बँकेच्या मुख्य कार्यालयात, उस्मानाबाद व उदगीर शाखेत उपलब्ध आहे.

बँकेची सांपत्तिक परिस्थिती : दिनांक ३०–६–७२ अखेर

( आकडे लाखांत )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत भाग भांडवल | ... | १७५·०० |
| (२) भरपाई झालेले भाग भांडवल | ... | १२३·५७ |
| (३) राखीव निधी व इतर निधी | ... | ५३·३१ |
| (४) एकूण ठेवी | ... | ४०८·४० |
| (५) दिलेली कर्जे | ... | ९८५·८० |
| (६) गुंतवणूक | ... | २०८·६९ |
| (७) खेळते भांडवल | ... | १२७७·३० |

(१) ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर.
(२) सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
(३) सामुदायिक हितासाठी आपल्या ६५ शाखांद्वारे झटणारी उस्मानाबाद जिल्ह्यांतील एकमेव बँक.

एन. व्ही. सोमटके — व्यवस्थापक
विक्रम पडवळ — व्हा- चेअरमन
विजयसिंह चालुक्य — चेअरमन

---

दीपावली व नूतन वर्ष सभासदांस, ग्राहकांस व ठेवीदारांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीचे जावो !

सहकारी क्षेत्रांत प्रगतिपथावर असलेली

## सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर

( मुख्य कार्यालय : ७६ गोल्ड फिंच पेठ, सोलापूर )

वैशिष्ट्ये—
(१) बँकेची स्वतःची इमारत.
(२) शाखा :—[१] मंगळवार पेठ—सोलापूर [२] बार्शी.
(३) ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर.
(४) सर्व थरांतील लोकांना सुलभ रीतीने कर्जपुरवठा.
(५) लघु उद्योगधंद्यांसाठी विशेष सवलती.
(६) तत्पर सेवा.
(७) डिपॉझिट इन्शुअरन्स स्कीमखाली रजिस्टर झालेली.

सांपत्तिक स्थिती :

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | : | रु. ४,६७,००० |
| ठेवी | : | रु. ४७,९६,००० |
| कर्जे | : | रु. ४३,६६,००० |
| खेळते भांडवल | : | रु. ६३,००,००० |

उद्धवराव कुलकर्णी — मॅनेजर
धुं. ल. दाते ( पंचांगकर्ते ) — चेअरमन

---

# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर
—पुणे ४—

सर्व सुखसोईंनी परिपूर्ण

फोन नं. ५७९८६

---

## बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी

घोडे गल्ली, सोमवार पेठ, बार्शी (जि. सोलापूर)

दूरध्वनी: बार्शी : २०२, वैराग : ४२ — स्थापना – १९०६ — शाखा वैराग ता. बार्शी

३० जून, १९७२ अखेरची स्थिती

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. २,५५,३३० |
| गंगाजळी | रु. ४,६१,६६८ |
| ठेवी | रु. २६,६९,०१४ |
| गुंतवणूक | रु. ११,०७,४१२ |
| खेळते भांडवल | रु. ३९,५०,६३२ |

सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली आमचे सभासद, खातेदार व हितचिंतकांस सुखाची व समृद्धीची जावो.

व. ह. उटगीकर B. Com. — मॅनेजर
गो. वा. दिवटे B. A. LL. B. — व्हा. चेअरमन
म. ज. कुलकर्णी — चेअरमन

आणि त्यातून विक्री ही विक्री—विभागावर थोडीच अवलंबून असते! मुख्यत: स्क्रॅप, सरकारी परवान्यावर आणलेला परदेशी माल, जुन्या मोटार गाड्या, मशिनरी, हीच निम्याहून अधिक. तदनंतर निरनिराळ्या अधिकाऱ्यांचा हात ओला करून आणि आपला फौजफाटा त्यांचे तैनातीला देऊन होणारी विक्री, मग उरलासुरला भाग हा पब्लिकसाठी ! तेव्हा पाच टक्क्यांच्या विक्रीसाठी विक्री अधिकारी तो काय ?

लहानपणी मुलं खेळ खेळतात त्यांत 'शिवाजी म्हणतो' असा एक खेळ असतो, फक्त शिवाजीच्या नावाचा उच्चार केला तरच ॲक्शन करावयाची. सदानंद हा ह्या प्रकारातील माणूस. 'साहेब म्हणतो विक्री करा' की हे ह्यांचे चेल्यासकट गावोगाव फिरणार. पूर्वी तमाशात नांदी झाली की चला म्हंबईला जाऊ, काशीला जाऊ, पंढरपुरा जाऊ करत ती तमासगीर मंडळी स्टेजवर गोल गोल फिरत, किंवा दुसरा खेळ म्हणजे चला सुट्टी झाली, आता खूप खूप खेळावयाचे—मी इंजीन ड्रायव्हर, इत्यादी. नेहमीचीच दारं ( गिऱ्हाईकं ) वाजवायची, सणासुदीला चार पाट्या जास्त मिळतातच — वर्षअखेर म्हणजे संस्थेचा सणच, नाहीतर काय ? चला, तुम्ही माल काढा, आम्ही विकत राहतो ( उधार हं ! ), हो कितीही झाल तरी ह्या वर्षात विक्रीच्या मालाचा पैसे येणे शक्य नाही. मग काय ? मिळेल तो माल गिऱ्हाइकाकडे लोटत राहणे. निदानपक्षी येणेकऱ्यांची यादी व बाकी तरी जिंदगी व मालमत्तेत ! समजा, पुढील वर्षी माल परत आला तरी चालेल, स्क्रॅपला भर पाहिजेच !

आप्पांचा चेहरा ना, सदा आनंदी. केव्हाही भेटा, कुर्नीसात ठरलेला. कस काय बरं आहे ना पाव्हण ? ( कानडी हेलात ) थोडा माल पाठवतो, बघा जरा, लक्ष असू द्या, पैसे द्याल हो ! काय क्रेडीट नोट ? कशापायी ? माल खराब, तर दुसरा पाठवू. आमच्याकडे येत चला बुवा ! हे नेहमीचेच शब्द साखरेत घोळून घोळून गिऱ्हाइकाकडे फेकणार. हा गृहस्थ चिडला, अति चिडला तर म्हणणार — बघा बुवा ! धंदा वाढला पाहिजे., संस्था टिकवावयास पाहिजेल आहे, आम्ही काय ? पाच गेली पंचाण्णव राहिली म्हणत खुर्चीवरचे हात आणखी घट्ट धरणार. हो ! खुर्ची तरी सुटावयास नको !

विक्री किती झाली ? माल गिऱ्हाइकाला पसंत पडला की नाही ह्या खऱ्या दुय्यम गोष्टी. उद्दिष्ट गाठले की नाही हे महत्त्वाचे. नाहीतर जनरल साहेब फा य ऽऽ र !

समेवरच ( की सिमेवरच ? ) काही राग घोळत राहतात. त्याचे चढउतार समजण कठीण. एकतर गायकाचा आवाज किरटा तरी असेल किंवा बायकी आवाज चढूच शकत नसेल. हे झाले गाण्याबाबत ! आमच्या औद्योगिक जीवनात उत्पादन काढण्याची क्षमता, माणसाची व मशिनरीची, बरोबर आजमावली न गेल्यास असेच समेवर राग घोळत राहतात.

लहानपणी आमचे बंडोपंत ( बंड्या ! ) प्रसंग हातघाईवर आला की मित्रांना ( मारणाऱ्या ) सांगत असे — आमच्या वाड्यात या, मग दाखवतो ! हात घट्ट आवळून, अर्थात रडत रडतच ! मथितार्थ इतकाच, शामभाऊ हे घरशूरच ! उत्पादन हा ह्यांचा विषय—ते जर गिऱ्हाइकाकडून परत आले तर घरातील लोकांना सांगणार-- अहो, त्यांना नकोच होते म्हणून परत केले, किंवा त्यांना काय कळतं ह्या तांत्रिक कामात ! मीच बघतो, का परत केले ते ! म्हणजे निश्चित, परत आलेला माल होपलेस होता हे ध्यानात यावयास हरकत नसावी. त्यांना एखादे ड्रॉइंग दाखवा अन् मोठी ऑर्डर आहे म्हणून सांगा. ते सहजगत्या सांगतील. त्यात काय आहे रे ! दिलं म्हणजेच खात्रीपूर्वक मिळणार नाही, निदानपक्षी वेळेवर तर नाहीच. पुन्हा तुम्ही लोचटपणाने विचारावयास गेलात तर उत्तर ठरलेले, विसरलो रे ! किंवा जनरल साहेबांनी दुसरी अनंत कामे दिली आहेत, आता काम काय कमी आहे का ? हो, आणि ती पार्टी तर सारखीच रिजेक्शन करते हं ! ( तुच्छतापूर्वक ). ह्या सर्वांवर कडी ऐकावयाची असेल तर खास प्रेमात येऊन सांगणार, तुम्ही त्यांच्या इन्स्पेक्टरला काही दिले नाही म्हणून हे रिजेक्शन ! पाजा, पाजा त्याला; नाहीतर ऱ्या क्वॉलिटीत—लेको, तुम्हाला सेलच करता येत नाही !

सारस्वती शामभाऊ म्हणजे एक वल्लीच ! बाटलीवर त्याला केव्हाहि विचारा, इंडस्ट्री काढावी तर ह्यांनीच, प्रॉडक्शन ( देमार ) ह्यांचीच मक्तेदारी, बाकी जग धं ! नॉनसेऽन्स. जरा जास्त झाली तर सांगणार—शंभर पाप झाली म्हणून जनरलसाहेबांच्या तावडीत सापडलो अन् ह्या ऑर्गनेशनमध्ये आलो, अन् चीप बनलो. आम्हांला विकत घेतला यांनी ! काय कॉस्ट दिली ? विचारा त्या कानड्यांना—वास घे म्हणाव वास—म्हणजे कॉस्ट काढता येईल पिता पिता. हे कॉस्ट काढणार आणि साही सकंब चाळीस करणार ! नॉनसेऽन्स. बारा कोटी काय बारा कोट चढवा म्हणावं—अन् पैसा काय, बँका ओस पडल्या आहेत का ? पार्टी ठोका एक पार्टी ऽऽऽ.

चलारे, आणा दळणं ! काय रीघ लागली आहे बघा, जिवाला सुट्टी म्हणून नाही. टाक रे वरनून—बघ पीठ पडलं की नाही. जाडभरडं, बारीक, बघत बसू नको. मोजून मापून कसला देतोस, येथे काय इन्स्पेक्शन आहे का ? भर पिशवीत अन् दे गिऱ्हाइकाला ! बंद ( वर्षाअखेर ) व्हावयाची वेळ आली तरी ही गर्दी ! पिठाच्या गिरणीतील ही शब्दांची देवघेव तंतोतंत आमच्या उत्पादन खात्याला लागू नाही का ? उत्पादन अधिकारी, त्याचे सहकारी अन् कामगार वर्ग उत्पादन काढत असतो. क्वॉलिटी कंट्रोल नाही, इन्स्पेक्शन नाही, माल मिळेल त्या पोत्यात, थैलीत, पिशवीत, लाकडी खोक्यात भरला जातो की झाला फिनिश गुडस् ! या गोदामाकडे पाठवून, संपली आमची बारा कोटीची जबाबदारी !

चला, आता सभेला. हो, आमच्या बहुमताची गरज आहेच ना ! आम्हीही भागधारक आहोत !

भागधारकांनो !

यंदाचा अहवाल आपल्यापुढे सादर करताना मला आनंद वाटतो की आपले यंदाचे उद्दिष्ट आपल्या सर्वांच्या सहकार्याने उत्तम रीतीने पार पडले आहे. लढाईमुळे बाजारात कच्च्या मालाच्या किमती वाढल्या आणि सरकारने सर्वच मालवाहतूक लष्कराच्या दिमतीला दिल्यामुळे त्यात आणखी भर पडली. ट्रॅन्स्पोर्ट मिळणे मुष्किल झाले होते तरी सुद्धा आम्ही प्रयत्नांची शिकस्त करून कंपनीत असलेल्या सर्व कच्च्या मालावर प्रक्रिया करून उत्तमपैकी पक्का माल तयार केला आणि विकला. अर्थात ऑर्डर्स पूर्वीच्याच असल्यामुळे किंमत वाढवून मिळाली नाही म्हणून फारसा नफा झालेला दिसत नाही, पण पुढे निश्चितच नफा होईल अशी आशा करू या.

आपणा सर्वांस वार्षिक ताळेबंद व अहवाल ह्या पूर्वीच पोस्टाने पाठविला होता तो आपण वाचलाच असेल असे गृहीत धरतो.

सरकार व जनता ह्यांमध्ये हातघाईची लढाई चालू असल्यामुळे, त्याचा परिणाम धंद्यावर अनिष्ट तऱ्हेने झाला. बेकायदा संप, पगार वाढ, घेरावामुळे कारखाना अकरा महिने बंद ठेवावा लागला त्यामुळे अपरिमित नुकसान झाले. सरकारने ह्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरवले आहे असे ऐकतो. त्यामुळे सरकारचे धोरणच समजत नाही. आंतरराष्ट्रीय धोरणात आमूलाग्र बदल झालेला आहे, आपल्या मालाला जागतिक बाजारपेठेत इतकी मागणी असूनही तो आम्हांला वेळचे वेळेवर पुरवता आला नाही, कारण लष्करावर सरकारने जास्त पैसा खर्च केला व बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्याशिवाय आमचा नवा कारखाना बांधावयास सिमेंट मिळाले नाही, टेलिफोन, विमानतळ आदी सुखसोयींची उपलब्धताही वेळेवर न झाल्याने जागेवर इमारत बांधणे शक्य झाले नाही. आमचा माल जनतेला न मिळाल्याने ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्याबद्दल आम्ही त्यांना सहानुभूती दाखवतो व सरकारचा निषेध करतो.

शेवटी संस्थेतील अधिकारीवर्गाचे व कामगारांचे जे त्यांनी वेळोवेळी सहकार्य दिले त्याबद्दल आभार मानतो. जनरल साहेबांनी धडाडीने, चिकाटीने व इतक्या कठीण परिस्थितीत आपले उद्दिष्ट गाठले. त्यांचे आभार मानल्याशिवाय (गत्यंतरच नाही) ही सभा परिपूर्ण होऊच शकणार नाही. आणि, मित्रहो ! आपण इतक्या मोठ्या संख्येने येथे हजर राहिलात (गाड्या पाठवल्याच होत्या) आणि संस्थेवर आपले पुत्रवत् प्रेम व्यक्त केले त्याबद्दल स्वतःचे वतीने व संस्थेच्या वतीने मी आपला अत्यंत ऋणी आहे.

जनरल साहेब (रिटायर्ड) (चेअरमनकरिता)

(हा आमच्या लढाईचा धावता वृत्तान्त आहे, ह्यांतील सर्वच गोष्टी निखालस खऱ्या माहीतच. नावे आणि प्रसंग हेही काल्पनिक आहेत. पण वेळ जाण्यासाठी आपली व आमची ही करमणूक आहे, झालं !)


# दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

कराडच्या वाढत्या उद्योगधंद्यास सतत पन्नासहून अधिक वर्षे सक्रिय भांडवल पुरवठा करणारी तसेच सार्वजनिक विश्वस्त ठेवी स्वीकारण्यास सरकारमान्य असलेली मध्यम वर्गीयांची :—

स्थापना १९१७ ] एकमेव सहकारी बँक [ फोन नं. २४३

| | | रु. |
|---|---|---|
| (१) भागभांडवल | ... | १,०५,५७० |
| (२) रिझर्व फंड | ... | ३,९०,५४६ |
| (३) इतर फंडस् | ... | १३,०८,७७१ |
| (४) ठेवी | ... | १,११,१३,९१८ |
| (५) खेळते भांडवल | ... | १,३९,७६,९०३ |

शाखा — तळभाग * विद्यानगर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. ठेवींवर वाढविलेले व्याजाचे आकर्षक दर. अद्ययावत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.

अधिक चौकशी बँकेच्या कार्यालयात करावी.

दि. ना. कुलकर्णी — मॅनेजिंग डायरेक्टर

वि. कृ. तांबवेकर — चेअरमन

वैयक्तिक ममता व सामाजिक समता यांचा मेळ घालण्याचे महान कार्य सहकारी चळवळीमुळेच होऊ शकेल. सहकारी चळवळ म्हणजे समता व क्षमता यांचा समन्वय होय. याचेच प्रतीक म्हणजे—

# दि डेक्कन को-ऑप. स्पिनिंग मिल्स लि., इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर

चात्यांची संख्या : ५४,५२०

रा. वृ. गोवंडे — मॅनेजर

ग. कृ. कांबळे — व्हाईस चेअरमन

अ. रा. भिडे — चेअरमन

# सहकारी बँकांमधील कर्मचाऱ्यांचे प्रश्न

( लेखक : मु. शं. औरंगाबादकर, कार्यकारी संचालक, मर्चंट्स को. बँक, नासिक )

कर्मचाऱ्यांच्या सर्वच प्रश्नांचे मूळ हे वेतनामध्ये समाविष्ट झालेले असते. कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या आणि नागरी सहकारी सेवकांच्या वेतनाचा तौलनिक अभ्यास असे दर्शवितो की राष्ट्रीयीकृत बँकांमधील पट्टेवाल्याचा पगार हा सहकारी बँकांमधील हिशेबनिसांबरोबर असतो आणि हे सर्व चाललेले आहे समाजवादाच्या, समानतेच्या आणि गरीबी हटविण्याच्या दिवसात !

सहकारी कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता तौलनिक दृष्ट्या कमी आहे, त्यामुळे येथे व्यवस्थापकीय व प्रशासकीय पातळीवर गोंधळ माजतो, लाल फितीचा कारभार होतो, असे वेळोवेळी नमूद करण्यात आले आहे. पण अर्धपोटी कामगाराकडून निष्ठेने, त्यागाने, प्रामाणिकपणाने, इच्छेने आणि सचोटीने काम होईल असे गृहीत धरणेच मुळात चूक आहे. वेतनभेद हे अकार्यक्षमतेचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनात एक प्रकारची उद्विग्नता निर्माण होते. ते निराश बनतात आणि न जाणता त्याचा कामावर परिणाम होतो.

याच वेळी संचालक मंडळाच्या अडीअडचणींचे दिग्दर्शन करणे अत्यंत अगत्याचे आहे. प्रथमतः च ही गोष्ट स्पष्ट केली गेली पाहिजे की, बँकांची व्याप्ती लहान असल्याने त्यांना जादा पगार वाढ करणे हे व्यावसायिक आणि नफ्याच्या दृष्टीने विचार करता अशक्य वाटते. त्यातच पदरच्या खेळत्या भांडवलाचे अगर कायम स्वरूपाच्या ठेवींचे प्रमाण कमी असल्यामुळे कमी पगार घेणारे नोकरच त्यांना परवडतात.

सुरुवाती सुरुवातीच्या प्रयोगक्षम अवस्थेत संचालक मंडळाने आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या अगोदरच वास्तवतेच्या आधारावर आपल्याला गाठावयाचा टप्पा आणि मिळविण्याचा नफा ठरवावा आणि वर्षाअखेर जर ठरविलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नफा झाला तर त्या जादा हिश्शाचा विनियोग बँकेच्या कर्मचाऱ्यांत करावा. अर्थातच या जादा हिश्याशी वाटणी ही सरसकट करून चालणार नाही. उत्पादनक्षमता आणि प्रलोभने यांच्याशी त्यांचा समन्वय साधला जावा. यामुळे जास्त काम करणाऱ्यास जादा वेतन मिळेल, कमी काम करणाऱ्यांच्या मनांत जास्त काम करण्याची इच्छा निर्माण होईल.

कामाच्या मानाने मिळणारे कमी वेतन, राष्ट्रीयीकृत बँकांच्या मानाने कमी प्रमाणात उपलब्ध असलेल्या सवलती आणि कल्याणकारी योजना यांच्यामुळे नोकरमंडळी कामाला चिकटून बसत नाही. त्यामुळे त्याचे सर्व आर्थिक तोटे दृष्टोत्पत्तीस येतात.

सध्याच्या युगात सर्वच गोष्टींचा तुटवडा आपल्याला भासतो, परंतु आपल्या श्रमिकांच्या बाजारात पुरवठा हा मागणीपेक्षा नेहमीच जास्त आहे. वाढत्या बेकारीच्या दिवसात आपल्याला कमी पगारात माणसेही मिळतात. पण ही भरती निश्चित तात्कालिक असते. आपल्या बँकेत काम करताना माणूस हा दुसऱ्या कामाच्या शोधात असावा ही शोचनीय बाब आहे. त्यामुळे त्याला कामाविषयी कधीच गोडी निर्माण होत नाही.

बऱ्याचशा ठिकाणी अद्यापही नोकरभरती गुणवत्तेवर न होता संचालकांकडून होते, हे जाहीर गुपित आहे. त्यामुळे एक प्रकारची उपकाराची भावना त्यांच्या मनात असते. त्यामुळेच दडपण वाढते आणि संचालकांची अनधिकृत कामे त्यांना करावी लागतात. त्यांचे दोष, प्रसंगी त्यांच्या चुका सावरून धराव्या लागतात, त्यांचे दोष स्वतःच्या माथी घ्यावे लागतात. म्हणजेच नोकरीची टांगती तलवार असते. यावर उपाय शोधून काढावयास पाहिजे; अन्यथा सहकारी बँकेची चळवळ अयशस्वी होईल.

राष्ट्रीय पातळीवरील कामगारांच्या संघटनांचा अभावही कामगारांच्या हितास बाधक ठरला आहे. त्यामुळे त्यांच्या सामूहिक शक्तीवर नैसर्गिक अशा मर्यादा पडल्या आहेत. या बाबतीत कामगारांनी स्वतःच पुढाकार घेणे अत्यंत अगत्याचे आहे.

सर्वसामान्यपणे सहकारी बँकांचे संचालक मंडळ हे फक्त वरवर अशा प्रकारच्या योजनाच आखते. त्यांची प्रत्यक्ष अमलबजावणी ही या कर्मचाऱ्यांनीच करावयाची असते. दैनंदिन प्रशासन त्यांच्याच हातात आहे. त्यामुळे बँकेचे यशापयश जर खरोखर कोण ठरविणार असतील तर ही मंडळीच.

दुर्दैवाने अशा प्रकारचे प्रशिक्षण व्यापक पातळीवर दिले गेलेले नाही. बँकेच्या गुंतवणूक आणि कर्जपुरवठा यांच्या योजना फार महत्त्वाच्या असतात. त्यांची कल्पना बँकेच्या सर्वच कर्मचाऱ्यांना करून दिली जावी.

सहकारी चळवळीचा पाया मुळातच नैतिक आणि मानवतावादी आहे. अतिशय उच्च अशा मूल्यांवर ही इमारत उभी आहे. ही मूल्ये या कार्यकर्त्यांवर बिंबवली गेली पाहिजेत. त्यांचे संस्कार त्यांवर झाले पाहिजेत. तरच सहकाराचे चिखलात रुतलेले गाडे पुढे येईल.

बँकेच्या सेवकांच्या प्रतिनिधींचा संचालक मंडळावर सहभाग व्हावा. यामुळे त्यांच्या प्रश्नांना तोंड फुटेल, ते आपुलकीने चर्चिले जातील आणि त्यांचे योग्य उत्तर सापडविले जाईल. मात्र संबंधित नागरी बँकेत सोसायट्यांची संख्या १० पेक्षा जास्त असली पाहिजे.

—दीपावली अभिष्टचिंतन—

ही दीपावली व नूतन वर्ष आमचे ठेवीदार, सभासद व हितचिंतक यांना सुखाची व समृद्धीची जावो.

## दि नासिक मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

म. गांधी रोड, नासिक–२

शाखा–(१) सकाळ-संध्याकाळ शाखा म. गांधी रोड, नासिक१. (२) पंचवटी–केला रोड, नासिक–३ (३) नासिक इंड. इस्टेट शाखा, नासिक–७. (४) टिळकवाडी शाखा शरणपूर रोड, नासिक (५) भद्रकाली शाखा–भद्रकाली कारंजा, नासिक.

| | ता. ३०–६–७२ |
|---|---|
| भाग भांडवल | २,९६,००० |
| रिझर्व्हज् | १,६८,००० |
| ठेवी | ६४,०६,००० |
| दिलेली कर्जे | ५४,४१,००० |
| खेळते भांडवल | ८३,७३,००० |

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची सभासद असलेली नासिककरांची जिव्हाळ्याची बँक

म. ग. शुक्ल, चेअरमन  मु. शं. औरंगाबादकर, मॅ. डायरेक्टर
ग. वि. अष्टपुत्रे, व्हा. चेअरमन  ब. के महादेवकर, मॅनेजर

---

शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी
सातत्याने प्रयत्नशील असलेली
शेतकऱ्यांची भाग्यलक्ष्मी—

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., सोलापूर

स्थापना : १९१८

ऑडिट वर्ग "अ"

तार : "कृषी बँक"
पोस्ट बॉक्स नं. ३२

फोन न.–ऑफिस ३९६८, ३९८०
मॅनेजर यांचे निवासस्थान २६०५

आमच्या असंख्य खातेदार, ग्राहक व हितचिंतकांना ही दीपावली व नूतन वर्ष प्रगतीचे व भरभराटीचे जावो.

बा. बं. लिगाडे
एम. ए., एच. डी. सी.
जी. डी. सी. ॲंड ए.
व्यवस्थापक

शं. ना. मोहिते–पाटील,
चेअरमन

---

आमचे असंख्य ग्राहकांस व हितचिंतकांस दीपावली व नूतन वर्ष सुख-समृद्धीचे जावो !

## कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

मुख्य कचेरी, पेण.

तार : सागर बँक  फोन नं. : पेण ५२

★ शेतकऱ्यांच्या विश्वासास व श्रद्धेस पात्र ठरलेली एकमेव अग्रगण्य बँक.

★ जिल्ह्यातील २९ शाखाद्वारे वैशिष्ट्यपूर्ण सेवा बजावीत आहे.

प. वि. म्हात्रे,
बी. ए., एच्. डी. सी.,
मॅनेजर.

एन्. एम. बांगारे,
बी. ए.
चेअरमन.

---

## दि यशवंत को-ऑपरेटिव्ह प्रोसेसर्स लि., इचलकरंजी

जिल्हा–कोल्हापूर

तार :—यशवंत  फोन नं.–२१८१

यंत्र मागावर तयार झालेल्या कोऱ्या मालावर कॅलेंडरिंग, ब्लिचिंग आदि विणकामोत्तर प्रक्रिया करून आम्हीसुद्धा त्या वस्त्राचे "पांढऱ्या शुभ्र वस्त्रांत रूपांतर करतो." तसेच कोऱ्या मालाचे रंगीत मालामध्ये रूपांतर केले जाते.

जी. बी. लायकर
व्हाईस चेअरमन

एम्. बी. माळी
चेअरमन

# ग्रंथपाल गुरुशिष्यांची असामान्य जोडी

## डॉ. शियाळी रामामृत रंगनाथन् व श्री. रघुनाथ शतानंद पारखी

लेखक :—द. वा. शेवडे बी. एस्‌सी., एम्. लिब्. एस्‌सी.

प्रत्येक देशाच्या इतिहासात डोकावल्यास आपणाला असे दिसते की काही व्यक्ती 'युगपुरुष' म्हणून जन्माला येतात, सामान्य जनांना अचंबा वाटेल असे प्रचंड कार्य करतात व अनेकांच्या हृदयांत स्फूर्तीचे स्फुल्लिंग प्रज्वलित करून लुप्त होतात. डॉ. रंगनाथन् हे असेच एक असामान्य ग्रंथपाल होऊन गेले. त्यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी झाला आणि ते २७ सप्टेंबर, १९७२ रोजी मृत्यू पावले. त्यांनी ग्रंथपाल व्हावे अशी नियतीचीच इच्छा होती. एम्. ए. ची परीक्षा पास झाल्यावर सहा वर्षे प्राध्यापकाची नोकरी करून १९२४ साली ते मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल झाले. (या संदर्भात आठवण होते ती दुसऱ्या एका युगपुरुषाची—अँथनी पॅनिझीची. गेल्या शतकात हा इटालियन गृहस्थ 'राजकीय निर्वासित' म्हणून इंग्लंडमध्ये आला व ग्रंथालय क्षेत्रात पदार्पण करून क्रमाक्रमाने वर चढत शेवटी ब्रिटिश म्युझियम या इंग्लंडच्या राष्ट्रीय ग्रंथालयाचा प्रमुख ग्रंथपाल झाला!) त्याच वर्षी डॉ. रंगनाथन् ग्रंथपालनाच्या अभ्यासासाठी इंग्लंडला रवाना झाले. 'लंडन स्कूल ऑफ लायब्ररियनशिप' या ठिकाणी त्यांनी डॉ. डब्ल्यू. सी. बेरविक सेयर्स यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपालनाचे शिक्षण घेतले. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता निरनिराळ्या ग्रंथालयांत कामकाज कसे चालते ते पाहण्यास डॉ. सेयर्स यांनी त्यांना प्रोत्साहन दिले.

आपला अभ्यासक्रम यशस्वी रीत्या पूर्ण करून डॉ. रंगनाथन् १९२५ साली भारतात परतले. परतीच्या प्रवासातच त्यांनी आपल्या जगद्विख्यात द्विबिंदु वर्गीकरण पद्धतीचा आराखडा तयार केला. मद्रासला परतल्यावर त्यांनी मद्रास विद्यापीठाचे ग्रंथालय ही एक प्रयोगशाळाच बनविली व त्या ठिकाणी ग्रंथालय शास्त्राचे सर्व प्रयोग केले. आठ वर्षे प्रत्यक्ष प्रयोग केल्यानंतरच द्विबिंदु वर्गीकरण पद्धतीची पहिली आवृत्ती १९३३ मध्ये प्रसिद्ध केली. आज तिची सहावी पुनर्मुद्रित आवृत्ती वापरात असून सातवी आवृत्ती प्रकाशनाच्या मार्गावर आहे. ग्रंथालयशास्त्रावरील त्यांचे पहिले पुस्तक 'फाइव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स' त्यांनी १९३१ मध्ये लिहिले व त्यानंतर आत्तापर्यंत त्यांनी ग्रंथालय शास्त्रावर एकूण पन्नासच्यावर ग्रंथ लिहिले आहेत. त्यांनी लिहिलेल्या लेखांची संख्या तर कित्येक शेकड्यांत मोजता येईल.

डॉ. रंगनाथन् यांनी वीस वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मद्रास विद्यापीठ सोडले व ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या निमंत्रणावरून १९४५ साली बनारस हिंदु विद्यापीठाच्या ग्रंथालयाची पुनर्रचना व पुनर्व्यवस्था करण्यासाठी गेले. डॉ. राधाकृष्णन् त्या वेळी बनारस हिंदु विद्यापीठाचे उपकुलगुरू होते.-१९४७ साली दिल्ली विद्यापीठाचे उपकुलगुरू सर मॉरिस ग्वायर यांच्या निमंत्रणावरून दिल्ली विद्यापीठात ते गेले व त्यांनी ग्रंथालयशास्त्राचे प्राध्यापक व ग्रंथालय सल्लागार म्हणून काम केले.

डॉ. रंगनाथन् यांनी अनेक देशांना भेटी दिल्या आहेत. १९४८ साली त्यांनी फ्रान्स, डेन्मार्क, हॉलंड, नॉर्वे व स्वीडन या देशांचा दौरा केला व ते अमेरिकेलाही जाऊन आले. १९५० साली त्यांनी रॉकफेलर फौंडेशनचे पाहुणे म्हणून पुन्हा अमेरिकेला भेट दिली. १९५८ व ५९ या साली त्यांनी आशिया, युरोप व अमेरिका या खंडांना भेटी देऊन विविध देशांमध्ये ग्रंथालयशास्त्रावर अनेक व्याख्याने दिली. १९६२ साली त्यांनी बंगलोर मुक्कामी 'डॉक्युमेंटेशन रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर'ची स्थापना केली. त्या संस्थेचे ते शेवटपर्यंत सन्माननीय प्राध्यापक होते.

डॉ. रंगनाथन् यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ग्रंथालय समित्यांवर काम केले आहे. डॉ. रंगनाथन् यांना 'रावसाहेब', 'पद्मश्री', दिल्ली व पीट्सबर्ग विद्यापीठांची सन्माननीय 'डॉक्टरेट' इत्यादी पदव्या मिळाल्या. भारत सरकारने त्यांची 'ग्रंथालय शास्त्राचे राष्ट्रीय प्राध्यापक' म्हणून नेमणूक केली. अगदी अलीकडेच त्यांना 'मार्गारेट मान' पारितोषिकही देण्यात आले. एवढा मानमरातब झाला तरी डॉ. रंगनाथन् यांच्या साध्या राहणीत व उच्च विचारसरणीत बिलकुल फरक झाला नाही. ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास द्रव्यसाहाय्याच्या अभावी मागे पडू नये म्हणून त्यांनी आपली आयुष्यभराची कमाई—एक लाख रुपयाहून अधिक रक्कम-ग्रंथालयशास्त्राचे 'आसन' निर्माण करण्यासाठी मद्रास विद्यापीठाला देऊन टाकली.

ग्रंथपालनाला 'शास्त्र' म्हणून दर्जा प्राप्त करून देण्यास त्यांचेच प्रयत्न कारणीभूत आहेत. १९२८ साली 'मद्रास ग्रंथालय संघ' व १९३३ साली 'भारतीय ग्रंथालय संघ' यांची स्थापना डॉ. रंगनाथन् यांच्या पुढाकारानेच झाली होती. डॉ. रंगनाथन् यांनी ग्रंथालये, ग्रंथपालन व ग्रंथपालन व्यवसाय यासाठी एवढे प्रचंड कार्य केले आहे म्हणूनच त्यांना, 'भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक' असे म्हणतात.

### डॉ. रंगनाथन् ह्यांचे पट्टशिष्य श्री. र. श. पारखी

डॉ. रंगनाथन् यांचा नामनिर्देश करताच आणखी एका थोर ग्रंथपालाची प्रकर्षाने आठवण होते. ते म्हणजे कै. रघुनाथ शतानंद पारखी. कै. अप्पासाहेबांना दिवंगत झाल्यास येत्या दिवाळी-

पाढण्याला चार वर्षे पूर्ण होतील. कै. अप्पासाहेब हे कै. डॉ. रंगनाथन् यांचे पट्टशिष्य होते. कै. डॉ. रंगनाथन् यांच्याप्रमाणे कै. अप्पासाहेबांनी आपले सर्व आयुष्य ग्रंथपालनासाठीच वेचले. या दोघांचा सहयोग बराच प्रदीर्घ—जवळ जवळ चाळीस वर्षांचा होता. १९३० साली बनारस या ठिकाणी पहिली अखिल आशियाई शैक्षणिक परिषद् भरली होती. या परिषदेत कै. अप्पासाहेबांनी 'भारतातील व इंग्लंडमधील ग्रंथालयांची वाढ व त्यांचा तालनिक अभ्यास' या विषयावर एक निबंध लिहिला होता. त्या परिषदेच्या ग्रंथालय विभागाचे कै. डॉ. रंगनाथन् चिटणीस होते. ते कै. अप्पासाहेबांच्या निबंधाने फारच प्रभावित झाले व येथूनच या दोघांच्या सहयोगाला सुरुवात झाली. १९३२ साली मद्रास या ठिकाणी कै. अप्पासाहेब कै. डॉ. रंगनाथन् यांच्या हाताखाली 'ग्रंथपालन पदविका' उत्तीर्ण झाले. त्या वेळेपासून कै. डॉ. रंगनाथन्नी जे जे लिहिले ते ते कै. अप्पासाहेबांनी आत्मसात केले व प्रामाणिकपणे ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा प्रयत्न केला. 'आपल्या विषयांत शेवटच्या मिनिटापर्यंत अद्ययावत माहिती असणारा माझा एकमेव विद्यार्थी' व 'कै. पारखी यांचा सहवास लाभल्याबद्दल मला अभिमान वाटतो' अशा शब्दात कै. डॉ. रंगनाथन् यांनी कै. अप्पासाहेबांचा गौरव केला आहे. कै. पारखी यांनी फर्ग्युसन कॉलेज, गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अॅन्ड इकॉनॉमिक्स, रॉयल एशियाटिक सोसायटी इत्यादी संस्थांमध्ये अभिमानास्पद कामगिरी केली आहे. त्यांनी इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांत विपुल ग्रंथलेखन केले आहे. 'डेसिमल क्लासिफिकेशन अॅन्ड कोलन क्लासिफिकेशन इन् पर्स्पेक्टिव्ह' हा त्यांचा ग्रंथ तर या विषयावरील एक उत्कृष्ट ग्रंथ म्हणून जगन्मान्य झाला आहे.

या गुरुशिष्यांच्या असामान्य जोडीने केलेले प्रचंड कार्य दृष्टीसमोर ठेवून ग्रंथपालन व ग्रंथपालन व्यवसायाच्या भरभराटीसाठी सतत प्रयत्न करणे हे प्रत्येक ग्रंथपालाचे कर्तव्य आहे.


शेती सुधारण्याकरिता व पर्यायाने आर्थिक पातळी उंचावण्याकरिता सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आशास्थान असलेली

**सोलापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, सोलापूर.**

र. नं. : २४९१० दूरध्वनी क्रमांक : ३८६५
दिनांक १-१-१९५१ ऑडिट वर्ग 'अ'

शाखा : दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, सांगोला, करमाळा, माढा, पंढरपूर, बार्शी, मोहोळ, अकलूज, मंगळवेढा व अक्कलकोट.

वसूल झालेले भाग

भांडवल ... रु. १ कोटी, ७ लाख, ६७ हजार
खेळते भांडवल रु. ८ कोटी, ७९ लाख, ७५ हजार
सभासद संख्या ४१,५२५
आतापर्यन्त वाटलेली
कर्जे ... रु. ११ कोटी, ५१ लाख.

| नवीन विहीर | जुनी विहीर | तेलयंत्रे व पंपिंग सेटस् |
|---|---|---|
| १७१११ | ५२८१ | ९०६३ |

वरील सगाई योजनेशिवाय जमीन सुधारणा, जमीन खरेदी, जुने कर्जनिवारण, ट्रॅक्टर व इतर आवजारे खरेदी करणे, उपसा जलसिंचन योजना, विशाल विहीर योजना, सलग विभाग विकास योजना आणि ग्रामीण विद्युतीकरण योजना, वगैरेंसाठी अल्प दराच्या व्याजात दीर्घ मुदतीची कर्जे देते.

बँकेच्या आर्थिक मदतीने सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ११ हजार एकर जिराईत जमिनीचे बागाईत जमिनीत रूपांतर होऊन, शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात सुमारे ११ लाख रुपयांची वाढ झालेली आहे.

किसनलाल रामचंद्र मारवाडी,
बी. ए. एलएल. बी., एम्. एल. ए. मंगळवेढा, अध्यक्ष

रा. बा. टोणपे, व्यवस्थापक
बाबुराव शंकरराव पाटील, गारेगाव, तालुका : बार्शी, उपाध्यक्ष



तार – "दूधसाखर बिद्री"
५७८ कोल्हापूर ऑफिस
११९६ फॅक्टरी साईट

**श्री दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री.**

(मौनीनगर), तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर

सभासद, कामगार व हितचिंतक यांना नूतन वर्ष सुखाचे व भरभराटीचे जावो.

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

शेतकरी कामकरी लोकांचे सर्वांगीण आर्थिक विकासाचा सहकार हे एक केंद्र-बिंदू आहे.

जय सहकार

कार्यक्षम व्यवस्थापक मंडळ, सभासद बंधू व कुशल सेवक वर्ग यांच्या त्रिवेणी संगमामुळे कारखान्याची यशोमंदिराकडे वाटचाल.

कारखान्याने सन १९७१-७२ चे गळीत हंगामात १,४५,५७५ मे. टन उसाचे गाळप करून १,०१,७९१ पोती साखर उत्पादन केली असून, सरासरी साखर उतारा ११.२७ आहे.

यशवंतराव आबाजीराव कदम, प्रभारी कार्यकारी संचालक
बळवंत संतराम पाटील, व्हाईस चेअरमन

विश्वनाथराव हरीभाऊ पाटील, चेअरमन

संचालक

मा. तु. रा पाटील,
मा. एम्. एच्. पाटील,
मा. आ. ज्ञा. पाटील,
मा. ए. ब. काकडे,
मा. कृ. शं. देसाई,
मा. बा. गो. देसाई,
मा. हिं. ग्रा. पाटील,
मा. स. ग. पाटील,
मा. वि. श्री. कुलकर्णी

# लेदर सायन्सच्या पदवीसाठी श्री. उदय वैद्य इंग्लंडकडे



लेदरविषयक उच्च शिक्षण घेण्यासाठी श्री. उदय वैद्य (वय २०) नुकतेच इंग्लंडला रवाना झाले. तेथील लीडस् विश्वविद्यालयामध्ये लेदर सायन्सची एम. एस्सी. पदवी ते मिळवतील.

श्री. उदय वैद्य यांचे महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसनमध्ये झाले. बी. एस्सी. नंतर त्यांनी मद्रास येथील सेंट्रल लेदर इन्स्टिट्यूटचा सात महिन्यांचा लेदर मॅन्युफॅक्चरिंगचा कोर्स पूर्ण केला. ते उत्तम क्रिकेटपटूही आहेत. स्वस्तिक रबर प्रॉडक्टस्चे श्री. वसंतराव वैद्य यांचे ते द्वितीय चिरंजीव होत.

---

## बेकारांना रोजगारांची माहिती पुरविण्याचा किफायतशीर धंदा

बेकारांना उपलब्ध रोजगारांची माहिती पुरविण्याचा एक किफायतशीर धंदा कलकत्त्यामधील काही बेकार पदवीधरांनी सुरू केला आहे. दैनिकातील नोकरीच्या जाहिरातींची वर्गवारी करून, त्या सायक्लोस्टाइल करून, 'एम्प्लॉयमेंट नोटिफिकेशन' ह्या नावाने प्रत्येक प्रत १५ पैशांना विकली जाते. हजारो प्रती दररोज खपतात. काहींनी वेगवेगळ्या रोजगारास अनुरूप असे अर्जाचे नमुने विकण्यासही प्रारंभ केला आहे. प्रत्यक्ष नोकरी पत्करण्यापेक्षा हा धंदा त्यांना कितीतरी किफायतशीर ठरला आहे.

## दररोज ७५ लक्ष नवी नाणी

टांकसाळीतून आता दररोज ७५ लक्ष नवी दुय्यम नाणी पाडण्यात येतात. ऑगस्ट, १९७० मध्ये दररोज १२ लक्ष नाणी आणि जानेवारी १९७१ मध्ये दररोज ३५ लक्ष नाणी, अशी त्यांची उत्पादन संख्या होती.

## रेल्वेवरील विना-तिकीट प्रवास

रेल्वेजवर दरमहा १३,००० लोकांना विना-तिकीट प्रवास करण्याबद्दल पकडण्यात येते. तिकीट विक्री वाढू लागली आहे.





पाणी...पाणी
हवं तेव्हा, हवं तितकं
शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.
त्या साठी भरवश्याचं असं 'एकच'
किर्लोस्कर एंजिन
३ ते १५ हार्स पॉवर
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-३
® [illegible]जनसाठी किर्लोस्कर [illegible]

# दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस :—
पं. जवाहरलाल नेहरू रोड, परभणी

## परभणी

तारेचा पत्ताः— शेतकी बँक
फोन नं. ६४, १४९

● सहकारी अर्थव्यवस्थेनुसार जिल्ह्यांतील ग्रामीण शेतकऱ्यांना कृषिविकासासाठी पतपुरवठा करून ●
● त्यांचे जीवनमान सुधारण्याचे कामी हातभार लावणारी जिल्ह्यांतील एकमेव सहकारी संस्था ●

## दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी

सांपत्तिक परिस्थिती ( आंकडे लाखांत )

| | | | |
|---|---|---|---|
| १. भाग भांडवल | रु. ११८·७६ | ३. वाटलेली कर्जे | रु. ७१३·८८ |
| २. एकूण ठेवी | रु. २७०·२१ | ४. गंगाजळी व इतर निधी | रु. २२·३४ |

जिल्ह्यांत सर्वत्र भागांत पसरलेल्या आपल्या ३१ शाखांमार्फत ग्रामीण जनतेस बँकिंगची सोय उपलब्ध करून देऊन बँकेच्या मुख्य कचेरीत अत्याधुनिक प्रकारच्या सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करण्यांत आलेली आहे.

नूतन वर्षारंभ प्रसंगी बँक आपल्या भागधारकांना, सभासदांना, ठेवीदारांना, ग्राहकांना व हितचिंतकांना शुभेच्छा व्यक्त करून त्यांना नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व उत्कर्षाचे जावो अशी सदिच्छा व्यक्त करते.

मा. गो. धारप
व्यवस्थापक

रावसाहेब जामकर
व्हाईस चेअरमन

लिं. ना. दुधगांवकर
चेअरमन



दीपावली — शुभचिंतन

यंदाची दीपावली व नूतन वर्ष कारखान्याचे सर्व भागधारक, कर्मचारी, साखर व्यापारी व असंख्य हितचिंतक यांना सुखाचे व समृद्धीचे जावो.

# गिरणा सहकारी साखर कारखाना लि.

भाऊसाहेब हिरे नगर, दाभाडी, ता. मालेगाव, जिल्हा नासिक.

लक्ष्मण दशरथ पाटील
उपाध्यक्ष

चंद्रराव धनजी निकम
अध्यक्ष

## संचालक मंडळ

श्री. भिला पर्वत पवार
श्री. जगन्नाथ सिताराम निकम
श्री. काशिनाथ गोपाळराव पवार
श्री. रघुनाथ धर्मा वळवी
श्री. नामदेव मालजी अहिरे
श्री. पंडितराव केशव ठाकरे
श्री. त्र्यंबक रामजी पवार
श्री. विजयसिंग नारायणसिंग ठाकोर
श्री. केवबा मोतीराम निकम
श्री. निंबा वादाजी देवरे ( जिल्हा बँक प्रतिनिधी )

### तूट भरून काढण्यासाठी चलनवाढ

संबंध चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ८५० कोटी रु.पेक्षा जास्त तुटीच्या अर्थव्यवस्थेसाठी नोटा छापून प्रसृत करण्यात येऊ नयेत, अशी मर्यादा ठरविण्यात आली होती. पण, १९७१-७२ मध्येच ७१० कोटी रुपयांची तरतूद रिझर्व्ह बॅंकेकडून नोटा मिळवून करावी लागली. मध्यवर्ती सरकारने करवाढ जास्तीत जास्त करूनही ही परिस्थिती उद्‌भवली.

### रक्तपितीच्या रोग्यांचा भेदाभेद संपला

सार्वजनिक इस्पितळातून रक्तपितीच्या रोग्यांना इतरांपासून वेगळे ठेवले जात असे. संसर्गजन्य रक्तपिती नसणारे रोगी वॉर्डातून इतर रोग्यांप्रमाणेच ह्यापुढे ठेवले जाणार आहेत.

### येत्या उन्हाळ्यातील पाण्याची संभाव्य टंचाई

येत्या उन्हाळ्यात अनेक खेड्यांत पिण्याच्या पाण्याचा मोठा दुष्काळ पडेल असे दिसते. जरूर ते धान्य खेड्यात पोहचविणे सहज शक्य आहे. सध्याच्या रेशनच्या प्रमाणाप्रमाणे सुमारे १००० वस्तीच्या खेड्याला ८/९ टन म्हणजे एक ट्रकभर धान्य महिन्यातून एकदा पाठवावे लागेल. पण पाणी बाहेरून आणावयाचे झाल्यास १००० वस्तीच्या खेड्याला १०,००० गॅलन पाणीपुरवठ्यासाठी रोज १,००० गॅलनचा एक टॅंकर लागेल. पाणी न मिळाल्यास गावे ओस पडू लागतील व शहराकडे लोक जाऊ लागतील.


Greetings For A Happy Diwali
And A Prosperous New Year

**UNITED COMMERCIAL BANK**

Head Office : 10, Brabourne Road, Calcutta—1.

Branches in Poona — POONA CAMP, POONA CITY, SHIVAJINAGAR, YERAVDA and PIMPRI

विविध प्रकारच्या कापडाच्या ' क्वालिटी ' व ' गॅरंटी ' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापड दुकान
**ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स**
' होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी '
पेरुगेट रोड, पुणे ३०. (फोन नं. ५७३१८)

**रिगल बेकरी**
गोखले चौक, पुणे ४

**सप्रे टेलर्स**
अप्पा बळवंत चौक, पुणे ३०

## मिरासदारीचे ते दिवस आता संपले :

## मंत्र्यांवर हकालपट्टीची टांगती तलवार

" फक्त मृत्यू किंवा नवी निवडणूकच आपले मंत्रिपद हिरावून घेऊ शकेल, असे काँग्रेस सरकारच्या मंत्र्याला वाटत असण्याचा काळ आता संपला आहे. आपले मंत्रिपद अखंड टिकणारच, असेच तो मानीत असे. तो मंत्री होता म्हणून त्याला निवडणुकीचे तिकीट मिळावयाचे; त्याला तिकीट मिळाले म्हणून तो पुन: मंत्री केला जावयाचा. पंतप्रधान इंदिरा गांधींनी हे सर्व थांबविले आहे. मंत्र्यांच्या मनांत त्यांनी भीती इंजेक्ट केली आहे. " एकदा मंत्री झाला की तो कायमचाच मंत्री " ही कल्पना आता पालटली आहे. मी मध्यरात्री झोपी जाते वेळी मंत्री असलो तरी उद्या सकाळी उठते वेळी मी मंत्री असेन किंवा नाही ह्याची मला धास्ती असते. "

— महाराष्ट्र राज्याचे कायदामंत्री
श्री. ए. आर. अंतुले


## चित्रकलेच्या आधुनिक कॅमेऱ्यांचे व साहित्याचे आद्य उत्पादक

उत्पादने

(१) प्रोसेस कॅमेरे
(२) ऑफसेट कॅमेरे
(३) फोटोग्राफीचे कॅमेरे
व
(४) त्यांचे सर्व तऱ्हेचे साहित्य
(५) डुप्लिकेटर्स, इत्यादी.

आजच आपल्या गरजेसाठी लिहा.

# दि शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. टिळकवाडी, बेळगांव

( फोन नं. १३०६ )



## दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

वाई

स्थापना – १९११ — दूरध्वनी क्र. ७
शाखा : १ पाचगणी — ऑडिट वर्ग " अ "
दूरध्वनी क्र. ७६

| | | रु. |
|---|---|---|
| भाग भांडवल | ... | ९९,१०० |
| गंगाजळ व इतर निधी | ... | २,४६,१०० |
| ठेवी | ... | २२,८१,९०० |
| कर्जे | ... | १८,०९,३०० |
| खेळते भांडवल | ... | २६,७०,००० |

ठेवीदारांसाठी विविध योजना : मुदत ठेव १ ते ५ वर्षे : व्याज रु. ६-५० ते ७-५०.

रिकरिंग डिपॉझिट, दामदुप्पट योजना, वस्तुभाडे करारनामा (हायर परचेस) : सुरक्षित कप्पे योजना. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

प. कृ. अभ्यंकर, B. Com. LL. B., मॅनेजर
पां. रा. देशपांडे, B. A. B. T. Dp. Ed., ऑ. सेक्रटरी
अ. स. भट, B. A. LL. B., चेअरमन



# दि पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणे २.

२५ शुक्रवार पेठ, पुणे — फोन नं. ५५७०१

—: ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर :—

(१) चालू ठेव : १ टक्का
(२) सेव्हिंग्ज ठेव : ४½ टक्के
(३) रिकरिंग डिपॉझिट :—

| | |
|---|---|
| १२ महिने | ५ टक्के |
| २४ महिने | ६ टक्के |
| ३६ महिने | ७ टक्के |

(४) मुदत ठेव ( फिक्स्ड डिपॉझिट ) :—

| | |
|---|---|
| ६ महिने | ४=७५ टक्के |
| १२ महिने | ६=५० टक्के |
| २४ महिने | ६=७५ टक्के |
| ३६ महिने | ७=०० टक्के |
| ६० महिने | ८=०० टक्के |

श्री. प्रभाकर प्रोरेश्वर खरे, असि. मॅनेजर
मा. संभाजीराव लक्ष्मणराव शिरोळे, व्हा. चेअरमन
मा. हरिश्चंद्र मारुती थोरात, चेअरमन

# आपली आवड

# बेडेकर

## उत्पादनें




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड व इतर उत्पादनें उत्तम साफ केलेले कच्चे पदार्थ व या विषयांतील ५५ वर्षांचा रोजचा अनुभव यामुळें सर्वांनांच आवडतात. आपणही अनुभव घ्या.

**व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स प्रायव्हेट लि.**

मुगभाट, मुंबई ४

B.VASANT 165



# शेतकीसाठी भरीव मदतीचा हात

आर्थिक मदतीसाठी शेतकरी यांच्याकडून येणाऱ्या खालील योजनांचा आम्ही सहानुभूतिपूर्वक विचार करतो :-

■ खते, बीबियाणे, जन्तुनाशक द्रव्ये इत्यादीसाठी अल्पमुदतीचे कर्ज ■ पंपसेट, ट्रॅक्टर्स यांसारखी शेतकी आयुधे खरीदण्यासाठी, तसेच जमिनीस पाणीपुरवठा, विहिरीवर वीजव्यवस्था, शेतांवर पडळीची व्यवस्था इत्यादीसाठी मध्यम मुदतीचे कर्ज ■ शेते, मळे यांचा विकास, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इत्यादीसाठी दीर्घ मुदतीचे कर्ज.

शेतीला उपयुक्त खते व आयुधे यांचे उत्पादक आणि वितरक यानाही, त्यांच्या विक्री व वितरण योजनांसाठी आम्ही आर्थिक साह्य करतो.

आमच्या कोणत्याही शाखेशी किंवा मुंबईच्या मुख्य कचेरीतील ॲग्रिकल्चरल फायनान्स डिपार्टमेन्टशी संपर्क साधा.

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/106 B MAR

ARTHA
Divali Number, 1972
Price Rs. 2 = 00

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६